रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ३१ डिसेंबर २०२३




# मोदी सरकारची हॅट्ट्रिक

आधुनिक केसरी

**भारतीय आज २०२३ या वर्षाला निरोप देणार असून  २०२४ या वर्षाचे स्वागत करणार आहेत. मागील वर्षात देशात जे चांगले घडले ते स्मरण असू द्या!कारण २०२४ मध्ये लोकसभेची निवडणूक होणार आहे. ही निवडणूक देशाचे भवितव्य घडविणारी आहे.पंतप्रधान मोदी यांना सत्तेतून घालविण्यासाठी विरोधी पक्ष एकत्र येत आहेत .दुसरीकडे अयोध्यात प्रभु श्रीरामचंद्राच्या मंदिराची शुभारंभ व प्राण प्रतिष्ठापणाचा भव्य सोहळ्याकडे देशाचे लक्ष्य लागले आहे. याच वर्षात जम्मू -काश्मिर नवीन राज्याची व महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होणार आहे. नवीन वर्षात इंग्रजाच्या गुलामीचा कलंक पुसून टाकून भारतीय स्वराज्याचे आणि स्वाभिमानाच्या पर्वाला सुरूवात होत आहे.**

पाश्यात्य संस्कृतीनुसार३१ डिसेंबर  रोजी रात्रभ दारू पिऊन नवीन वर्षाचे स्वागत केले जाते. भारतीय हिंदू संस्कृतीनुसार चैत्र महिन्यापासून नवीन वर्षाची सुरुवात गुढी उभारुन व पूजा करुन होते.हा फरक आहे. कवीवर्य केशवसुतांनी म्हंटले आहे,'जुने जाऊ द्या मरणालागुनी जाळुनी किंवा पुरूनी टाका'. म्हणजे, जुन्या कुप्रथा,व बुरसटलेले विचार गाढून टाव्यात द्याव्यात, असा अर्थ आहे.आपला चांगला भविष्यकाळ हा आपण भूतकाळात केलेले विचार व घेतलेल्या निर्णयावर अलंबून असतो. भाजपा व मोदी सरकारने २०१४ ते २०२४ पर्यंत राष्ट्रहितासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.भारताला अनेक महत्वपूर्ण टप्पे गाठावयाचे आहेत.त्यामुळे २०२४  वर्षे हे भारताचे भवितव्य घडविणारे आहे. मोदी सरकारचे डिसेंबर २०२३ चे संसदेचे शेवटचे अधिवेशन होते. यावेळी संसदेत महत्वपूर्ण विधेयके येणार हे विरोधी पक्षांना माहित होते.पण संसदेत तरुणाच्या घुसखोरीचा बहाणा करत विरोधी पक्षांनी गोंधळात घातला. संसदेत अश्या घटना घडल्यानंतर




कमलाकर जोशी


ज्येष्ठ पत्रकार, नांदेड

संपर्क क्र. 9422170850


अध्यक्षांनी समज व शिक्षा दिल्याचे उदाहरणे आहेत.पण विरोधकांनी याचे राजकीय भांडवल केले. अध्यक्ष व सभापती वारंवार चर्चेची विनंती करुन त्यांनी जुमानले नाही. गृहमंत्री शहा यांना निवेदन करण्याचा हट्ट धरला.संसदेत घुसखोरी केलेले तरूण हे अतिरेकी नव्हते,त्यांनी हे कृत्य बेकारीच्या कारणावरुन केले,हे काँग्रेस नेते राहूल गांधीना माहित होते. त्यांनी ते स्पष्टपणे सांगितले आहे. मग काँग्रेसला  विरोधी पक्षाला संसदेत गोंधळ घालण्याचे कारण काय? त्या तरुणांनी संसदेत घुसखोरीसाठी नियोजनबध्द कट रचला. त्यांनी सुरक्षा व्यवस्थेला छेदले.यामागे त्यांचा उद्देश काय होता. या घटनेची उच्चस्तरीय चौकशीचे आदेश लगेच दिले गेले, यंत्रणा कामाला लागली.या तपास यंत्रणेचा निष्कर्ष येण्याआधी गृहमंत्री शहा संसदेत निवेदन काय देणार  ? तरीही काँगेसचा हट्ट धरला. खर तर! तपास यंत्रणेने गांधी यांचा जवाब घ्यावयास हवा होता.या विषयावरुन काँग्रेस पक्षाने व विरोधी पक्षाने संसदेला राजकीय आखाडा  बनविला. मोदी सरकारने संसदेत कोणतेही निर्णय घेवू नये,हा राजकीय डाव होता. कारण तृणमूल काँग्रेसच्या खा.महुआ यांचे सदस्य रद्द केले गेले होते. याचा 'इंडी'आघाडीच्या नेत्यांला राग होता. संसदचे काम हे नियमानुसार चालते.पण काँग्रेस नेत्यांचा गांधी परिवाराच्या इच्छानुसार संसदेचे काम चालावे,असा आग्रह असतो. विरोधी पक्षांला यावर प्रश्न व चर्चा करावयाची नव्हती. विरोधी पक्षाने दोन्ही सभागृहात पंतप्रधान मोदी छायाचित्राचे फलक लावून निदर्शने व गोंधळ, घालणे,ओरडे सुरू करुन कामकाजत अडथळे आणले.त्यांचे हे वर्तन संसदीय नियमाचे उल्लंघन करणारे होते. त्यामुळे१४१ सदस्यांना निलंबित केले गेले. इतकेच नव्हे, तृणमूल काँग्रेसचे सदस्य कल्याण बनर्जी यांनी उपराष्ट्रपतीची नक्कल करत थट्टा केली.तेही लोकशाही मंदिराच्या पायरीवर.! यात काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहूल गांधी हे पोरकटपणे त्याचे व्हिडीओ चित्रिकरण करत होते.उलट बनर्जी हे नक्कल करणे, कला आहे, असे बेशरमपणे सांगत आहेत. त्यांनी कला म्हणून ममता दीदींची नक्कल करण्याची हिंमत दाखवावी.विरोधी पक्ष सदस्याच्या निलंबनाला मोदी सरकार नव्हे, तर विरोधी पक्षाचे असंसदीय वर्तन कारणीभूत आहे. त्यात पुन्हा कांगावा! विरोधी पक्षाला बोलू जात नाही, लोकशाहीचा गळा घोटला जात आहे. हे काँग्रेसला शोभणारे नाही. याबाबतचे वृत्त देताना एका चाटूगार संपादकाने तर सीमा आंलोडली आहे. त्यांनी वृत्तात "विरोधी पक्षाचे बाके रिकामे पाहून केंद्र सरकारने धडाधड विधेयके समंत केली, असे आपले मत व्यक्त केले.अधिवेशनापूर्वी सरकार संसदेच्या कामकाज व मांडण्यात येणाऱ्या विधेयकांची माहिती विरोधी पक्षांना देत असते! याचे चाटूगार संपादकाला ज्ञान नाही काय? गेल्या दहा वर्षात तर काँग्रेस व विरोधी पक्षाने मोदी सरकारच्या प्रत्येक धोरणाचा व निर्णयाचा विरोध करत आला आहे.संसदेत चर्चावेळी काँग्रेस विरोधी पक्ष सरकारवर टीका करुन जेंव्हा केंद्र सरकार उत्तर देऊ लागले की, तो सभागृहातून पलायन करत आला आहे. देशातील नवीन कृषि कायद्याला विरोध करण्याचा तर अतिरेक झाला. नागरिकत्व सुधारणा कायदा हा भारतीय मुस्लिमाच्या विरोधात असल्याचा अप्रचार काँग्रेस नेत्यांनी करून मुस्लिमांच्या भावना भडकविल्या. तीन तलाक मुस्लिम महिलांसाठी कुप्रथा होती. त्या प्रथेच्या विरोधात कायदा आणला जात असताना त्याला धार्मिक रंग दिला. मोदी सरकारने १ हजार व ५०० नोटा बंद करण्याचा निर्णय योग्य होता. याचे विरोधी पक्षाने भांडवल केले. यावर जनतेने विरोधी पक्षाला नाकारले. काँग्रेसने जम्मू व काश्मिरबाबत घटनेत ३७० कलम तरतूद करण्याची जी घोडचूक केली. मोदी सरकारने जम्मू काश्मीरचे घटनेतील ३७० कलम रद्द करण्याचा धाडसी निर्णय घेतला.सर्वोच्च न्यायायालने मोदी सरकारने घेतलेला  निर्णय वैध असल्याचा निकाल दिला आहे. तसेच पाक व्याप्त काश्मिरमध्ये २४ जागा रिक्त ठेवण्यात आल्या आहेत. हा पाकिस्तानला इशारा आहे.महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय काँग्रेसला सत्तेत असताना घेता आला नाही. तोही निर्णय या मोदी सरकारने घेतला आहे.त्यावरही संसदेत राहूल गांधी जातीचे राजकारण केले.अयोध्या राम मंदिराचा प्रश्न कधी सोडविला जाऊ नये! तो असाच तेवत ठेवायचा  होता! काँग्रेसने भाजपा मुस्लिम विरोधीअशी भीती दाखवत आपली व्होटबँक मजबूत करत आला. यात १९९२ मध्ये बाबरी विवादित ढाचा पडल्यानंतर मुस्लिम मतदार काँग्रेसपासून दूर गेला होता. पण कर्नाटक व तेलंगणाची निकाल पहाता मुस्लिम मतदार काँग्रेसकडे वळत आहे,हे दिसतोय! नवीन वर्षात अयोध्यात राम मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले होईल. गेले कित्येक वर्षाचे हिंदू बांधवाचे स्वप्न पूर्ण पूर्ण होत आहे. हा राम मंदिर उभारणीचा उदघाटन व प्राणप्रतिष्ठापणाच्या सोहळ्याला पंतप्रधान मोदी उपस्थित राहणार आहेत. तसेच भारतातून लाखो भाविक अयोध्याला जाणार आहेत. या राम मंदिर सोहळ्याची इतिहासात सवर्ण अक्षराने लिहिला जाणार आहे. याच काँग्रेसने 'राम मंदिर बनायेंगे, लेकीन तारीख नही बतायगें'म्हणत भाजपाची खिल्ली उडविली होती. आता २२ जानेवारी प्रभूराम मंदिराची तारीख निश्चित झाली आहे. हा राम मंदिर होणे जगातील मानव जातीचा गौरव व अभिमानाची बाब आहे.तेंव्हा२२ जानेवारी दिन आहे,'विश्व मानवता धर्म' दिन म्हणून साजरा केला जावा, असे मत आहे. भाजपा मंदिर प्रश्नावर राजकारण करत आहे, असे काँग्रेस म्हणत आहे,तर मग हजसाठी अनुदान कसे काय दिले जात होते? याचा राजकीय फायदा कोणाला होता? विरोधी पक्षात अयोध्येला जाण्यावरुन संभ्रम आहे. जर आपण अयोध्याला गेलो तर पक्षाची धर्मनिरपेक्षता धोक्यात येईल,याची भीती वाटत असावी.कांही नेते पत्रिका मिळाली नाही म्हणून रुसलेले आहेत.राहूल गांधी यांचे गुरू सैम पित्रैदा प्रभू राम मंदिरबाबत वादग्रस्त विधान केले आहे. पित्रेदा हे भारतीय दळवळण क्रांतिचे जनक मानले जातात. ते शिकागो गेले व तेथे नग्न लोक व तेथील संस्कार पाहून मोहित झाले, त्यांनी आपले  सत्यनारायण गंगाराम पित्रोदाचे हे पाळण्यातील नावाचे नामांत्तर केले.बहूतेक,पित्रोदाच्या आई -वडिलांनी देवांचे नाव ठेवण्यात मोठी चूक केली,असे वाटले असावे. भारतात धार्मिक स्वातंत्र्य आहे.देश घटनेवर चालतो. भारतात प्रथम देश व घटना त्यानंतर धर्माला महत्व दिले जाते.पण मुस्लिम राष्ट्रात तसे नाही,पहिले धर्मानंतर राष्ट्राला महत्व दिले जाते.भारतात हिंदू व मुस्लिम बांधव एकत्र राहत आहेत.सामान्य मुस्लिम बांधव कट्टर नेत्यांच्या राजकारणाला कंटाळला आहे.कट्टर मुस्लिम नेते व काँग्रेस पक्ष भाजपा मुस्लिम विरोधी आहे!अशी भीती दाखवत असतात. भाजपा हा राजकीय पक्ष आहे.राजकीय नेते मात्र सनातन धर्माला संपविण्याची भाषा हिंदू धर्म धोका आहे,अशी भाषा बोलत आहेत. मोदी विरोधातून हिंदी भाषिक राज्यांचा,हिंदू धर्माचाआणि हिंदुस्थानचा अपमान केला जात आहे,पण दुर्देवाने काँग्रेस पक्ष त्या पंगतीत बसत आहे.याला काँग्रेसचे नेते आचार्य प्रमोद कृष्णन यांचा उघडपणे विरोध करत आहेत. काँग्रेसने पक्षाचा १३९ स्थापना दिवस साजरा केला.पण काँग्रेस पक्षाचा इतिहास खोटा सांगत आहेत.काँग्रेसची पक्ष चळवळ होती. त्याची स्थापना १८८५ मध्ये इंग्रज अधिकारी ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम यांनी केली. त्यानंतर या पक्षाचे १९६९ व १९७९ मध्ये विभाजन झाले. श्रीमती गांधी यांनी काँग्रस ( आर ) नंतर १९७९ मध्ये नवा काँग्रेस ( आय ) पक्ष स्थापन केला होता.तेंव्हा मूळ काँग्रेस पक्ष अस्तित्वात राहिलेला नाही! तरीही काँग्रेसने पक्षाचा खोटा स्थापना सोहळा साजरा केला. काँग्रेसचा हा गांधी परिवार सनातन हिंदू धर्म व आर.एस.एस.च्या विरोध करता. पण हा परिवार राष्ट्रविरोधी व कट्टरतेच्या विरोधात कधीच तोंड उघडत नाही. इंग्रज व काँग्रेसच्या नीतीने देशाचे विभाजन झाले.नेते राहूल गांधी हे काँग्रेस व भाजपामध्ये विचाराशी लढाई आहे.तसेच इंग्रज विरोधात त्यावेळेच्या राज्यांनी लढा दिलाच नाही,याची साठगाठ होती, असे ज्ञान पाजळले आहे.हे गांधी इतिहासकार नाहीत ते अर्धवटराव आहेत.मराठा सम्राज्यांनी, दक्षिणेत १८ व्या शतकात राणू वेलू निचियार व तामीळ नेता पुली थेवन, शीख साम्राज्याच्या राणी महाराणी जिंदकौर यांनी इंग्रजाच्या विरोधात लढा दिला. ईस्ट कंपनीच्या विरोध करणारे पझहस्सी हे पहिले राजपूत्र होते. त्यांना पहिले स्वातंत्र सैनिक मानले जाते. १८५७ मध्ये झाशीची राणींनी ईस्ट कंपनीच्या विरोधात लढा दिला. तेव्हा राहूल गांधीनी खोटा इतिहास सांगून शूर साम्रांज्याचा अवमान केला आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी बलिदान दिलेले आहे. केवळ नेहरू व गांधी परिवारामुळे देशाला स्वातंत्र्य मिळालेले नाही. दुसरे काँग्रेसने जातीयतेचा विरोध केला पण गांधी परिवार जातीयतेचा पुरस्कार करत आहेत. देशात गरीबी, युवक, शेतकरी, महिला हे कोणत्याही जातीचे असोत! त्यांच्या प्रश्न महत्वाचे आहेत. म्हणून पंतप्रधान मोदी या चार जाती,असे म्हंटले आहे. यावरुन गांधीनी मोदी ओबीसी कसे ? असा प्रश्न विचारला आहे, तर मग नेहरू व गांधी परिवाराचा वर्ग कोणता? हे सांगावे.काँग्रेस स्वातंत्र्यानंतर गांधीवादी विचाराला फारकत दिली.आज हा पक्षपरिवारवादी, भष्टाचारी, राष्ट्र व हिंदू विरोधी बनलेला आहे.त्यामुळेच  २०१४ व २०१९ मध्ये जनतेने काँग्रेसला नाकारले.त्यानंतर केंद्रात भाजपा व मोदीसरकार आले. हेच गांधी परिवाराला सहन होत नाही. काँग्रेसने ५५ वर्ष सत्तेत असताना केलेल्या घोडचूका व भ्रष्टाचार, गुलामी कायदे,तुष्टीकरण करत आलेला आहे. लोकशाहीत जनतेच्या मतावर सत्तांतर घडत असते.पण मोदींच्या नेतृत्वामुळे गांधी परिवाराला दिल्लीची गादी मिळाली नाही, याची सल आहे, त्यातून तो मोदींचा व्देष करत आहेत.  केंद्रात मोदी सरकारने दहा वर्षात अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यात देशावर करोनाचे संकट आले असताना मोदी सरकारने जनतेला बळ दिले,धैर्याने मुकाबला करण्याचे आवाहन केले. देशातील शेतकरी गरीब, मजूर यांचे काळजी घेत आहेत. त्यांना मोफत धान्य व आर्थिक मदत करत आहे. भारताने करोनावर प्रतिबंधक लस काढली व प्रथम देशातील जनतेला मोफत दिली. विरोधी पक्षाने याचेही राजकारण केले. स्वातंत्र्यनंतर इंग्रजकालीन इमारत ही संसदेसाठी वापरली जात होती. ही इमारत जीर्ण चालली होती व त्यात भविष्यात सदस्यांची वाढती संख्या लक्षात घेता नवीन संसद उभारणे गरजेचे होते.

गुलामीची प्रतिक असलेली इमारती ऐवजी भारताची स्वाभिमान संसदेची नवीन वास्तु उभारली.या वास्तुचे पंतप्रधान मोदी यांचे उदघाटन करणाऱ्यास विरोध झाला. इंग्रजांनी आपल्या सत्तेच्या विरोधात कोणी जाऊ नये, म्हणून कायदे केले. ते काँग्रेस सरकारने जतन केले.त्यात भारतीय दंड संहिता कायदा, १८८० सी.आर पी. १९७३ तर भारतीय पुरावा कायदा १८७२ सारखे कायदे स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने या कायद्यात कधीच बदल केला नाही! ७५ वर्षानंतर भारतात हे कायदे लागूच होते. पण मोदी सरकारने गुलामीचा कलंक असणारे तीन कायदे रद्द केले व त्याजागी भारतीय कायदे आणले आहेत. इंग्रजांनी सत्तेच्या विरोधात बोलणाऱ्या विरोधात राजद्रोह कायदा होता. तो स्वातंत्र्यानंतर लागू होता. आता तो कायदा रद्द केला गेला आहे. आता देशद्रोह कायदा आणला असून त्याची व्याख्या स्पष्ट केली आहे. राहुल गांधीनी 'मॉबलिंचिंग' वर भाजपाला लक्ष्य करत होते. पण कायद्यात मॉबलिंचिंगची व्याख्या नव्हती, आता त्याची व्याख्या करण्यात आली.त्यात फाशीची शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. नवीन अतिरेक्यांना कठोर शिक्षेची तरतूद केली आहे.काँग्रेस पक्षाचे सदस्य संसदेत हजर राहिले असते तर पक्षाचे वाभाडे निघाले असते, काँग्रेस सरकारचा नाकर्तेपणा समोर आला असता.म्हणून तर काँग्रेसने घुसखोरीचा बहाणा करत संसदेत हैदोस घातला. देशातील तथाकथित विचारवंत, चाटूगार पत्रकार मोदी व्देषातून काँग्रेस व विरोधी पक्षाची तळी उचलत आहेत. मोदी सरकारचा विकसित भारत संकल्प यात्रेचा चित्ररथावर महाराष्ट्रात फिरतोय! त्यावर मोदी सरकारची हमी, असे वाक्य आहे.त्यास कांही गावात काँग्रेसचे टगे त्याला विरोध आहेत. देशात नेहरू आणि गांधी परिवारांच्या नावाने अनेक योजना, संस्था, शैक्षणिक संस्था, रस्ते शासकीय संस्थाना आहेत. ती नावे पुसली जाणार आहेत काय? देशाचे पंतप्रधान मोदी गरीबांना योजनांची माहीती देत असतील तर त्यात काय चूक आहे ? खासदार, आमदार व नगरसेवक जनतेच्या पैश्यातून रस्त्याचे कामे करुन आपले उकळ पांढरे घेत त्यावर आपल्या नावाचे फलक लावतात, तेव्हा ते शेपटी घालून बसतात. राजकीय क्षेत्रात व्देषातून अश्या घटना घडतात पण मोदींच्या नावाला जनतेतून विरोध दाखविण्याचा चाटूगार संपादकाने केलेला प्रपंच आहे. हे निःपक्ष व वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या नावावर काँग्रेसचे तुणतुणे वाजवित आहेत. खर तर देशातील पत्रकार, विचारवंत व सामाजिक कार्यकर्त्यांनी काँग्रसची ५५ वर्षे सरकार आणि मोदी सरकारच्या १० वर्षाच्या कामांची प्रामाणिकपणे तुलना करावी. नवीन वर्षात मोदी सरकारचे फेब्रुवारी महिन्यात अर्थ संकल्पीय अधिवेशन होईल! त्यानंतर मार्च महिन्यात लोकसभेची निवडणूक घोषित होण्याची शक्यता आहे.त्यानंतर ऑक्टोबरमध्ये महाराष्ट्र नंतर वर्षात आंध्रप्रदेश, अरुणाचलप्रदेश, आडिसा, सिक्कीम, हरियाणा, झारखंड या राज्याचा निवडणूका होणार आहेत. काँग्रेस व विरोधी पक्ष केंद्रात सत्ता मिळविण्यासाठी वेगवेगळे हातखंडे वापरतील. यात जात, धर्म, पैसा, मोफत योजना घोषणांचा पाऊस पाडतील. काँग्रसचे नेते आतापासून मोदी सरकारने देशाचे वाटोळे केले! मोदीने सर्व महाग केले? असा भ्रम गरीब माणसापर्यंत पसवित आहेत.त्यात पक्ष माहिर आहे. राज्याचे नेते शरद पवार यांनी प्रभूराम राममंदिर राजकारण व व्यवसाय हे भाजपाला माहित आहे, अशी टिप्पणी केली. पवारांनी काँग्रेससोबत तुष्टीकरणाचा राजकीय धंदा केला नाही काय ? संजय राऊतसारखे वाचळवीर नेत्यांची अयोध्यात राम मंदिर उभारणीवरुन पोटदुखी सुरु झाली आहे. मोदी सरकारने भारतात प्रथम जी.२०.ची शिखर परिषद व अध्यक्षपद मिळाले. चंद्रायान -३ आदित्य एल-१ यश. प्रथम मोटो जीपीचे आयोजन, बाजरीचे संयुक्त राष्ट्रांनी २०२३ आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित करणे, ऑटो एक्सो चे आयोजन, देशात विश्वचषक क्रिकेटचे आयोजन केले. यात भारतीय संघ पराभूत झाला असला तरी देशाला यातून २० हजार कोटी रुपायाचा  फायदा झाला. यासर्व उपक्रमामुळे भारताचे जागात उंचावले आहे.आंतराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जात आहे, याचा अभिमान वाटत नाही.भारत वेगाने आर्थिक प्रगती करत आहे, आज जगात पाचव्या क्रमांकावर आहे.पुढे तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचे प्रयत्न आहेत.र स्ते, रेल्वे, विमानतळ,उद्योग आदी विकासाच्या कामांना गती मिळत आहे. यातून  लाखो लोकाना रोजगार मिळत आहे. त्याच बरोबर गरीब कुटुंबाला घर, धान्य पाणी, आरोग्य, आदी मोफत सोयी देण्यावर भर दिला जात आहे. देशात महागाई व बेकारी वाढली,असा काँग्रेसचा आरोप आहे. पण काँग्रेस  ५५ वर्षे सत्तेत राहून,महागाई व बेकारी दूर शकला नाही. आज ईपीएफ ओ' च्या नोंदणीनुसार जुलै महिन्यात १० लाख ८१४ नोंद आहे. १९६९ मध्ये "गरीबी हटाव'ची घोषणा केली होती, ती दूर झाली काय? काँग्रेसने राष्ट्रहितासाठी सकारात्मक बाजू कधीच घेतलेली नाही.आता मोदीला सत्तेतून घालविणे हेच 'इंडी' आघाडीचे ध्येय आहे. त्यांचेकडे विकासाचा कार्यक्रम नाही ना धोरण! ना नेत्याची निवड करता आली. काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जून खडगे यांचे नाव' चेहरा' पुढे केला गेला. मग गांधी परिवारांचे काय होणार ?त्यामुळे गांधी परिवार नाराज होईल, म्हणून खडगे हे सावध भूमिका घेत आहेत! खडगे स्वतः २०१९ चे लोकसभेचे पराभूत उमेदवार आहेत. देशात प्रथम काँग्रेस पक्ष इतका कुमकुवत कधी झाला नाही. कारण पक्षापेक्षा गांधी परिवार मोठा मानला जातो. पक्षात लोकशाही नावालाच आहे. हा पक्ष परिवाराच्या आदेश व आशीर्वादावर चालतो. काँग्रसमुळे काश्मिर पंडितांचा छळ झाला. संतावर गोळ्या झाडल्या. गांधीवादी नेत्यांनी ब्राह्मण व शीख हत्याकांड घडविले.लोकशाही पायदळी तुडवली.राहुल गांधी हे आता निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन 'न्याय यात्रा' काढत आहेत. त्यांच्या भारत जोडो यात्रेचा काँग्रेस पक्षाला फायदा झालेला नाही,पक्षाने  तीन मोठी राज्ये गमावली आहेत. काँग्रेसला प्रादेशिक पक्षाच्या कुबड्या घ्याव्या लागत आहेत. प्रत्येक राज्यात परिवाराचे साम्राज्य आहे.यात काँग्रेसचे "स्डँडवीच' होणार आहे.इंडी आघाडीकडे मोदींचा मुकाबला करणारा नेता नाही. भाजपाचे नेतृत्व जोपर्यंत मोदीकडे आहे, तोपर्यंत पक्षाचा पराभव होणार नाही. दुसरीकडे काँग्रेसचे नेतृत्व जोपर्यंत गांधी परिवाराकडे राहील, तोपर्यत पक्षाला भविष्य नाही, हे तितकेच खरे आहे. भाजपाने चाळीस टक्यांच्या मतात वाढ करुन ती पन्नास टक्के मतापर्यंत नेणे व चारशे जागांचे लक्ष ठेवले आहे. तेव्हा केंद्रात भाजपा व मोदी सरकार हॅटट्रिक करणार,हे निश्चितच!



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

एम बी बी एस झालेला, डोळ्यात भविष्याची स्वप्ने तरळत असलेला हा तरुण निश्चय करतो आदिवासींच्या सेवेचा. त्याच्यासाठी हे काम अजिबात सोपं नसतं. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुका आणि त्या तालुक्यातील हेमलकसा हे ठिकाण. इथे सुरु होतो लोकबिरादरी प्रकल्प. या क्षेत्रात माडिया, गोंड आदी आदिवासी जमातींचा निवास. त्यांची भाषा वेगळी. राहणी तर कमालीची साधी. अंगावर पुरेसे वस्त्रही नाही. शिकार करून मिळेल ते खायचे. नाही मिळाले तर उपाशी राहायचे. कुपोषित बालके जन्माला येणं ही तर जणू काही इथली परंपराच ! त्यातील काही योगायोगाने जगायचे आणि पुढे अनेक आजारांचे शिकार व्हायचे. बाळंतपणत होणारे मृत्यूही भरपूर. त्यांना कोणी काही सांगू गेले किंवा शिकवू गेले तर, त्या माणसाला ते आपला शत्रू समजायचे अशी सगळी परिस्थिती. अशा भयाण परिस्थितीत प्रकाशाची एक छोटीशी पणती तेवत होती ती प्रकाश आमटेंच्या रूपाने. जंगलामध्ये एक छोटीशी झोपडी उभारली गेली. या झोपडीला दारही नव्हते. प्रकाश यांची सहधर्मचारिणी मंदाताई या झोपडीतच त्यांच्यासवे आल्या. त्याही डॉक्टर होत्या. पण त्यांनीही आपल्या पतीसमवेत सेवाकार्यात स्वतःला झोकून दिले. आदिवासींमध्ये काम करणे सोपे नव्हते. अशा बाहेरच्या व्यक्तींना स्वीकारायला आदिवासी अजिबात तयार नव्हते. त्यासाठी या दाम्पत्याला त्यांची भाषा शिकावी लागली. त्यांच्याप्रमाणेच साधी राहणी ठेवावी लागली. हळूहळू त्या लोकांचा विश्वास या दाम्पत्यावर बसू लागला. ही माणसे आपल्याला मदत करण्यासाठीच आली आहेत अशी त्यांची खात्री झाली. लोकबिरादरी प्रकल्प मार्गी लागला. आदिवांसीसाठी दवाखाना, शाळा सुरु झाली.



## आनंदी पहाट

# परिस्थितीशी आत्मविश्वासाने जुळवून घेण्याचे कौशल्य

आधुनिक केसरी

आमचा अंतर्गत संवाद अनेकदा नीट आणि पूर्णपणे होत नाही. आपण ज्याची काळजी घेतो, त्याच्याशी कसे बोलायचे, हेच समजून घेत नाहीत. स्वतःशी बोलणे इतरांशी बोलण्यापेक्षा खूप वेगळे असते. हे विशेषतः परिपूर्णतावादी लोकांसाठी खरे आहे. स्वतःची टीका न करण्याचे आपण नेहमीच लक्षात ठेवावे. आपण अयशस्वी झाल्याबद्दल किंवा चुकल्याबद्दल स्वतःला दोष देण्याऐवजी, आपण विश्वासू मित्राला द्याल तोच सल्ला स्वतःला देण्याचा प्रयत्न करावा. स्वतःबद्दल खूप कठोर असणे खरोखर आपल्या कार्यक्षमतेत अडथळा आणू शकते. स्वतःशी अधिक दयाळूपणे वागणे हा तुमच्या मनाला यश मिळवून देण्याचा सर्वोत्तम मार्ग असू शकतो. सुधारित मनोवैज्ञानिक कल्याण आणि शरीराच्या चांगल्या प्रतिमेपासून वाढीव आत्म-मूल्य तसेच वाढीव प्रेरणा या सर्व गोष्टींशी आत्म-करुणा जोडलेली असते. म्हणून, स्वतःशी समजूतदार आणि दयाळूपणे बोलण्याची सवय लावावी. शारीरिक स्तरावर, नवीन गोष्टी शिकणे आपली मेंदूसाठी निरोगी ठरत असते. नवीन कौशल्ये शिकल्याने आपल्या स्मृती स्नायूंना वाकवण्यास आणि एकूण आठवण सुधारण्यास मदत होते. हे मेंदूतील न्यूरॉन्सला उत्तेजित करते, अधिक मज्जासंस्थेचे मार्ग तयार करते आणि विद्युत आवेग त्यांच्या ओलांडून वेगाने प्रवास करू देते. या दोन गोष्टी एकत्र केल्याने आपल्याला अनेक गोष्टी लवकर शिकण्यास आणि नवीन परिस्थितींशी आत्मविश्वासाने जुळवून घेण्यास मदत होते. नकारात्मक विचार आपले वजन कमी करतात आणि आपल्या व्यावसायिक तसेच वैयक्तिक जीवनावर परिणाम करू शकतात. नकारात्मक मानसिकता सकारात्मक दृष्टिकोनाकडे वळवण्यासाठी सराव करत राहणे आवश्यक असते. अपयशी होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अनुभवातून काहीही शिकणे होय. अपयशांना शिकण्याच्या अनुभवांमध्ये बदलण्यावर आपली उर्जा केंद्रित करावी. जेव्हा आपण आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करतो तेव्हा अनुभवातून शिकलेल्या, घेतलेल्या धड्याचा आपल्याला उपयोग होतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## कर्म..

आधुनिक केसरी

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन मा कर्मफलहेतुर्भुमा ते संगोऽस्त्वकर्माणि गीतेच्या या सार्थ शब्दातच सांगितले आहे की,फक्त कर्म करत राहा. फळाची अपेक्षा करू नका .पण आम्ही पामर सध्याच्या युगात वावरताना प्रत्येक कर्म करताना फळाची अपेक्षा ठेवतो. मी कोणाला तरी सकाळचा शुभ प्रभात मेसेज पाठवला. मग मला त्यांचा रिप्लाय का आला नाही? म्हणून नाराज होणारी लोकं खूप आहेत. रिप्लाय येण्याची वाट बघू नका. तुम्हाला कोणी सांगितलं मेसेज पाठवायला?.. पाठवला तर उत्तराची अपेक्षा नको!. या अपेक्षांचे ओझं वागवता वागवता माणूस भाराने वाकला. आणि त्यातच तो गुदमरून चालला. नवे काही करण्याची उमेद तो हरवून बसू लागला. जे शाश्वत आहे ते गोळा करा. आभासी जगात रममान होऊ नका. प्रत्येक पाऊल उचलताना निस्वार्थपणे उचला. उजव्या हाताचे दान डाव्या हाताला कळू देऊ नका. एखाद्याला मदत करताना ती उपकार म्हणून करू नका. ती मदतच असू द्या... कर्म करताना फलाची अपेक्षा ठेवली तर पदरी निराशा येते. मग मनाला दुःख होते. क्रोध यायला लागतो. प्रेमाची जागा द्वेषाने भरली जाते. हेवा, द्वेष, मत्सर, राग, घुणा, अपेक्षा या गोष्टी मेंदूत जमा झाल्याने शरीराची चाळणी होते. निरोगी शरीर रोगी व्हायला लागते. नको त्या गोष्टीचा विचार करून मेंदूचा भुगा होतो. कशासाठी हा एवढा त्रा???? फलाची अपेक्षा कोणाकडून?? कर्माकडून ?? होईल पूर्ण नक्कीच...... अपेक्षा जरूर करा... पण चांगले कर्म निःस्वार्थपणे सतत करत राहा. फल आपोआप मिळेल. अपेक्षा न करता वाईट कर्म चुकूनही करू नका. रागावर विजय मिळवणारा सर्वात मोठा आणि श्रीमंत व्यक्ती असतो. या त्रैलोक्याचा तो धनी असतो. शांत, संयमी, प्रेम, निःस्वार्थी, सालस, सात्विक, व्यक्तीच चांगले कर्म करू शकतात. रागीट, कपटी, स्वार्थी, मतलबी, लबाड, धूर्त,चलाख, दुतोंडी, वाचाळ असे लोक चांगले कर्म करू शकतात यात शंका आहे. वाईट कर्म केले तर त्याची परतफेड व्याजासह करावीच लागते. तेव्हा सात्विक कर्म करू या.... फळाची अपेक्षा न करता...

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.30

## हुशार शेतकरी

आधुनिक केसरी

एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याला प्राणी पाळण्याचा खूप खूप छंद होता. त्याच्याकडे शेळी मेंढी वाघ गाय अशा प्रकारचे खूप प्राणी होती. शेतात त्यांना रोज चारण्यासाठी घेऊन जाई. वाघ शेळी या दोघांना तो नेहमी सोबत ठेवत असत कारण वाघाला शेळी खाईल याची त्याला भीती वाटते. एके दिवशी तो नदी पार करून आपल्या शेतात जातो. मध्ये गेल्यावरती तो शेळी साठी एक गवताची पेंडी तयार करतो. व खूप पाऊस चालू होतो. त्याला घरी येता वेळेस नदी पार करून यावे लागत.
नदीला खूप पूर आला होता. शेतकरी शेळी वाघ व गवताची पिंडी घेऊन नदीकिनारी येतो. काही सुचत नाही की आता नदी कशी पार करावी.काय करावे असे तो विचारात पडतो तो मदत होईल का ते पाहू लागतो. किनारी त्याला एक नाव दिसते तो त्या नावे जवळ जातो. एका वेळेस दोन जणांना घेऊन जाईल या अवस्थेत होती. शेतकऱ्यापुढे प्रश्न पडला की आपण यांना नदीकिनारी कसे घेऊन जावे. शेतकरी विचार करतो की आपण जर पहिल्यांदा गवताची पेंडी घेऊन गेलो तर वाघ शेळीला खाऊन टाकेल व वाघाला घेऊन गेलो शेळी गवत खाऊन टाकेल.
तू विचार करतो आणि नावे मध्ये शेळीला घेऊन दुसऱ्या टोकाला सोडून येतो. सिंहाला घेतो आणि दुसऱ्या टोकावर ती सोडून येतो आता तो आधी आपल्यासोबत परत या टोकावर घेऊन येतो व गवताला घेऊन जातो परत तो वापस येतो व शेळीला घेऊन जातो. अशी करून तो नदी सुखरूप पार करतो.

## निरुपण


आधुनिक केसरी

ऐसा आनंद च्यारी देवस । सर्वेंच मांडिली कुसमुस ।
म्हणती हें गेलियां आम्हांस । पुन्हां आपदा लागती ॥ २४ ॥
म्हणौनी आणिलें तें असावें । येणें मागुतें विदेशास जावें ।
आम्ही हें खाऊं न तों यावें । द्रव्य मेळऊन ॥ २५ ॥
ऐसी वासना सकळांची । अवघीं सोईरीं सुखाचीं ।
स्त्री अत्यंत प्रीतीची । तेहि सुखाच लागली ॥ २६ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

निजाभ्यास ज्यों ज्यों बढ़ै,
त्यों त्यों थिर मन होय ।
आत्मिक बल दिन दिन बढ़ै,
कृशित गात द्युति होय ।।१४७।।
मधुर मधुर अनहद ध्वनि,
उठत सदा दिन रैन ।
सुनि सुनि उमगत प्रेम उर, शांति वृद्धि
चित चैन ।।१४८।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/१४७, १४८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : साधकाचा योगाभ्यास जसजसा वाढू लागतो, तसतसे त्याचे मन स्थिर होऊ लागते तथा आत्मबल उत्तरोत्तर, प्रतीदिन वृद्धिंगत होऊ लागते. साधन काळात साधकाचे शरीर बारीक होते, तरीही त्यात एक विशेष प्रकारची कांती आणि चमक दिसून येते. साधकाला रात्रंदिवस मधूर अनहद ध्वनी ऐकू येतात, जे ऐकून-ऐकून ह्दयात प्रभूप्रेम वाढू लागते. मनात शांती आणि चित्तात स्थिरता उत्पन्न होऊन ती वृद्धिंगत होते.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

..........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

आपण तर सर्व सामान्य माणसे, प्रत्येक डाव सरळ पडेल याची खात्री देता येत नाही. डाव भरकटला अस्ताव्यस्त झाला तरी डगमगून जाऊ नका. ही शिकवण हा समास ब्रम्हनिरूपण या माध्यमातून देतो. सतत संतांच्या वचनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करा. व जीवन सुफल संपूर्ण करा. अनुभवाचे प्रकार दोन आहेत. १ ) इंद्रियांच्या प्रचीतीवर आधारलेला दृष्य विश्वाचा अनुभव. २ ) अतिंद्रीय प्रचीतीवर आधारलेला परमात्म् स्वरूपाचा अनुभव.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## जनार्दन स्वामी


आधुनिक केसरी

श्री राष्ट्र संत जनार्दन स्वामी यांचा जन्म टापरगाव ,ता.कन्नड,जि. औरंगाबाद येथे गुरुवार दि.२४ सप्टेंबर १९१४ शके १८३६ रोजी सकाळी ७:४५ वा. पाटील कुटुंबात झाला. श्री संत जनार्दन स्वामी वयाचे १७-१८ व्या वर्षी असतांना आईचे महाप्रयान झाल्यानंतर श्री क्षेत्र अंदरसूलला १९४८ ते १९६४ या दरम्यान नागेश्वर शिवमंदिरात तपश्चर्या केली.वेद ,पुराण,गीता ,भागवत सर्व ग्रंथाचे अध्ययन व हटयोग,ध्यानयोग, करून श्री सदशिवाच्या साक्षात्कारापर्यंत उच्च स्थिती प्राप्त करून घेतली.श्री महामृत्युंजय भगवान शंकराच्या आदेशाने मग त्यानी श्री पिनाकेशवर येथील जीर्ण शिवालयाचा जीर्णोद्धार केला.त्या ठिकाणी त्यांचे अनेक लीला चमत्कार,जनतेला पाहण्यास मिळाले.

## सगुणभक्ति

आधुनिक केसरी

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ' मला सोने भेटवा ' असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी 'कुणाचा' आहे हे जर जाणले तर मी ' कोण ' हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ' मी ', त्याला पाहायला जंगलात जायला नको. ' माझेपण ' सोडावे म्हणजे ' मी ' चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले. पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास. सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वतः अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला ' सहजसमाधी ' असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ' राम सर्व करतो ' आणि ' राम माझा दाता आहे ' ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे.



रविवार, ३१ डिसेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १३७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 31 DECEMBER. 2023 adhunikkesari.com Adhunik Kesari ●YEAR-03 ●ISSUE-137 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# विकसित भारताच्या उभारणीला अयोध्या नगरीतून नवी ऊर्जा

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : रेल्वे स्टेशन, विमानतळाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या : देशाच्या इतिहासात ३० डिसेंबर ही तारीख खूप ऐतिहासिक आहे. या दिवशी १९४३ मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अंदमानमध्ये ध्वजारोहण करून भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. आज स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत अशा एका शुभदिनी आपण स्वातंत्र्याच्या अमर युगाचा संकल्प पुढे नेत आहोत. विकसित भारताच्या उभारणीला गती देण्याच्या मोहिमेला आज अयोध्या नगरीतून नवी ऊर्जा मिळत आहे. याठिकाणी १५ हजार कोटींहून अधिक रक्कम जमा झाली असून विकासकामांची पायाभरणी आणि उद्घाटन करण्यात आले आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी उत्तर प्रदेशातील अयोध्येतील रेल्वे स्टेशन आणि विमानतळाचे उद्घाटन केले. तसेच, १५ हजार ७०० कोटींहून अधिक किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. यादरम्यान त्यांनी एका कार्यक्रमाला संबोधितही केले. एक काळ असा होता की, रामलल्ला झोपडीत राहत होते, आता फक्त रामलल्लाच नाही तर देशातील चार कोटी गरीब जनतेलाही कायमस्वरुपी घर मिळाले आहे, असेही मोदी म्हणाले. आज देशात केवळ केदारधामचे पुनरुज्जीवन झाले नाहीतर ३१५ हून अधिक नवीन वैद्यकीय महाविद्यालयेही बांधली गेली आहेत. देशात केवळ महाकाल महालोकाचीच निर्मिती झाली नाही, तर प्रत्येक घरात पाणीपुरवठा करण्यासाठी २ लाखांहून अधिक पाण्याच्या टाक्याही बांधल्या.अयोध्येच्या विमानतळाचा उल्लेख करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, अयोध्या धाम विमानतळाचे नामकरण त्रिकालदर्शी महर्षी वाल्मिकी यांच्या नावाने केल्याने या विमानतळावर येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला आशीर्वाद मिळेल. महर्षी वाल्मिकी यांनी लिहिलेले रामायण हे ज्ञानाचा मार्ग आहे, जो आपल्याला भगवान श्री रामाशी जोडतो. आधुनिक भारतात, महर्षि वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ, अयोध्या धाम, आपल्याला दिव्य-भव्य-नवीन राम मंदिराशी जोडेल. संपूर्ण जग २२ जानेवारीच्या ऐतिहासिक क्षणाची आतुरतेने वाट पाहत आहे. अशा स्थितीत अयोध्येतील जनतेमध्ये कमालीचा उत्साह आहे. मी भारताच्या प्रत्येकाचा पूजक आहे. मीही तुमच्यासारखाच उत्सूक आहे. आम्हा सर्वांच हा जल्लोष आणि उत्साह अयोध्येच्या रस्त्यावर पूर्णपणे दिसत होता. जणू संपूर्ण अयोध्या नगरी रस्त्यावर आली आहे. या प्रेम आणि आशीर्वादाबद्दल मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

# विकसित भारत संकल्प यात्रेचा रथ हाकलला

## बार्शी व करमाळा तालुक्यातील प्रकार; गावकऱ्यांचा रोष

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** केंद्रातील मोदी सरकारने राबविलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी काढण्यात येत असलेल्या विकसित भारत संकल्प यात्रेला सोलापूर जिल्ह्यात दोन गावांतून तीव्र विरोध करून प्रवेश नाकारण्यात आला. बार्शी व करमाळा तालुक्यात हा प्रकार घडला. त्यावेळी गावक-यांचा रोष दिसून आला.
बार्शी तालुक्यातील पांढरी गावात विकसित भारत यात्रेचा रथ आला असता तेथे गावकरी एकत्र आले. यावेळी तरूण आणि वयोवृध्द शेतक-यांनी प्रथम मोदी सरकार या नावाच हरकत घेतली. कांदा व इतर पिकांचे दर गडगडले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काय केले ? व्यापा-यांचे भले करण्यासाठी शेतक-यांच्या पिकांवर गाढवाचा




नांगर फिरविण्यात आला आहे. वाढत्या महागाईत आमचे जागणेच मुश्किल झाले आहे, आशा शब्दांत गावक-यांनी संताप व्यक्त केला. यावेळी काहीजणांनी हातात लाकडी दांडके घेऊन विकसित भारत संकल्प रथ गावातून हाकलून दिला.
करमाळा तालुक्यातील पुनवर गावातही विकसित भारत संकल्प यात्रेचा रथ प्रवेश न देता परत पाठविण्यात आला. रथासोबत सरकारी कर्मचा-यांसोबात भाजपचे कार्यकर्ते होते. परंतु गावक-यांनी शेतीमालाच्या घसरलेल्या भावासह वाढलेली महागाई, मोदी सरकारची धोरणे, तसेच मराठा आरक्षणाच्या मुद्यावर प्रश्नांची सरबत्ती करून विकसित भारत संकल्प रथाला गावात थांबू न देता परत पाठविला. यावेळी संबंधित सरकारी कर्मचारी व भाजप कार्यकर्त्यांची अडचण झाल्याचे पाहायला मिळाले.




# सरले सरले हेही वर्ष सरले....

आधुनिक केसरी

मावळत्या दिनकरा तुला आमचा प्रणाम...
तू तुझे काम अगदी नित्य नियमाने करतोस. रोज सकाळी उगवतो ,रोज सायंकाळी मावळतो. पण, रोजच्या दिवसाकडे आपण कसं बघतो हे महत्त्वाचे आहे. सूर्य आपलं काम योग्य रीतीने पार पाडत असतो. पण,माणूस मात्र सगळ्या चांगल्या वाईट कामाचं खापर तो त्या दिवसावर फोडत असतो. खरंतर प्रत्येक दिवसाकडे तुम्ही कुठल्या दृष्टीने बघता हे खूप महत्त्वाचं असतं. काळाचे हे चक्र चालूच राहणार. दिवसामागून दिवस निघून जातील. वर्षामागून वर्ष सरून जातील. पण, मागील वर्षात आपण काय केले आणि पुढच्या वर्षात काय करणार आहोत याची चर्चा फक्त वर्षाच्या शेवटच्या दिवशीच होत असते. एक जानेवारीपर्यंत हा उत्साह खूप असतो पण, नंतर येरे माझ्या मागल्या.


सीमा देशमुख
अमरावती

कारण माणूस हा अतिशय स्वार्थी प्राणी आहे.तो सर्व कामांना आपल्या सोईनुसार आखत असतो आणि जर ते काम वेळात झाले नाही तर, म्हणतो की आजचा दिवसच खराब होता!
म्हणजे, अगदी सोयीस्कर रीत्या आपल्या न करतेपणाचे खापर तो त्या दिवसावर फोडतो. माणसाने प्रत्येक दिवसाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. ज्या दिवशी जे काम ठरवले ते पूर्ण झालेच पाहिजे असा निश्चय केला तर वर्ष कुठलेही असो आपल्याला यश नक्कीच मिळतं. खरंतर, वर्षातील प्रत्येक दिवस,प्रत्येक तास, प्रत्येक क्षण हा चांगलाच असतो. आपण सकारात्मक दृष्टीने प्रत्येक दिवसाकडे पाहिले पाहिजे. मागील वर्षात आपण काय- काय गमावले हे ही ध्यानात ठेवले पाहिजे.
ऋतुचक्राचे म्हणाल तर, मागील वर्षी पावसाळा मुक्काम ठोकून होता. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. अनेक राजकीय घडामोडी मागील वर्षात झाल्या. अनेक मोठे धक्के सर्वसामान्य जनतेने पचवले. महाराष्ट्राचे राजकारणात तर बरेच बदल झाले.बरेच नेते आपले मूळचे जे पक्ष होते ते सोडून गेले. मनोज जरांगे मराठ्यांसाठी उपोषणाला बसले. मराठ्यांचा आरक्षणाचा मुद्दा त्यांनी उचलून धरला.शिवमहा कथा पुराण या मुळे संपूर्ण देशाला वेड लावले मागच्या वर्षातील सर्वात गौरवास्पद आणि अभिमानास्पद घटना म्हणजे चांद्रयान 3 हे यशस्वीपणे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारे पहिलेच यान ठरले.सुवर्ण अक्षरात कोरून ठेवावी अशी ही घटना या वर्षी घडली. या घटनेमुळे भारताने जगात इतिहास रचला. मी भारतीय आहे याचा मला खूप खूप अभिमान वाटला. भारत आज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. भारताचे हे चंद्रावरचे यशस्वी पाऊल पुढील भविष्यात खूप चांगल्या गोष्टी घेऊन येणार आहे असं दिसतं. पूर्ण देशात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. या ऐतिहासिक क्षणांचे सर्व भारतीय साक्षीदार आहेत. दक्षिण ध्रुवावर पोहोचलेला भारत हा एकमेव देश असणार आहे.
ही खूप अभिमानाची गोष्ट या वर्षात घडली.क्रीडा क्षेत्रात म्हणाल,तर यावर्षी वर्ल्डकप आपल्या हातातून गेला. भारतीय खेळाडूंनी आपला संपूर्ण कस लावला पण, वर्ल्डकप मिळवू शकले नाही. असो! जिंकणे, हरणे चालूच राहणार! दोन घडीचा डाव याला जीवन ऐसे नाव अशा अनेक समिश्र घडामोडींनी घडलेलं मागचं वर्ष होतं. आनेवाला पल जानेवाला है... हो सके तो इसमे जिंदगी बसा लो, पल ये भी जानेवाला है....
म्हणून म्हणते, मंडळी येणाऱ्या वर्षाचे स्वागत सकारात्मक दृष्टीने करा. नवीन वर्षात तुम्ही केलेले जे निश्चय आहेत, ते पूर्ण करा.
कारण प्रत्येक दिवस हा चांगलाच असतो. आणि प्रत्येक वर्ष हे चांगलंच असतं. अलविदा 2023...



# नववर्षाच्या स्वागताला 'द दारूचा नव्हे तर द दुधाचा'; अंनिस राबविणार अनोखा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**
**निफाड :** रविवार दि. ३१ डिसेंबर २०२३ हा वर्षाचा शेवटचा दिवस व नवीन वर्षाचे स्वागत म्हणून जल्लोषात साजरा करण्याच्या निमित्ताने अनेक ठिकाणी मद्यपान केले जाते. त्यामध्ये सराईत मध्यपींसोबतच नवीन तरुण पिढी मद्यपानाची चव चाखण्याची दाट शक्यता असते. म्हणून महाराष्ट्र अंनिसच्या नाशिक शाखेतर्फे हुतात्मा स्मारका बाहेर दि.३१ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता, 'द दारूचा नव्हे तर द दुधाचा' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.
महाराष्ट्र अंनिस अगदी सुरुवातीपासून व्यसन विरोधी अभियान राबविते तसेच व्यसनमुक्तीसाठी समुपदेशन करते. दरवर्षी डिसेंबर महिन्यातला शेवटचा पंधरवाडा हा व्यसनविरोधी पंधरवाडा म्हणून महाराष्ट्र अंनिसच्या वतीने महाराष्ट्रभर विविध शाळा, महाविद्यालयातून तसेच सार्वजनिक ठिकाणी विविध प्रबोधनपर कार्यक्रम घेतले जातात. व्यसनामुळे गंभीर आजार होतातच परंतु व्यसनामुळे नपुंसकत्व येते तसेच व्यक्तीचा विवेक हळूहळू संपुष्टात येतो हे बऱ्याच लोकांना माहीत नसते. व्यसनी पदार्थांची सहज उपलब्धता, क्रिकेटवीर व सिनेकलावंत यांच्या व्यसनी पदार्थांच्या आकर्षक जाहिराती, महसूल मिळवण्याच्या नावाखाली जनतेच्या जीवाशी खेळ करणारे व्यसनाला मोकळीक देणारे शासनाचे धोरण, सण-समारंभ, सार्वजनिक कार्यक्रम यांमध्ये व्यसनाला मिळणारी सामाजिक प्रतिष्ठा, मान्यता अशा प्रमुख कारणांमुळे विशेषतः नवीन पिढी वेगवेगळ्या व्यसनांच्या आहारी जाताना दिसत आहे. अगदी शाळकरी मुलांपासून मद्यपानाचे व्यसन समाजात मूळ धरू लागल्याचे दिसत आहे ही अतिशय गंभीर बाब आहे.



त्यामुळे या उपक्रमात सहभागी होण्यासाठी अंनिसच्या वतीने सभासद नोंदणी सुरू आहे. तरी इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे महाराष्ट्र अंनिसचे डॉ.ठकसेन गोराणे, राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे, प्रा.डॉ.सुदेश घोडेराव, प्रल्हाद मिस्त्री, राजेंद्र फेगडे, नितीन बागुल, महेंद्र दातरंगे, ॲड.समीर शिंदे, प्रा.आशा लांडगे, कोमल वर्दे आदींनी आवाहन केले आहे.


# संस्कृती आणि धर्म



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**श्रेष्ठ कोण धर्म की संस्कृती? असा जर प्रश्न कोणी उपस्थित केला तर आपणास नि:संदिग्धपणे कदाचित उत्तर देता येणार नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपण या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत असे कधी समजलेच नाही, त्यामुळे त्या अनुषंगाने विचार करण्याचा प्रश्नच नाही. व्यक्ती आणि समाजाचा अनुबंध राखण्याच्या उद्देशाने निर्माण झालेल्या इतर सामाजिक संस्था आणि संस्कृती यात आपण भेद करत नाही. त्यामुळे संस्कृतीचा वेगळा विचार करण्याची काही आवश्यकता आहे असे आपणास वाटत नाही. खरेतर सर्व सामाजिक संस्थांची जननी म्हणूनच संस्कृतीकडे पाहिले पाहिजे. तर धर्म हा त्या सामाजिक संस्थांचे प्राधिकरण होय.**



## क्षितिजापल्याड

संस्कृती माणसाला माणूस असल्याचे मूल्य प्राप्त करून देणारी निरंतर प्रक्रिया होय. भौतिक-अभौतिक बाबतीत असणारे मानवी कुतूहल आणि जिज्ञासा यांची काही प्रमाणात पूर्तता करण्याचे काम संस्कृती करते. मानसिक पातळीवर काम करणारी ही प्रक्रिया अत्यंत सौम्यपणे आपले काम करते. विचार आणि आचारातील तफावत सामावून घेऊन परिस्थितीजन्य विचार करणे आणि संतुलन राखण्यावर संस्कृतीचा नेहमीच भर असतो. एकाच संस्कृतीचे अनेक संप्रदाय असू शकतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्यातील विचारांचा आपण लावलेला वेगवेगळा अर्थ होय. भारतीय संस्कृती असे म्हणत असताना यात हिंदू, जैन, बौद्ध, शीख, वारकरी, महानुभाव, लिंगायत, आस्तिक, नास्तिक अशा कितीतरी विचारधारा दिसून येतात. हेच आपणास मध्य युरोपातील ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लामच्या बाबतीत देखील म्हणता येईल. संस्कृती या पुस्तकात इरावती कर्वे यांनी धर्माच्या अनुषंगाने काही विवेचन केले आहे. त्या म्हणतात धर्म म्हणजे माणसाने समाजात वागावयाचे नियम. हे नियम लिखित असतील किंवा अलिखित असतील, त्या नियमांचे कर्तृत्व संत, ऋषी, द्रष्टे किंवा प्रत्यक्ष देव याकडे सोपविलेले असेल किंवा परंपरागत वाडवडिलांपासूनची चाल आहे इतपतच असेल. त्या नियमानुसार न वागणाऱ्याला उपहासापासून राजदंडापर्यंत काहीही शिक्षा असू शकेल. धर्माची अशी व्याख्या केली म्हणजे जे इतर अनेक अर्थ आहेत, ते निदान या विवेचनापुरते तरी संमत नाहीत हे स्पष्टच आहे. येथे धर्म हा शब्द इतक्या व्यापक अर्थाने योजला आहे की कोणत्याही मानव समाजात रूढ असलेल्या आचार यंत्रणेला तो लागू पडावा. इरावती कर्वे यांच्या मते धर्म म्हणजे संहितापालन न करणाऱ्याविरुद्धचे दंडविधान होय. एका बाजूला संस्कृती रक्षणाचे कार्य धर्माच्या अखत्यारीत आले असे वाटले तरी सांस्कृतिक मूल्यांचा आणि जीवनप्रणालीचा वेगळा अर्थ लावून चिंतकांनी आपला वेगळा रस्ता चोखाळला आणि त्यातून अनेक गट बाहेर पडले, असाही त्याचा अर्थ होतो. सर्वच संस्कृती फार उदात्त, व्यापक आणि सहिष्णू होत्या असे म्हणणे धाडसाचे ठरत असले तरी ज्या संस्कृतीतून धर्माची निर्मिती झाली त्या धर्माच्या बंदिस्त चौकटीएवढी बंदिस्तता तर नक्कीच नव्हती. अलीकडच्या शंभर दीडशे वर्षांपूर्वी जगात कोणीही कोठेही मुक्त संचार करू शकत होता. त्याला पासपोर्ट किंवा व्हिसा काढायची काही आवश्यकताच नव्हती, परंतु आज जागतिक संचारावर बंधने आली. तद्वतच धर्म हा आजचा व्हिसा आहे. तुम्ही जेथे आहात तेथेच असले पाहिजे. नाहीच जमले तर व्हिसा मिळवून धर्म परिवर्तन करणे हा मार्ग उरतो. पण मुक्त संचार वगैरे नाही. पूर्वीच्या काळी एकाच कुटुंबातील व्यक्ती वेगवेगळ्या देवतांच्या उपासक होत्या. जसजशी धर्माने जनमानसाची पकड घेतली, एकप्रकारची बंदिस्त विभागणी कुटुंबाची, समाजाची झाली. धर्माच्या जेवढ्या व्याख्या आज प्रचलित आहेत, त्या सर्व व्याख्यांच्या माध्यमातून धर्माची जी चांगली बाजू आहे ती बिंबवावी लागली, मर्यादांचा मात्र कोठेच उल्लेख सापडत नाही. खरेतर ही चलाखी आहे. पुराणे, जातककथा किंवा आख्यायिका किंवा विविध प्रेषितांच्या चरित्रात्मक कथांच्या माध्यमातून धर्म आणि धार्मिकतेसंबंधी बाबी बिंबवण्यात धर्म यशस्वी झाला. आज धर्माच्या आच्छादनाखाली सर्व समाज आहे. समाजालाही हे आच्छादन सुरक्षित वाटणे साहजिक आहे. कारण बाहेरच्या मुक्त वातावरणाची सवय कोणालाच राहिली नाही. धर्माच्या आरक्षणातील संरक्षणात माणसाची केविलवाणी फडफड उन्मुक्तपणे भरारी घेण्यास पुरेशी नाही. जणू पंखांना ती सवयच राहिली नाही. माणसातील सामाजिकता हा धर्माचा विषय नसून तो संस्कृतीचा विषय ठरत असला तरी आपण या बाबींचा विचार देखील धर्माच्या अनुषंगाने करतो ही विलक्षण गोष्ट म्हणावी लागेल. माणसा माणसातील भेदभाव कमी करून विषमता आणि सर्व प्रकारची गुलामगिरी समाजातून हद्दपार करायची असेल तर माणसातील स्वार्थीपणा आणि हिंसेला तिलांजली देणे आवश्यक ठरते. धर्म समुहाला आवाहन करतो तर संस्कृती आणि सांस्कृतिक मूल्ये ही वैयक्तिक बाब ठरते, त्यामुळे नवसमाजाच्या निर्मितीसाठी सर्वांना सामावून घेणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांचे बीजारोपण करणे आणि संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. धर्म म्हणजे कर्तव्य, धर्म म्हणजे नैसर्गिक सवय असाही एक अर्थ आपण घेत असतो. पण धर्म म्हणजे



सामुहिक दंडविधान, धर्म म्हणजे सामुहिक दडपशाही आणि धर्म म्हणजे सामुहिक शोषणप्रणाली असाही अर्थ त्यातून ध्वनीत होतो. येत्या पाचशे ते हजार वर्षांत धर्माच्या अनुषंगाने सामुहिक दडपशाहीतून सुसंघटित हुकूमशाही जन्मास येईल. तुम्ही त्याचा प्रतिकार हिंसेच्या माध्यमातून करायचे ठरविले तर ती अधिकाधिक आक्रमक होईल. कारण हिंसेला हिंसा हेच प्रत्युत्तर असेल. कारण सांस्कृतिक मूल्यांना अनुसरून दंडहीन समाजाची रचना करणे हे समाजधुरिणांचे स्वप्न असेल तर दंडात्मकतेतून समाज नियंत्रण हे धर्म आणि त्यातून निर्माण होणाऱ्या हुकूमशाहीचे कर्तव्यपालन असेल. आज लोकशाही शासनव्यवस्थेत धर्म आणि राज्य या बाबी आपण वेगळ्या ठेवण्यात काही प्रमाणात यशस्वी ठरलो आहोत, परंतु येणाऱ्या काळात मात्र धर्माचा विळखा सर्व सामाजिक आणि राजकीय संस्थांच्या भोवती आवळला जाणार. कारण धर्माची सुरुवात जेव्हापासून झाली तेव्हापासून आजपर्यंत धर्माने सर्व जागा व्यापत आपले अस्तित्व अधिकाधिक व्यापक करत मार्गक्रमण केले आहे. आज धर्म म्हणजे फक्त पूजापाठ आणि स्तोत्रस्तवन एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले आहे असे कोणीही म्हणणार नाही. भांडवली उद्योगात वित्तीय अरिष्टे येणे हे भांडवलाचे जसे वैशिष्ट्य असते तसेच धर्म सर्व बाबींना गिळंकृत करून दशांगुळे उरणे हे त्याचे वैशिष्ट्य होय. सामान्य देवभोळी माणसे आणि त्यांची संस्कृती व धर्माची अदृश्य प्रसरणशील शक्ती याचा काहीच संबंध नाही. त्यामुळे माझा धर्म असा नाही हाच कंठशोष करत बसण्यापेक्षा त्यांच्या हाती तर काय असणार आहे. सर्वांची सांस्कृतिक मूल्ये समान असूनही हजारो वर्षापासून जो रक्तपात होत आला तीच युद्धे भविष्यातही लढली जातील. आणि हे सर्व धर्माच्या नावाने होईल. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# मूल्यांची रुजवण करणारा - अलादीनचा नवा चिराग




गुलाब बिसेन
संपर्क क्र. 9404235191

आधुनिक केसरी

**इयत्ता ५ वीच्या बालभारती पाठ्यपुस्तकातील "कठीण समय येता" या पाठाचे लेखक मनोहर भोसले हे संवेदनशील लेखक म्हणून सर्वश्रुत आहेत. प्रौढ साहित्यासोबतच ते सातत्याने बालसाहित्याचे लेखन करत आले आहेत. त्यांच्या अनेक बालकथा प्रमुख मासिकांतून प्रकाशित झालेल्या आहेत. आता ते बालवाचकांसाठी "अलादीनचा नवा चिराग" हा बालकथा संग्रह घेऊन आले आहेत. बालमन हे अत्यंत संवेदनशील असते. आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटना ते सतत टिपत असते. अशा संवेदनशील मनाला अधिक सुसंस्कारीत करण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज असते. ती गरज बालसाहित्यातून सहज पूर्ण होवू शकते. हाच प्रयत्न लेखक मनोहर भोसले यांनी या पुस्तकातून करण्याचा प्रयत्न केला आहे.**

आपल्या अवतीभवती वावरणारे पशुपक्षी या पर्यावरणाचा महत्वपूर्ण भाग आहेत. अशा पशुपक्ष्यांचा सांभाळ करण्याची भावना बालमनात रूजवण्याचा प्रयत्न "चिव चिव चिव.जीव लावा जीव." या कथेतून लेखकाने केला आहे. या कथेतला जितू, त्याचे चिमण्यांसाठी दुकानातून धान्ये गोळा करणे यातून त्याची चिमण्यांना वाचवण्यासाठीची धडपड बालमनात खोलवर रूजून बसते.पर्यावरण आणि मानव यांचे नाते हे परस्पर पुरक असल्याने एकमेकांची काळजी घेणे काळाची गरज आहे. मधमाशा मारायला आलेल्या माणसापासून मधमाशांना वाचवण्यासाठी पूर्ण ताकदीने झाड हलवून मधमाशाचे पोळे उडवणारा बंड्या हा खोडकर मुलगा वाचकाला "गुपचूप गुपचूप.चुपगूप चुपगूप" या कथेतून भेटतो. या कथेचा नायक असलेला बंड्या आपल्या कृतीतून मधमाशांचे पर्यावरणाच्या दृष्टीने असलेले महत्व अधोरेखीत करत वाचकांना मधमाशांचे महत्व पटवून देतो. "दहा रूपयांचे भांडवल" या कथेत शाळेत हुशार असलेला सोनू महागडी पुस्तके परवडत नसल्याने आपली वाचनाची भूक भागवण्यासाठी एक नविन शक्कल लढवतो. बाबांकडून रडून दहा रूपये घेवून त्या दहा रूपयांत शेजारच्या काकांकडील रद्दी घेतो. त्या रद्दीतून आपल्या वाचनासाठीच्या पुरवण्या आणि उपयुक्त माहिती काढून घेवून ती रद्दी दहा रूपयाला रद्दीवाल्याला विकतो. यातून तो बाबांनी दिलेले दहा रूपये जसेच्या तसे वाचवतो, सोबतच वाचन, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर, सुविचार संग्रह असे छंदही जोपासतो. पारध्याच्या पिंजऱ्यातून पोपटांची सूटका करवून घेणाऱ्या नील आणि त्याचे मित्र "असा हा एक सर्जिकल स्ट्राइक" या कथेत भेटतात. पारध्याच्या कैदेतील पोपटांना सोडवण्यासाठी त्यांची धडपड आणि त्यांनी केलेली युक्ती वाचकाला वेगळा थ्रील अनुवण्याची संधी देतात. त्यांना अप्रत्यक्षपणे साथ देणारे शाळेचे मुख्याध्यापक वाचकाला आपलेसे वाटतात. या पुस्तकाची शीर्षक कथा असलेली "अलादीनचा नवा चिराग" बालवाचकाला नवी दृष्टी देणारी आहे. अभ्यासात आळस करणारा अलादीन सर्व कामे जिन्नीच्या जादूने करून घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु हुशार जिन्नी तसे करायला स्पष्ट नकार देतो. जन्माला आलेला प्रत्येक बालक हा जिन्नच असतो. त्याच्याकडे स्वतःची बुद्धी, शक्ती असते. असे समजावणारा जिन्न तसेच अलादीनला "मोबाईल" रूपी जादूच्या चिरागाविषयी सांगताना मोबाईल जेवढा चांगला तेवढाच घातकही असल्याची जाणीव करून देतो. मोबाईलचा डोळसपणे गरजेच्यावेळीच उपयोग करायला हवे हे वाचकाच्या मनावर बिंबवण्याचे काम ही कथा नकळत करते. या संग्रहातील "पी फॉर पारितोषिक" ही कथा अनोळखी व्यक्तिच्या गाडीवर न बसणारी मुले आणि अनोळखी व्यक्तिची गाडी थांबवून बसणारी मुलगी अशा दोन बाजूंनी कथा पुढे सरकते. स्वसंरक्षणाचे धडे गिरवलेली श्रेया शाळेत आलेल्या



पाहुण्यांच्या "तुला, एखाद्या माणसाने किडनॅप केलं तर?" या प्रश्नावर ती "के फॉर खल्लास. कायमचा." असे बिनधास्त उत्तर देत पाहुण्यांना आश्चर्यचकीत करते. मी तलवारबाजी, कराटे, बॉक्सिंग शिकले आहे असे सांगते. ही कथा आजची मुलगी ही बिचारी नसून ती विचारी आणि सक्षम असल्याचे दर्शवते. शाळेतील शिक्षक आणि पालक यांच्या नातेसंबंधावर प्रकाश टाकणारी "पालकांनी.शिक्षकांशी मैत्री करावी." ही कथा शिक्षकांच्या कामापेक्षा पगारावर बोट ठेवणाऱ्यांच्या डोळ्यात अंजण घालण्याचे काम करते. सोबतच शिक्षक - पालक नातेसंबंध चांगले असतील तर मुलांच्या प्रगतीची दारे खुली होतात याचा धडा वाचकाला देवून जाते.

चॉकलेट, गोळ्या खावून दात किडलेला हट्टी बिट्टू "मचक पचक" या कथेत भेटतो. तो आईकडून पैसे घेवून चॉकलेट, गोळ्या खातो. आईने सांगितलेले अजिबात ऐकत नाही. शेवटी आई गावात आलेल्या माकडवाल्याची मदत घेते. माकडवाला आपल्या माकडाला बिट्टूचे नाव घेवून प्रश्न विचारतो. माकडाच्या कृतीने सगळी मुले बिट्टूला हसतात. त्यामुळे सर्वांसमोर बिट्टूला आपली चूक समजते. या कथेत माकडवाला माकडाच्या माध्यमातून मुलांना सकाळ संध्याकाळ दात घासायचे शिकवून जाते. "विद्यार्थीप्रिय" ही कथा शाळेसमोर गोळ्या विकणारी आजी, मुख्याध्यापकांच्या आज्ञेवरून तिला हाकलण्याचा प्रयत्न करणारा शिपाई आणि शेवटी आजीला चॉकलेट ऐवजी फळे विक्रीसाठी फळे देवून शाळेच्या आवारात फळे विकायला परवाणगी देणारे मुख्याध्यापक वाचकाच्या मनात घर करून जातात.

"गर्व आहे मला मी रोबोट असल्याचा" या कथेतून शाळेच्या स्नेहसंमेलनात रोबोट बनून भाग घेणारा रोहन कार्यक्रमात वाया जाणारे अन्न, शेतात राबणारा शेतकरी, शिक्षक पालकांचे न ऐकणारी मुले, कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या इत्यादी समस्यांवर भाष्य करताना दिसतो. मानवी मूल्यांची बालमनात रूजवण करण्यात लेखक मनोहर भोसले हे या कथासंग्रहाच्या माध्यमातून यशस्वी झाले आहेत. या कथा वाचताना वाचकाला स्वतःमध्ये डोकावून बघायला भाग पाडतील ही आशा आहे. या कथांग्रहाची पाठराखण राज्य शासन पुरस्कार प्राप्त लेखक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केली असून गौरव साहित्यालय, सोलापूर यांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे. निश्चितच अलादीनचा नवा चिराग हा कथासंग्रह प्रेरणादायी आहे. कायमस्वरूपी संग्रही ठेवावा असा आहे.

**पुस्तकाचे नाव - अलादीनचा नवा चिराग**
**लेखक - मनोहर भोसले**
**प्रकाशक - गौरव साहित्यालय, सोलापूर**
**मूल्य - १३० रू.**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कमी वयाच्या मुलांवर शहर वाहतूक शाखेने केली दंडात्मक कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहर वाहतूक शाखेची विद्यार्थी व कमी वयाच्या मुलांवर कारवाईची मोहीम राबवण्यात आले आहे मो.वा.का कलमा नुसार सदर विद्यार्थ्यांना ५००० रुपये दंड लावण्यात आला आहे.
धुळे शहरात शाळा व महाविद्यालयातील विदयार्थ्याकडे वाहन चालविणे बाबत कोणताही परवाना नसतांना पालक आपली वाहने पाल्याच्या ताब्यात देतात. सदर वाहने चालवुन विदयार्थी महाविदयालयात ये-जा करतात. यावेळी पाल्यांच्या व इतर वाहन धारकांच्या जिवास धोका निर्माण होतो. या प्रकारास आळा घालण्यासाठी आज दिनांक २९ रोजी सकाळी ११.०० ते १२.३० वाजे पावेतो शहर वाहतुक शाखेकडुन कालीका माता मंदिर येथे विशेष मोहिम राबविण्यात येवुन त्यात ०८ शालेय विदयार्थी यांचेविरुध्द मो.वा.का. कलम ३ (१)/१८१ प्रमाणे कारवाई करुन प्रत्येकी रुपये ५०००/- दंड वसुलीची कारवाई करण्यात आलेली आहे. तरी सर्व पालकांनी आपल्या शाळा / महाविदयालयात शिक्षण घेत असलेल्या पाल्याजवळ लायसन्स असल्या खेरीज त्यांना वाहन चालविण्यास देवु नये. असे आवाहन भुषण कोते प्रभारी अधिकारी शहर वाहतुक शाखा धुळे यांनी केले आहे.



# शासकीय कर्मचाऱ्यांनो, गळ्यात घाला ओळखपत्र

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व संभाजीनगर जिल्ह्यात नागरिक विविध कामानिमित्त शासकीय कार्यालयात येतात. त्यांच्या कामाशी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम माहीत होण्यासाठी तसेच त्यांची भेट घेण्यासाठी संबंधितांची ओळख पटणे आवश्यक असते. परंतु, अनेक अधिकारी, कर्मचारी हे ओळखपत्र गळ्यात घालत नाहीत. त्यामुळे अशांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन तुपे यांनी दिला आहे. पंचायत समिती स्तरावर शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती व लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातून ग्रामस्थ येतात. परंतु, शासकीय कार्यालयात कार्यरत अनेक अधिकारी, कर्मचारी ओळखपत्र लावत नसल्याने कोणत्या योजना कोणत्या शाखेमार्फत राबविल्या जातात हे त्यांना कळत नाही. जिल्ह्याच्या विविध भागातून आलेले हे शेतकरी, ग्रामस्थ हताश होऊन इतरत्र विचारणा करतात. मात्र, कर्मचारी, अधिकारी देखील त्यांना व्यवस्थित उत्तरे देत नाहीत किंवा आपले ओळखपत्र दाखवत नसल्याच्या तक्रारी जिल्हा परिषदेला प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने तुपे यांनी पत्र जारी केले आहे.




# चिंचोली लिंबाजी बीटस्तरीय पालकांच्या क्रीडा स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी : गुरुवारी** चिंचोली बिट अंतर्गत सर्व केंदप्रमुख कौतिक सपकाळ सर , भिमसिंग बिलंगे सर, दिलीप बळे सर, सतीश चेंडके सर यांच्या उपस्थितीत तसेच पालकांच्या उत्साहात सर्व स्पर्धा पार पडल्या. मा.उपसरपंच जगन्नाथ पवार चिंचोली लिंबाजी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये पालक यांचा शाळेप्रती सहभाग वाढावा जाणीव जागृती होऊन शाळेच्या विविध उपक्रमात लोक सहभाग वाढवण्याच्या उद्देशाने क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. याप्रसंगी प्रास्ताविक केंद्रप्रमुख बीलंगे सर व सपकाळ सर यांनी केले. नागापूर,शेलगाव करंजखेड आणि चिंचोली या केंद्रातील संघ स्पर्धेस उपस्थित होते. याप्रसंगी भारत सपकाळ सर,शैलेंद्र सोळंके सर , प्रशांत मोरे सर, रुपेश भोयर सर, गजानन ढोले सर, महेश दादेवाड सर,दीपक अहिरे सर, बापूसाहेब बिरारे सर, राजेश चव्हाण सर, स्वप्ना पाटील मॅडम, सोनाली तातडे मॅडम यांनी सहकार्य केले. पंच म्हणून सर्व स्पर्धेसाठी अवधूत गर्जे सर, हनुनान



जाधव  सर ,योगेश थोटे, सचिन पवार, गौरव अहुजा, ज्ञानेश्वर जाधव, निखिल तायडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रंचालन शिवनाथ वाढेकर सर यांनी केले आणि आभार प्रदर्शन गुटीराम वीर सर यांनी केले.

# पौष्टिक तृणधान्यनिमित्त आयोजित शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय सिल्लोड यांच्या वतीने आकाश ॲग्री सोल्यूशन्स लिमिटेड सिल्लोड येथे पाककृती स्पर्धा, प्रचार प्रसिद्धी व जनजागृती तसेच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता यात प्रशिक्षण सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी छत्रपती संभाजीनगर पी. आर. देशमुख व डी. एस. कुलकर्णी सेवानिवृत्त कृषि अधिकारी होते. आजच्या शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळेची प्रस्तावना उपविभागीय कृषि अधिकारी सुभाष आघाव यांनी केली, त्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी छत्रपती संभाजीनगर पी. आर. देशमुख यांनी व महिला बचत गटाच्या प्रतिनिधी यांनी केले. जिल्हा



अधिक्षक कृषि अधिकारी छत्रपती संभाजीनगर पी. आर. देशमुख यांनी पौष्टिक तृणधान्याचे महत्त्व याबाबतची माहिती दिली. सेवानिवृत्त कृषि अधिकारी डी. एस. कुलकर्णी यांनी पौष्टिक तृणधान्याचे आहरातील महत्त्व सांगितले. तसेच आहारात ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राजगिरा, राळा, कोडो इ. पिकांची उत्पादकता वाढविणे, उत्पादन वाढविणे, पिकाखालील क्षेत्र वाढविणे व या तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योग याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच तृणधान्याचा वापर वाढविण्याची गरज सांगण्यात आली.
आजच्या कार्यक्रमात सिल्लोड, सोयगांव व कन्नड येथील महिला शेतकरी गटातील महिला यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता यापैकी सोयगांव तालुक्यातील प्रगती महिला शेतकरी गट, कृषि वसंत महिला शेतकरी गट, बळीराजा शेतकरी गट कंकराळा व प्रगती महिला शेतकरी गट फर्दापूर यांनी पाककृती स्पर्धेत भाग घेतला होता यातून प्रथम क्रमांकासाठी संगीताबाई विठ्ठल बडकणे व द्वितीय क्रमांकासाठी गीताबाई रूमसिंग महेर यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या महिलांना आयोजक व स्पर्धेचे मुख्य निवडकरते यांचे मार्फत गृहउपयोगी वस्तू पारितोषिक म्हणून देण्यात आली.

# पैठण तालुका माहेश्वरी सभेच्या अध्यक्षपदी पवन लोहिया

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुका माहेश्वरी सभेच्या अध्यक्षपदी पैठण येथील  माहेश्वरी समाजाचे सक्रिय सहभाग असणारे पवन नरसिंगदास लोहिया यांची निवड करण्यात आली. या प्रसंगी त्यांचे महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे अध्यक्ष मधुसूदन गांधी ,जिल्हा अध्यक्ष श्यामसुंदर सोमाणी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी अखिल भारतीय माहेश्वरी महासभा सदस्य श्री नंदलालजी लाहोटी,जिल्हा सचिव अजित नावंदर ,जिल्हा उपाध्यक्ष सचिन लखोटीया, तालुका सचिव जगदिश नागोरी हे उपस्थित होते.त्यांच्या ह्या निवडीचे समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे..!



# लाल समुद्रातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आयात-निर्यात प्रभावित



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**लाल समुद्रात सुरु असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतासह बहुतांश देशातून होणारी आयात-निर्यात प्रभावित झाली आहे. देशातून फळे, भाजीपाल्या सोबतच अन्नधान्याची निर्यातही जास्त काळ प्रभावित होईल असा अंदाज आहे. जहाजांच्यावर ड्रोनच्या मार्फत हल्ला झाला म्हणून जागतिक व्यापार ठप्प झाले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर होणा-या व्यवहारावर याचा विपरित परिणाम होत आहे.**

**खाद्यतेल आयात :-** केंद्रसरकारने खाद्यतेलाची उपलब्धता वाढविण्यासाठी मार्च २०२५ पर्यंत खाद्यतेलावरील कमी आयात शुल्काने आयातीस मंजुरी दिली. रिफाईन्ड सोयाबीन तेल आणि रिफाईन्ड सुर्यफूल तेलावरील करामधील सवलत मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. खाद्य तेलाचे भाव स्थिर राहतील असे वाटते. देशाला लागणा-या खाद्यतेलापैकी ६० टक्के खाद्यतेल आयात करावे लागते. इंडोनेशिया आणि मलेशियातून सर्वात जास्त खाद्यतेलाची आयात होते.

मसूर डाळीचे आयातशुल्क माफः- केंद्र सरकारने मसूर डाळीचे आयातशुल्क मार्च २०२५ पर्यंत माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात डाळीचा पुरवठा स्थिर ठेवण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. आयातधोरणाच्या स्थिरतेसाठी हि सवलत मार्च २०२५ पर्यंत वाढविनण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. आयातशुल्क माफीमुळे देशांतर्गत मसूर डाळीची उपलब्धता वाढणार असून किमती कमी होण्यास मदत मिळेल.

द्राक्षः- दक्षिण आफ्रीकेतून युरोपात मोठ्या प्रमाणात द्राक्षाचा पुरवठा सुरु आहे. द्राक्षासाठी अनुकूल वातावरण मिळाल्यामुळे दक्षिण आफ्रीकेतील द्राक्षाची गुणवत्ता चांगली आहे. पण तरीही मागील वर्षाच्या तुलनेत निर्यातक्षम उत्पादन १६ टक्के ने कमी आहे, तर डिसेंबर मध्यापर्यंतचे निर्यातही ३४ टक्के ने कमी आहे. सध्या युरोपमधून द्राक्षाला चांगली मागणी मिळत आहे.

DOC ची निर्यात :- २०२३ -२४ या हंगामात DOC ची निर्यात ४५ लाख टनावर पोहोचली आहे. मागील वर्षी ४३ लाख टनापर्यंत ही निर्यात झाली होती .तेलबियांचे भाव घटल्यामुळे जागतिक बाजारपेठेतून मागणी चांगली मिळाली. भाताच्या कोंड्याची निर्यातबंदी केल्यामुळे एकूण निर्यात काही प्रमाणात कमी झाली,फक्त तेलबियांची निर्यात तर मागील वर्षीच्या तुलनेत २१ टक्के ने अधिक आहे. अर्जेंटिना DOC ची निर्यात कमी होत असल्याचा फायदा भारताला होत आहे.



खोबऱ्याला आधारभूत किंमत :- सन २०२४ च्या हंगामासाठी खोबऱ्याच्या आधारभूत किमतीला मान्यता मिळाली आहे. तेल गिरण्यांसाठी उपयुक्त योग्य गुणवत्ता असलेल्या खोबऱ्यासाठी ११,१६० रुपये प्रति क्विंटल तर गोटा खोबऱ्यासाठी १२ हजार रुपये प्रति क्विंटल दर निश्चित केला आहे. तेल गिरण्या साठीचे खोबरे हे तेल काढण्यासाठी तर गोटा खाण्या योग्य खोबरे हे सुकामेवा म्हणून वापरले जाते.

केळीची निर्यातः- भारताने केळीची सागरी मार्गाने नेदरलँडला चाचणी वाहतुकीद्वारे यशस्वीरीत्या निर्यात केल्यामुळे भारताची केळीची निर्यात पुढील ५ वर्षात १ दशलक्ष टन पर्यंत वाढविण्याचे लक्ष्य ठेवले आहे. जगातील सर्वात मोठा केळी उत्पादक देश असूनही जागतिक बाजारपेठेत भारताचा निर्यातीचा वाटा सध्या फक्त एक टक्का आहे. मुख्य केळी उत्पादक राज्यामध्ये आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेश यांचा समावेश होतो.

पोल्ट्री उद्योग :- २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात देशांतर्गत पोल्ट्री उद्योगाच्या महसुलामध्ये ८-१० टक्के वाढ होण्याची शक्यता आहे २०२२ - २३ च्या पहिल्या सहामाहीत मक्याच्या किमती, ज्या खाद्य खर्चाच्या ६०-६५ टक्के समावेश होतो ९ टक्के नी आमी सोयाबीनच्या किमतीत २१ टक्के नी कमी झाल्या आहेत. खरीप हंगामातील सोयाबीन पिकातील झालेली घट आणि मक्याच्या पेरणीला होणार विलंब यामुळे पोल्ट्री खाद्य खर्चात संभाव्य वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

खाद्यतेलाची विक्रमी आयात :- खाद्यतेलाची उपलब्धता वाढवून भाव नियंत्रित ठेवण्यासाठी सरकारने आयात शुल्कात मोठी कपात केली होती. याच दरम्यान आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खाद्यतेलाची भाव कमी झाले होते. त्यामुळे देशात १७.३७ टक्क्यांनी आयात वाढून विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. २०२२-२३ या वर्षात देशात १६५ लाख टन खाद्यतेलाची आयात झाली. सध्या कच्चे सोयातेल, कच्चे सूर्यफूल तेल आणि कच्चे पामतेल आयातीवर ५.५० टक्के आयात शुल्क आहे, तर रिफाईंड सोयातेल, रिफाईंड सूर्यफूल आणि पामतेलावर १३.१७ टक्के आयात शुल्क आहे.

तूर आणि उडीद डाळीवरील आयातशुल्क वाढ :- तूर आणि उडीद डाळीवरील आयात शुल्क सवलत एक वर्षाने वाढविली आहे. त्यामुळे ही मुदत आता ३१ मार्च २०२५ पर्यंत असणार आहे. भारतातील अन्नधान्य महागाई वाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या वतीने हे पाऊल उचलण्यात आले आहे. मागील काळामध्ये डाळींच्या किमती १८ टक्के नी वाढल्या आहेत. केंद्राने पंतप्रधान गरीब कल्याण योजनेची मुदत पुढील पाच वर्षासाठी वाढवली आहे. यासाठी डाळींची आवश्यकता असणार आहे. म्हणूनच आयात शुल्क संदर्भात सवलत मार्च २०२५ पर्यंत सुरु राहील देशात डाळींची संभाव्य टंचाई व महागाई होऊ नये म्हणून केंद्राने हे पाऊल उचलले आहे.

रब्बी पिकांची लागवड क्षेत्र- दि.२२ डिसेंबर रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार ५३ लाख ९६ हजार हेक्टर क्षेत्रांपैकी केवळ ४५ लाख २५ हजार हेक्टरवर लागवड अथवा पेरणी झाली आहे. मागच्या पाच वर्षाच्या पिकांच्या पेऱ्याचा विचार केला तर यंदा केवळ ८३ टक्के रब्बी पिकांची लागवड झाली आहे. तर मागच्या वर्षीच्या तुलनेत ९२ टक्के लागवड झाली आहे. चारा पिकासाठी मुख्य समजल्या जाणाऱ्या मका आणि ज्वारी पीक विचारात घेतले तर रब्बी ज्वारीसाठी प्रस्तावित असलेल्या १७ लाख ५३ हजार हेक्टरपैकी केवळ १२ लाख ९९ हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. म्हणजे सरासरीच्या ७४ टक्के लागवड झाली आहे. मागच्या वर्षीच्या ज्वारीच्या क्षेत्रापेक्षा यंदाचे ज्वारीचे क्षेत्र अधिक असले तरी सरासरीने कमीच आहे. तर मक्यासाठी प्रस्तावित असलेल्या २ लाख ५८ हजार हेक्टर क्षेत्रांपैकी केवळ २ लाख २५ हजार हेक्टरवर मक्याची लागवड करण्यात आली आहे. म्हणजे प्रस्तावित क्षेत्रांपैकी ८७ टक्केच क्षेत्रावर मक्याची लागवड झाली आहे.

देशातील रब्बी लागण क्षेत्रः- देशात रब्बी लागण क्षेत्र ६०७ लाख हेक्टरवर पोहोचले. जे मागील वर्षीच्या तुलनेत ३ टक्के ने कमी आहे. रब्बी हंगामातील प्रमुख पीक गव्हाचे लागण क्षेत्र ३०९ लाख हेक्टर आहे. मागील वर्षी ३१६ लाख हेक्टर होते. तृण धान्याची लागण ६ टक्के ने कमी आहे .जमिनीतील कमी आद्रतेचा परिणाम लागण क्षेत्रावर होत आहे. रब्बी गहू, तांदळाचे भाव ६ ते ८ टक्के ने घटू शकतात.

# पालकांनी मित्रत्वाची भूमिका स्वीकारणे लाभदायक



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**पाल्यांच्या हितासाठी पालकांनी मित्रत्वाची भुमिका धारण करावी जेणेकरून उभयतां साठी हितकारक ठरेल. विद्यमान पाल्य आणि पालक या उभयतांची सध्याची मानसिक स्थिती जर आपण पाहिली तर आपल्याला वैचारिक विरोधाभास प्रथम दर्शनी ठळकपणे नक्कीच दिसेल. जगातील कोणताही पालक आपल्या पाल्याच्या भविष्या संदर्भात चिंतित असणं स्वाभाविक असतं. मुलांनी खुप अभ्यास करावा खुप मोठं व्हावं, उच्च शिक्षित होऊन सुसंस्कारित व्हावं हि प्रत्येक पालकाची आई वडीलांची मनोमन इच्छा असते.**

त्या मागिल पार्श्वभूमी स्पष्ट असते आपल्या वाट्याला जे आलं ते आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये एवढीच प्रमाणिक अपेक्षा असते. आपण जो संघर्ष दुःख वेदना, भोगल्या त्या आपल्या पाल्यांच्या वाट्याला येऊ नयेत.याच प्रमाणिक भावनेने प्रत्येक पालक आपल्या पाल्यांना घडविण्यासाठी अहोरात्र धडपडत असतो.हि धडपड एकतर्फी ठरू नये हि पालकांची चिंता असते. दुर्दैवाने असंच घडतं मुलांना याच फार गांभीर्या नसत हे वास्तव आहे.याच परिणाम पालक आणि मुलं यांच्या मध्ये कटुता निर्माण होतो.मुलाच्या भवितव्यासाठी चिंतित पालकांनी मधला मार्ग काढत आपल्या पाल्या सोबत मैत्री पुर्ण मार्गदर्शन करावं.मुलांचा पालक मालक या भुमिकेतुन बाहेर येऊन मित्राच्या भुमिकेत मार्गदर्शन केले म्हणजे ते मुलांना पण रूचेल आणि पचेल. ज्या पद्धतीच जसं युग असतं.तशी पिढी आचरण करत असते.त्या त्या युगाचा त्या त्या पिढीवर वैचारिक परिणाम जाणवत असतोच. सध्या तर चंचल अस कलयुग चालू आहे.आणि सोबत तंत्रज्ञान युगाचा प्रभाव आणि संस्कारांचा अभाव सगळीकडे प्रामुख्याने जाणवतं आहे . मुलांना घडविण्यासाठी त्यांना दडपणाखाली ठेवण्या ऐवजी मित्र म्हणुन समजावणं जास्त हितकारक ठरत. आपली मुल हि आपल्या अज्ञेत राहवीत शब्दात राहावीत अशी पालकांची मनोमन इच्छा असते.याच इच्छे पोटी प्रत्येक आई वडील पालक हे आपल्या पाल्यांनवर वेळोवेळी वेगवेगळ्या पद्धतीने नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असतात .पण हे नियंत्रण सध्याच्या मुलांसाठी जड जातंय.त्यांना नियंत्रण बंधनं नको असुन मुक्त संचार हवा आहे. नियंत्रण प्रस्थापित करण्याची आई वडील पालकांची भुमिका अगदी रास्त असते योग्य असते.पण मुलांना या विषयी फार गांभीर्य नसते हि शोकांतिका आहे. आपल्या मुलांच हित व्हाव एवढीच त्यांची



प्रमाणिक इच्छा असते.याच सरळ साध्या आणि प्रमाणिक भावनेतून आपले पालक आपल्यावर वेगवेगळ्या पद्धतीने दडपणाचा दबाव तंत्राचा वापर करत असतात.परंतु सध्याच्या काळातील मुलं हि तंत्रज्ञान युगातील असल्याने व सध्या संयम आणि सहनशीलता याचा सर्वदूर अभाव असल्याने स्व हिताचं पण जास्तीच बंधनं कोणालाही नको आहे. पुर्वी मुलं आई वडील पालक यांच्या आज्ञेबाहेर जाण्याचा स्वप्नात पण विचार करू शकत नव्हती. हल्ली परस्थिती खुप झपाट्याने बदलत चालली आहे.वेळेनुसार संस्कारांचा लोप होत चालला आहे. जीवन घडविणारेच हितशत्रू जाणवत आहेत.अशी भयानक स्थिती निर्माण होत असताना पालकांनी आपली चिंता वाढु न देता वेळेनुरूप आपल्या मध्ये थोडा बदल घडवून मुलांच्या कल्याणासाठी हितासाठी त्यांना मित्राच्या भुमिकेत मार्गदर्शन करावे. म्हणजे जेणेकरून मुलं पण घडतील आणि चिंता पण मिटेल पण असं सहसा होत नाही पालक पालकांच्या भुमिकेतुन बाहेर पडण्यासाठी तयार नाहीत.आणि पाल्यांना स्वतः हितासाठी योग्य असणारी आई वडील पालकांची भुमिका मुलांना अयोग्य वाटते.हे परस्पर विरोधी चित्र भयानक वास्तव आहे.स्व हित न समजणं या सारखं दुसरं दुर्भाग्य नसत. वेळ प्रसंग अवधानता पाहुण पालकांनी आपली रननिती बदलली पाहिजे.कारण सध्या ज्या पद्धतीने जीवनशैली आहे. त्या अनुषंगाने मुलांना मार्गदर्शन करताना आपण पालक म्हणून रागवण चिडण वेळ प्रसंगी मारहाण करणं उपयुक्त ठरण्यासारख नाही. तर मुलांना अगदी त्यांचा मित्र होऊन त्यांच्या सोबत योग्य संवाद ठेवून उचित मार्गदर्शन करणं सध्यातरी हितकारक आहे.हिच वेळेची आणि काळाची गरज आहे.

# लोकसंस्कृतीचा उपासक: पोतराज



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**आजही अंधश्रद्धेत सर्व पोतराज समाज बंदिस्त झालेला आहे. अंधश्रद्धा त्यांच्या जगण्याचे साधन असून दररोजच्या जीवनात ते अंधश्रद्धेला प्राधान्य देतात.नेहमी अपशकूनाच्या वाटेने चालतात. आषाढ महिन्यात देवीच्या यात्रेत पंचायत बसते. पोतराजाच्या जातपंचायतीच्या प्रमुखाला साहेबराव म्हणतात.महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यात दहिवडी येथे पोतराजाचे मुख्य ठाण आहे. त्यांच्या अंगात आल्यानंतर मरीआई, लक्ष्मीबाई तुळजापूरची भवानी, कोल्हापूरची अंबाबाई ,पंढरपूरचा पांडुरंग, लेकी सुना मुलं -बाळा बहीण -भाऊ तसेच सती चांगुण श्रावण -बाळ सीतेचा वनवास असे गाणे गात असतात.**

लोककल्याणकारी कार्य करण्यासाठी उपयुक्त असणारी अहिंसा वृत्ती जीवनात निर्माण होण्यासाठी आपल्या मनात ज्ञानाच बीजारोपण करणं खुप आवश्यक आणि गरजेचं आहे. एकदा आपल्या मनात ज्ञानाच बीजारोपण झालं कि आपली वृत्ती आपोआप अहिंसक होते.मानवता हे सृष्टीच भुषण असून अहिंसा हा मानवतेचा पाया आहे.अहिंसा हि मानवी जीवनातील एक अवस्था असुन हि अवस्था ज्ञानाच मनात झालेलं बीजारोपण यावर निर्धारित होत असते.निसर्गाने निर्माण केलेली सुंदर रचना अनुभवयाची असेल अथवा त्याचा खरा आनंद लुटायचा असेल तर अहिंसेचे पुजारी व्हावं लागतं. तेव्हाच वास्तविक सृष्टीच सौंदर्य अनुभवता येईल. सृष्टी वर मानवा सोबत इतर देखिल बहुतांश प्राणी वास्तव्यास आहेत त्यांना सुद्धा आपला कोणाताही उपद्रव त्रास आपल्या आचरणातून कृतितून होणार नाही असं आचरण म्हणजे अहिंसा वृत्ती असून हि वृत्ती अर्जित करणं जीवनाचं आद्य कर्तव्य असलं पाहिजे.निसर्गाच्या रचनेत हास्तक्षेप होईल असं कृत्य घडता कामा नये.मनात ज्ञान रूजल नाही तर आपसुकच आपल्या कडून कळत न कळत अहिंसा वृत्तीच उल्लंघन होऊन आपण हिंसक होतो. हिंसा कोणत्याही प्रकारची असो ती घडविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज भासत नाही.अंहकार,द्वेष,स्वार्थ,मन भेद,आकस, व्यसनाचे विविध प्रकार,संगत,यापैकी एखादाही दुर्गुण आपल्या अंगी रूजला तर आपोआपच आपण हिंसक मार्गावर मार्गक्रमण करतो.हे सगळं अगदी सहज घडतं.खरे परिश्रम करावे लागतात. ते अहिंसक होण्यासाठी.भौतिक जीवनात वावरत असताना मनात ज्ञान रूजवण हे वाटत तितका



सोप नसतं.हिंसा म्हणजे फक्त शरिरावर,जखम इजा जीवतीस धोका निर्माण करणं,किंवा वेगवेगळ्या प्रकारचे नुकसान पोहचण इथपर्यंत मर्यादित अर्थाने केलेल कृत्य म्हणजे हिंसा असं आपण ढोबळमानाने मानतो समजत असतो पण वास्तवात असं नाही खरंया अर्थाने विचार केला तर सृष्टी वरील कोणाताही जीव आपल्या कृतीतून व्यथित होणार नाही याची काळजी दक्षता घेण्याची हि वृत्ती मनात ठेवून आचरण करण्यासाठी आपल्या मनात ज्ञानाच बीजारोपण झालं कि अहिंसा वृत्तीचा उदय आपोआप आचरणात होतो.मन बुद्धी,वृत्ती,व अंतःकरणाने अहिंसक होण्यासाठी ज्ञान हे मनात रूजल पाहिजे. आपल्या आचरणातून कृतितून इतर कोणताही जीव दुःखी होणारं नाही याची दक्षता हिच खरी मानवता असून मनवतेचा विकास होण्यासाठी अहिंसा वृत्तीच बीजारोपण झालं पाहिजे.एकदा अहिंसा वृत्ती निर्माण झाली कि आपोआप आपल्या मध्ये असणारे सगळे सात्विक लोककल्याणकारी गुण नक्कीच प्रकट होऊन त्याचा उपयोग इतरांना झाल्याशिवाय राहणार नाही. सृष्टीच सौंदर्य अहिंसेत आहे सृष्टी वरील कोणत्याही प्रकारच्या जीवाला आपल्यामुळे वेदना दुःख होणार नाही. याची काळजी घेणं खुप गरजेचं आहे.एकमेका सहय करू अवघे धरू सुपंथ सृष्टीच्या रचनेतील सगळे पशु पक्षी प्राणी,वेगवेगळे जीव हे आपलं कर्म बंधन घेऊन आले आहेत.प्रत्येक जण आप आपल्या कार्यक्षेत्रात आपलं जीवन जगत आहे.मग इतरांना त्रास इजा होईल असं आचरण करण कित पत योग्य आहे. मानव हा पृथ्वीवरील सगळ्यात बुद्धिमान शक्तिशाली बलाढ्य प्राणी आहे.पण आज आपण सृष्टी वरील इतर जीव सृष्टी सह परस्परांना कसं आशांत आणि अस्थिर करता येईल यासाठी प्रयत्नशील असून आपण स्वतःची व इतरांची शांती हिरावतो आहोत याची जाणीव जागृती सध्या लोकांना राहिली नाही.याच कारणही तसंच आहे ज्ञान आहे पण ते मनात रूजल नाही.त्यामुळे त्याचे दुष्परिणाम हे आपल्याला सगळीकडे सध्या दिसत आहे.आणि हि परस्थिती हाता बाहेर जाऊ नये म्हणून योग्य वेळी सावध होण्याची आवश्यकता आहे.ज्ञान मनात रूजण हि काळाची गरज आहे.हि काळजी दक्षाता घेतली तर नक्कीच आपल्या जीवनात अहिंसेचे अनुकरण होईल.याचा लाभ निसर्गाचं सौंदर्य रक्षण संवर्धन करण्या सोबतच सृष्टी च्या कल्याणार्थ नक्कीच योग्य लाभ होईल.मनात ज्ञानाच बीजारोपण झालं तर या हिंसेच्या प्रभावातुन आपला बचाव होऊन जगाचं कल्याण करणारी अहिंसा त्याचे खरे पाईक आपण ठरतो.

# मावळतीचा रविराज



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**कुंड्यामधली वरची माती आज बदलायची. कामाची आवरा आवर करता करता विचार चक्र चालू होते. काही नाही असा वेळ भेटणार नाही,आज त्यासाठी वेळ मुद्दाम राखून ठेवयाचाच. दुपार नंतर काम आवरले, नि भारतीय बैठक मारली. विसावलेल्या वातावरणाला निवांत पणा चा साज चढला होता. समोरच्या चार पाच कुंड्या काढून बाजूचा नि कुंड्यातील सर्व कचरा काढून जागा स्वच्छ करून घेतली. वरवरची माती काढून त्यात नविन माती घालून कुंड्या स्वच्छ करून जागच्या जागी ठेवून दिल्या. साफसफाई करून जुईच्या वेलीला फुटव्यासाठी धागा बांधून दिला. साफसफाई करून थोड्या वेळाने झाडांना पाणी घालण्यासाठी आले,जुईची वेल गैलरीतील गजाच्या आणि धाग्याच्या साहाय्याने छान वाऱ्यावर डुलत होती.**

त्याच्यावरून सहज म्हणून हात फिरवला,पिवळी झालेली पाने आधीच गळून पडली होती. त्याजागी नविन अंकुर फुटू पहात होते.पश्चिमेकडे झुकलेल्या सूर्याचे ऊन त्यावर पडून भिंतीवर पडलेल्या सावली वर मन विसावले. किती दिवस झाले, कधी लावली होती ना!दिवस कसे भुर्रकन निघून जातात. आत्ता आत्ता म्हणता बघता बघता नविन वर्ष आले. आत्ता आत्ता तर GOOD BYE 2022 आणि WELCOME 2023 चा '...आणि मागे वळून पाहताना' लेख लिहला होता. आणि येणाऱ्या २०२३ चे स्वागत केले होते. टक टक करत चार पाच पायऱ्या उतरव्या अन् पुढे मार्गक्रमण करावे, असेच काही हो ना! म्हणता म्हणता मागे सुटलेले क्षण मागे टाकून कसे नि किती पुढे निघून गेलो,हे ती येणारी वेळच सांगते. आणि मनाच्या निवांत पणाच्या खोलात गेल्यावर लक्षात येते ना!

ती वाट दूर धुक्यात ...!मनच ते आत्ता इथे तर काही क्षणानंतर कुठे आणि त्याच्यातील तो मुक भावनां चा सागर, कल्लोळातल्या लाटा नि किनाऱ्यावर येऊन तूषारांचे ते शांत असे सप्तसूर, खुणावतात पुन्हा नव्याने लाटेवर स्वार होण्यासाठी, मनाच्या

**खोल तळाशी,**
**त्याचे त्याचे अवकाश तो**
**शोधत होता,ते सुरेल गीत**
**पुन्हा नव्याने गाण्यासाठी.**

आसुसलेल्या डोळ्यातले ते भाव...कळत नकळत माहित नाही का पण, बागेतल्या झाडावर बसलेल्या पक्षाकडे लक्ष गेले. झाडावर बसलेला तो एकटा एकाकी पक्षी दूर जाणाऱ्या त्या वाटेकडे पहातोय असे वाटले. कोण जाणे त्याला ती हिरवळ आठवत असेल. भावनेने विचार केला.

आणि विचार तंद्रीत च दुरात धावणारी एखादी पायवाट समोर येते, नि मग नेहमीप्रमाणे वाटले की काही चांगल्या तर काही अप्रिय घटना हे तर नेहमीचेच झाले.पण म्हणजे जीवन जगताना चढ उतार हे आलेच आणि येणारच . हे ही दिवस निघून जाणार करत माणूस मार्गक्रमण करीत असतो. हे ही वर्ष निघून गेले.मनाला वाटले पृथ्वीची गती वाढली,की सूर्याचा वेग वाढला. माफ करा अतिशयोक्ती ..पण मन कधी कधी असा विचार करायला भाग पाडते.खर सांगायचे तर लेखन करायला घेतले नि एक मुद्दा पुढे आला. 'सुटलेले क्षण ' सुटलेले काही क्षण किती मागे गेले नाही. सार किती धावतेय.

भूत काळाच्या वेलीवर भविष्याची कळी उमलत



असते. सहज मनात आले. सुटलेले क्षण तर मागे जाणारच. अन् लक्ष गेले ते त्या मावळतीच्या रविराजाकडे हा ही रोज येतो नी काहीतरी देऊन निघुन जातो. उद्या येताना आशेची नवी किरणे घेऊन येईल. अन् मग एक नजर मागे वळली. मनात कितीतरी सोनेरी क्षण नी मग काय...तर कधी तरी डोळ्याच्या किलकिल्या झालेल्या पापण्या नजरेसमोर आल्या.

अन् एवढ्यात एका क्षणाला दिवसभर गोंगाटातून कोलाहलातून वाऱ्यावर हेंदकळणारी तुळशीची पाने हाताच्या ओंजळीत स्वप्नांच्या हिमवर्षावात मिटून हाताच्या ओंजळीतअलगद.. विसावली.... नि मग....कायम किट किट करणारा तो क्षण विसावून पहिल्या पायरी वरून दुसऱ्या पायरीवर आला. अंधारी शाल पांघरताना ती कातरवेळ ची हुरहूर ती वाट पाहणारी नजर ती ओढ अनामिक ओढीने , व्याकुळ मन का कुणास ठाऊक कसे पाझरू लागले....दूर देश मनात हुरहुर लावून ..हाताचे ते पालव...आणि सर्रकन उडालेली धूळ वेगवेगळ्या वाटा वाटा नी पांगलेली धूळ समोर आली..आणि मनाची चाके धावू लागली. त्या कोलाहलात गोंगाटात ..

हरवलेल्या त्या निवांत क्षणी आकाशातला तो चंद्र सोबत चालला होता. हळू हळू मागे मागे सरकणारी जमीन आणि सोबत चालणाऱ्या त्या सावलीने लक्ष वेधले आकाशातल्या त्या नितळ अशा चंद्राने...मनाच्या खळबळीच्या कोपऱ्यात खूप काही साठवून ठेवले का? एक सल सलत राही. आकाशी चा तो चंद्र सांगू पाहत होता का काही. का कुणास ठाऊक पण मन सांगत होते .तो चंद्र काहीतरी सांगू पाहत होता...माहित नाही काय पण तरीही...अन् मग गुण गुणनारे ओठ.. धावतेय ,पळतेय माणूस, वेळ, निसर्ग सार सार काही, आकाशीचा तो चंद्र सांगू पाहत होता काही. दूरवर डोंगरात विसावलेली ती निशा, नि त्यात लुकलुकणारी

प्रकाश ज्योत अबोल शांत रातकिड्यां च्या किरकिरित किल किलत खूप काही , सांगू पहात होती. तोंडून शब्द बाहेर पडले जग किती धावतय ना, अन् त्याच्यासोबत धावणारे आपण!अन् एका क्षणाला नजरेसमोर आले. त्या रम्य सायंकाळी दारात ते वाट पाहणारे किलकिले डोळे,अन् त्यात जाणवणारी ती जाणीव उणीव आशा आकांक्षा घराच्या ओढीनं झपझप चालनारी पावलं निघून चाललेली ती वेळ खूप काही सांगू पाहत होती.

डोळ्यातून ओसंडून वाहणारी काळजी असे बरेचसे खूप काही त्या वलय चक्रात सामावले होते.अन् मागे मागे जाणारा रस्ता आणि सोबत ची ती सावली मनाला पुन्हा त्याच ठिकाणी नेऊन ठेवत होती.

बीज,रोपट ,झाड ,फळे

इ..आतून काही शाश्वत अंकुरले आहे का? ही तुळस उद्या पानातून बहरणार.उद्या तिला नविन मंजुळा येणार. निळे आकाश पाहून मनात विचार आला समुद्रातला तो चांदवाच जणू. सारच कसे अनाकलनिय आणि मगअसे की एका मध्यांतरा नंतर पुन्हा मागे वळून पाहणारी ती अनामिक नजर .. 'त्या तिथे पलिकडे' करत आकाशातला तो चंद्रही मध्यावरून सरुन पुढे सफेद ढगांच्या आड. अन् नंतर अन् मग समोर आले ते ढगाआडचे चांदणे...

आणि त्याचे ते तेजोवलय...आणि पुन्हा पुढे काळे ढग बाजूला होऊन पसरलेले तेच ते चांदणे निसटलेल्या क्षणांची आणि मनात कायमसाठी कोरलेल्या क्षणांची साक्ष देत हळूहळू अंगणी उतरूनी येताना...

कल्पनेतल्या हरवलेल्या त्या क्षितिजापलीकडच्या क्षणांना काव्यात गुंफताना..

तेव्हाच्या क्षणांची ती अपूर्वाई
अनोख्या क्षणांची साक्ष देई,
स्मृति गंधातील क्षणांचे चांदणे शिंपितअंगणी उतरुनी येई.चांदण्यात हरवता हरवता नवा सूर्य नव्या उषेचे गीत गायी. चालला अवधी| त्या वाळू प्रमाणे|
क्षण नि क्षणाने|पाठीमागे||
कालचक्र पुढे| फिरत फिरत|
मागे न परत| वळतसे ||
सदुपयोग तो |वेळेचा करुनी| आनंद जीवनी|
भरूया तो|| क्षण पळे घटिका जीवनात येणार काही क्षणानंतर जाणार .हे निसर्ग चक्र अविरत चालू होते आहे. जाणाऱ्या क्षणांना मनाच्या कुपीत ठेवून येणाऱ्या क्षणांचा सकारात्मकतेने स्वीकार करून त्याचा आनंद घेऊया.आणि हरवलेल्या क्षणातून बाहेर येऊन ... नविन वर्ष आपणा सर्वांना सुख समृद्धी समाधान आणि निरोगी आरोग्य घेऊन येवो ही परमेश्वर चरणी इच्छा.

# कुटुंब प्रबोधन काळाची गरज



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**प्राचीन काळापासून तर आत्ताच्या आधुनिक भारतापर्यंत भारताच्या सांस्कृतिक, सामाजिक संरचनेत भारताचं सगळ्यात मोठं बलस्थान आहे ते म्हणजे भारताची कुटुंब व्यवस्था. अगदी प्राचीन काळापासून तो आत्तापर्यंत संयुक्त कुटुंब पद्धती ही भारताची सगळ्यात मोठी ओळख होती. याच संयुक्त कुटुंब पद्धतीतून भारताला संपूर्ण जगात एक वेगळी ओळख मिळाली आहे. कालपरत्वे नोकरी व्यवसाय निमित्य मुलं घराबाहेर पडू लागली. आणि, नोकरी व्यवसाय ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी स्थिरवू लागली.**


परंतु असं असलं तरी सण ,समारंभ, उत्सव ,सोहळा असं काही असलं की मात्र घराकडची ओढ कायम होती. आणि हे सगळं आपल्या कुटुंबासोबतच साजरा केला जावा यादृष्टीने प्रयत्न असायचे. वाहतुकीच्या व्यवस्थेत झालेले बदल, भौतिक सुख-समृद्धीत झालेले बदल , ऐश्वर्याचे बदललेले निकष आणि बदलती सामाजिक परिस्थिती यामुळे पुढे आम्ही दोघे आणि आमचे दोघे असे एक सरकारी ब्रीदवाक्य तयार झालं. आणि म हे चौकोनी कुटुंब शहरामध्ये वास्तव्य करायला लागलं. तेव्हा सुद्धा सण सोहळे हे आपल्या आईवडिलांसोबतच त्यांच्या घरी किंवा आपल्या घरी त्यांना बोलून साजरे व्हायचे. परंतु जसजशी प्रगती व्हायला लागली, जसजसं आधुनिकतेकडे आपण वळायला लागलो तसतसं आपल्या संस्कृतीमध्ये सुद्धा बरेच बदल व्हायला लागले. सामाजिक परिस्थितीही बदलली. आणि वाढत्या महागाईच्या झळा पण सर्वसामान्य लोकांना बसू लागल्या. संयुक्त कुटुंब पद्धती पासून सुरू झालेला प्रवास आम्ही दोघे आमचे दोघे इथपर्यंत येऊन थांबला होताच. परंतु वाढत्या महागाईच्या जोरामुळे आणि लाईफ स्टाईल बदलल्यामुळे मग हा प्रवास आम्ही दोघे आणि आमचा एक इथंवर आला. आणि नंतर मात्र आता एकल पालकत्व या दिशेने आपली वाटचाल सुरू झाली आहे. स्वतःच मूल न होऊ देता किंवा त्यात जास्त वेळ न घालवता मूल दत्तक घेणे हा एक वेगळा मार्ग सुरू झालेला आहे. तर , दुसऱ्या बाजूला लग्न न करता अविवाहित राहून एखाद्या मुलाचे संगोपन करणे हा प्रवास सुद्धा मोठ्या प्रमाणात आता सर्वत्र पाहायला मिळू लागला आहे. या संपूर्ण प्रकारामुळे एकूणच सामाजिक व्यवस्थेमध्ये प्रचंड आमुलाग्र परिवर्तन यायला लागलंय. सामाजिक परिस्थिती सोबतच बदलत गेलेली कुटुंब व्यवस्था आणि त्यातून उद्भवणारे प्रश्न, समस्या, अडचणी हा आता एक वेगळाच विषय गंभीरते कडे वळू लागलेला आहे. आणि म्हणूनच कुटुंब प्रबोधन ही काळाची गरज म्हणून आता समोर येऊ लागलेली आहे. नव्हे अनेक जाती धर्म ,समाजा मध्ये कुटुंब प्रबोधनाचे विशेष कार्यक्रम घेतले जात आहेत. त्यातून नवदांपत्यांना मार्गदर्शन , किशोरावस्थेतील मुला मुलींना मार्गदर्शन, महाविद्यालयिन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, कुटुंब प्रमुख अर्थात वयोवृद्धांनाही मार्गदर्शन अशा प्रकारच्या माध्यमातून ही कुटुंब व्यवस्था संतुलित राहावी आणि आपल्या संयुक्त कुटुंब पद्धतीची जी नाळ होती ती नाळ कायम टिकून राहावी यासाठी आता मोठ्या प्रमाणात सर्वच दिशेने प्रयत्न सुरू झालेले पाहायला मिळतात. आणि म्हणूनच हा विषय आज एक लेखनाचा प्रपंच म्हणून मी हाती घेतला. एकूणच बदलत्या परिस्थितीमुळे जग एक खेड झाल्यामुळे आणि तंत्रज्ञानात झालेला प्रचंड बदल असो ,भौतिक साधनांमध्ये झालेले आमुलाग्र परिवर्तन असो किंवा मग बदललेले ऐश्वर्याचे निकष असो या सगळ्यांमुळे आज पैशाची वाढती मागणी आणि त्यासाठी नवरा बायकोचं दोघांचंही नोकरीवर असणं आता हळूहळू कंपल्सरी व्हायला लागले. स्वतःच फ्युचर, स्वतःच करिअर ,आपले ड्रीम्स पूर्ण व्हावेत म्हणून आता केवळ मूलच नव्हे तर मुली सुद्धा आपल्या शिक्षणानंतर नोकरीसाठी दूर दुसऱ्या गावात दुसऱ्या राज्यात एवढेच नव्हे तर आता दुसऱ्या देशात सुद्धा जायला अगदी सहजतेने तयार आहेत. शिक्षण आटोपलं की मुला-मुलींना आता स्वतःचा स्पेस असायलाच हवा असा एक नवा पायंडा पडायला लागलाय. तद्वतच लग्नानंतर सुद्धा आलेल्या नवीन सुनेला आणि मुलाला सुद्धा आमचा स्वतंत्र स्पेस हवा असंही वाटायला लागल आहे. आणि यातूनच मग संयुक्त कुटुंब पद्धतीला तडे जात जात आम्ही दोघे आमचे एक असा प्रवास सुरू झाला. या प्रवासामुळे लहान मुलांना सांभाळण्यासाठी आता घरात आजी आजोबा नाहीत आणि आई-बाबा पण नाहीत. तर, कामवाल्या मावशी, कामवाल्या काकू, कामवाल्या आजी या पगारी महिला आता या मुलांचं संगोपन करायला लागले आहेत. त्यामुळेच एक वेगळी समस्या निर्माण व्हायला लागली आहे. यात दुसरा एक प्रयत्न, दुसरा एक प्रकार सुद्धा पाहायला मिळतो की आई वडील जोवर बाहेर आहेत त्या वेळेपर्यंत आपल्या मुला मुलीला एंगेज ठेवावे. म्हणून शाळेनंतर किंवा शाळे आधी सुद्धा वेगवेगळे क्लासेस, त्याच्या हॉबीज जपता याव्यात या नावाखाली आणि तो कॉम्पिटिशनमध्ये पुढे राहावा यासाठी सुद्धा त्या मुला मुलींना आई वडील घरी येईपर्यंतचा वेळ एंगेज केलेला असतो. यामुळे लहान मुलांना आपलं मत, आपल्या आवडीनिवडी, आपल्या गमती जमती, शाळेतले भांडण, मित्र-मैत्रिणींच्या गप्पा, मैदानावर झालेल्या गप्पा किंवा क्लासेस मध्ये झालेल्या गप्पा या आपल्या आई-वडिलांना सांगताच येत नाहीत. दुसरीकडे नवऱ्याला आपल्या ऑफिसमध्ये झालेल्या विविध घटना बायको जवळ बोलायला वेळ नाही. किंवा पत्नीला आपल्या ऑफिसमध्ये झालेल्या विविध घटना या आपल्या नवऱ्याला सांगायला वेळ नाही. सगळ्यांचीच घूसमट व्हायला लागली आहे .मोकळं बोलणं बंद झाला आहे .संवादाची साधने खूप वाढलीत पण घराघरातला संवाद मात्र हरपत चालला आहे. मला आजही आठवतं आमच्या घरी माझे वडील जरा कडक स्वभावाचे त्यामुळे माझ्या सगळ्या बहिणी शाळेतून आल्या, कॉलेजमधून आल्या की सरळ स्वयंपाक खोलीत गेल्या की आईजवळ जायचं नि भडभड सगळं आईला सांगून मोकळं व्हायचं. तीच सवय पुढे मलाही लागली. आणि मी सुद्धा शाळेतल्या गोष्टी असतो की मोठा झाल्यावर कॉलेजमधल्या गोष्टी असो या सगळ्या गोष्टी आम्ही आमच्या आईजवळ बोलून मोकळं व्हायचं. याचा फायदा असा असतो की मन रित होतं, मन हलकं होतं .आपल्या सोबत काहीही चुकीचं घडलं तर आपल्याला मार्गदर्शन करायला आपले आई वडील सोबत असतात ही भावना बळावते. आणि यातून मनात कधीही नैराश्याची भावना येत नाही. डिप्रेशन हा जो आजार आता वाढलेला आहे हा आजार माणसाला बळावत नाही. पण , आज मी जसं म्हटलं की संवादाची साधने वाढलीत परंतु संवाद मात्र हरपत चाललाय .तसा संवाद हरपत चालल्यामुळे आज नैराश्य आणि डिप्रेशन हे दोन महत्त्वाचे मुद्दे भयानक स्वरूप घेत आहेत आणि यातूनच मग दहावी बारावीत नापास झालं तर गळफास घेऊन आत्महत्या करणे, मेडिकल इंजीनियरिंग ला नंबर लागला नाही म्हणून आत्महत्या करणे, प्रेमात एखाद्या मुलींनी किंवा मुलांनी नकार दिला म्हणून आत्महत्या करणे यासारखे प्रकार वाढू लागलेले आहेत. दुसऱ्या बाजूला जेव्हा मी विचार करतो तेव्हा हल्ली या सध्याच्या काळात म्हणजे गेल्या दहा ते पंधरा वर्षाच्या काळामध्ये घरातून पळून जाऊन लग्न करणे हा प्रकार मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. मुलगा असो अथवा मुलगी असो आंतरजातीय विवाह, आंतरधर्मीय विवाह करण्याकडे मोठ्या प्रमाणात आजच्या तरुणाईचा घरून पळून जाऊन लग्न करण्याचा प्रकार आज वाढलेला दिसतो आहे. असं का होतं ? याला कारण काय ? घरामध्ये जर समजा मोकळा संवाद नसेल तर महाविद्यालयीन




जीवनामध्ये आजची तरुणाई ही आपला आधार शोधायला लागते. घराच्या बाहेर हा आधार शोधत असताना नैसर्गिक नियमाप्रमाणे भिन्नलिंगी व्यक्तीकडच आकर्षण आणि त्यातून मग आपल्या मनातल्या भावना दुसऱ्याजवळ व्यक्त करणे हे वाढू लागतं. यातून सध्याच्या काळात असलेल्या मैत्रीतील मोकळेपणा त्यातून वाढत चाललेली जवळीक आणि या जवळीक तेतुन पुढे विचार पटायला लागलेत, समोरून आपल्याला आधार प्रॉपर पद्धतीने मिळायला लागला, या सगळ्यांच्या फायदा घेत आज इतर धर्मीयांच्या घरी जाऊन त्यांच्या परिवारात जाऊन त्या इतर धर्मियांशी लग्न करण्यापर्यंतची वेळ प्रसंगी आई-वडिलांना अंधारात ठेवून किंवा आईवडिलांशी भांडण करून सुद्धा आज लग्न करण्याचा निर्णय मुलाकडून किंवा मुलीकडून मोठ्या प्रमाणात घेताना दिसतो आहे. हे सगळं असं का होतंय ? याच्या पाठीमागे जेव्हा आम्ही गंभीरतेने विचार करतो तेव्हा असं लक्षात येतं की लहानपणापासून एकाकी पडलेले मुलं मग हॉस्टेलमध्ये राहिलेले असो, आईवडिलांच्या नोकरीमुळे घरात एकटे राहिलेले असो किंवा शिक्षणाच्या निमित्ताने घराबाहेर पडलेले मुलं मुली असोत हे सगळेजण त्यांचा एकाकीपणा हा बाहेर व्यक्त करायला मजबूर होतात असं मला तरी वाटतं . यांचा परिणाम जर आपल्याला योग्य पद्धतीने हाताळायचा असेल तर मला असं वाटतं की खऱ्या अर्थाने कुटुंब प्रबोधनाची गरज काय आहे ते यावरन लक्षात येतं. खरंतर संयुक्त कुटुंब पद्धती ही सगळ्यात मोठा आधार .ते शक्य नाही अशी जर व्यवस्था असेल तर घरामध्ये आई-वडिलांनी आपल्या मुलाबाळांना आवश्यक तो वेळ दिलाच पाहिजे .सकाळी नोकरीच्या घाईगडबडीत शक्य नाही परंतु ,शक्यतो सायंकाळी सोबत जेवण करणे ,आठवड्यातून एक दिवस आपल्या धार्मिक स्थळी जाणे, सकाळची प्रार्थना घरी करता येत असेल तर सगळेजण मिळून करणे ,जेवणाच्या वेळेस सगळ्यांसोबत निवांत हसत खेळत चर्चा करणे, महिन्यातून एखाद्या वेळेस कुठेतरी बाहेर सहपरिवार जाणे, भोजन करणे किंवा आपल्या आई वडील जर समजा खेड्या गावात राहत असतील तर त्यांच्याकडे महिन्यातून एक दोनदा, शक्य नसेल तर सहा महिन्यातून एकदा, वर्षातून एक दोनदा असंच जाऊन त्यांच्यासोबत त्या मातीशी आपली नाळ जोडून ठेवणे हे अतिशय आवश्यक आहे .दुसरी महत्त्वाची गोष्ट घरातल्या संवादामध्ये मोकळेपणा असायला हवा. मुलांचा किंवा मुलींचा आई-वडिलांसोबत असलेला मोकळा संवाद हा आज अतिशय आवश्यक झालेला आहे. यातून मुला मुलींना आई-वडिलांच्या जवळ हक्काने मन मोकळं करता यायलाच पाहिजे. तरच इतर सर्व गोष्टी च्या बाबतीत तुम्ही तुमच्या मुला-मुलींवर योग्य त्या पद्धतीने नियंत्रण ठेवू शकता. अन्यथा , तुमचे मुलं मुली तुमच्या हाताबाहेर कधी निघून गेले हे तुम्हाला सुद्धा कळणार नाही. आणि आज ही वेळ आम्ही अतिशय जवळून पाहतो आहोत. समुपदेशनाच्या माध्यमातून समुपदेशनाच्या कार्यामुळे या अनेक गोष्टी आज मी खूप जवळून पाहतो आहे, अनुभवतो आहे. अनेक आई-वडील आज आपल्या मुलामुलींमुळे हतबल झालेले आहेत. डोळ्यात अश्रू येतात त्यांच्या जेव्हा ते मला माझ्या घरी मला भेटायला येतात. मला असं वाटतं की आज पूर्वीच्या काळात जसं व्हायचं की आपण ज्या परिसरात राहतो त्याच्या अवतीभोवतीचे चार पाच घर मिळून एकत्रित जेवण करणे, कोजागिरी साजरी करणे, एकमेकांच्या घरी फराळाला जाणे, या सगळ्या गोष्टी अतिशय आवश्यक आहे. फ्लॅट संस्कृती निर्माण झाली आणि समोरच्या फ्लॅटमध्ये कोण राहतं? किंवा त्यांच्या घरी कोण येणं जाणं करतो? हे सुद्धा हल्ली बाजूच्या फ्लॅट मधल्या व्यक्तींना माहित राहत नाही . फ्लॅट संस्कृती आल्यापासून घराचे दारं पूर्णतः बंद राहायला लागलेत. आणि त्यामुळे माझा शेजार हरपलेला आहे. हा शेजार धर्म सुद्धा कुटुंब प्रबोधनाचाच एक महत्त्वाचा भाग आहे. म्हणून मी पुन्हा एकदा नव्याने माझ्या जुन्या मातीशी माझी नाळ जोडू शकेल का ? माझ्या माझ्या कुटुंबाच्या सोबत असलेल्या संवादामधील निर्माण झालेली दरी मी तोडू शकेल का ? माझ्या परिवाराला मी वेळ देऊ शकेल का ? माझ्या मुलाबाळांना मी वेळ देऊ शकेल का ? माझ्या लेकरांनी माझ्याजवळ त्यांच्या मनातल्या सगळ्या गोष्टी मोकळेपणाने दिलखुलासपणे सांगाव्यात इतका मैत्रीचं नातं मी त्यांच्यासोबत निर्माण केल आहे का ? या सगळ्यांचा वेळ काढू गांभीर्याने विचार करणं आज नितांत गरजेचे आहे. दुसरी बाजू महत्त्वाची. आज कुणालाच घरात वृद्ध माता-पिता नको आहेत .दोन दोन लाखांचे पगार आहेत मुलाचा एक लाखाचा पगार ,मुली ,सुनेचा एक लाखाचा पगार आहे .दोन दोन तीन लाखाचे पगार आहेत. पॅकेज मोठे मोठे आहेत हे सांगणारे आई-वडील आहेत. परंतु या आई-वडिलांना त्यांच्या मृत्यू पश्चात अग्नी द्यायला सुद्धा आजच्या मुलांना वेळ नाही. इतकी भयंकर शोकांतिका आज आपण पाहतो आहे, वाचतो आहे, अवतीभवती आपण ती अनुभवतो आहोत. वृद्ध माता पितांच्या बाबतीत सुद्धा आज प्रत्येक मुलाला प्रत्येक मुलीला आणि प्रत्येक सुनेला सुद्धा आणि जावयाला सुद्धा अतिशय शांत डोक्याने विचार करणं नितांत गरजेचं आहे असं माझं स्पष्ट मत आहे. मुलाचे आई वडील असो की मुलीचे आई वडील असो त्यांना आधार देणं हे प्रत्येकाचं काम आहे. ते आपलं कर्तव्य आहे, ती आपली जवाबदारी आहे. आणि हे जर आपण करत असू तरच आपल्या एकूणच पॅकेजला ,आपल्या एकूणच स्टेटसला, आपल्या एकूणच सगळ्या वलयाला एक वेगळं वळण देणारा ठरेल. त्यामुळे तुमचा वैयक्तिक असा समाजातला दर्जा तर उंचावेलच परंतु तुमच्याकडे पाहून इतरांनाही त्यातून प्रेरणा मिळेल. ही प्रेरणाच सगळ्यांना मिळत राहो. घरातल्या वृद्धांचा योग्य तो मानसन्मान व्हावा, त्यांना योग्य ते स्थान मिळावं आणि वृद्धांनी सुद्धा चार पावलं मागे येत आपल्या मुला-मुलींना त्यांचा मोकळा स्पेस देणे ,आलेल्या सुनेला योग्य तो वेळ देणं, घरात सेटल व्हायसाठी आपल्या घरातल्या प्रथा परंपरा या समजून घेण्यासाठी थोडा कालावधी देत तिच्याशी संवाद साधत जर घरातल्या सासू-सासऱ्यांनी योग्य तो संवाद साधला ,घरातल्या आईवडिलांनी आपल्या काळातल्या गोष्टींचा किंवा अनुभवाचा सातत्याने उच्चार न करता आलेल्या नवीन बदललेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने जर आपण संवाद साधत ठेवला, स्वतःमध्ये बदल करत राहिलो तर निश्चितच घरातले वृद्ध हे कोणालाही नकोसे न होता ते सुद्धा आपलेसे वाटायला लागतील. ही परिस्थिती बदलणे आपल्या हातात आहे .या परिस्थितीमध्ये आपण सगळेजण मिळून योग्य तो विचार व्हावा या विचारातून तुम्ही आम्ही सगळ्यांनी मंथन करावं आणि आमची जी भारताची कुटुंब व्यवस्था, जिला जगात एक वेगळी ओळख आहे ती कुटुंब व्यवस्था तितक्याच सक्षमपणे तितक्याच समर्थपणे पुन्हा एकदा टिकून राहावी. पुन्हा एकदा तेच तेज , तोच दरारा ,तीच मान सन्मान या कुटुंब व्यवस्थेला मिळावा यासाठी हा लेखन प्रपंच.

**(लेखक स्वतः विदर्भातील एक सुविख्यात मोटिव्हेशनल ट्रेनर व समुपदेशक आहेत)**

# गर्भलिंग तपासणीचा गोरखधंदा!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**स्त्रीभ्रूण हत्येचा कर्दनकाळ ठरलेल्या डॉक्टर सुदाम मुंडे याच्याकृष्णकृत्यानंतर आता पुन्हा एकदा गर्भलिंग निदान प्रकरणाचा भांडाफोड उघडकीस आला आहे. भ्रूणहत्येला आळा बसावा, या उद्देशाने गर्भलिंग निदानावर बंदी कायदा लागू करण्यात आला; मात्र आजही छुप्या पद्धतीने गर्भपात केला जात असून, महाराष्ट्रातमोठे रॅकेट सक्रिय. असल्याचं नुकतेच उघड झाले आहे. मोठी रक्कम घेऊन हे रॅकेट इच्छुकांना कागलमध्ये नेऊन गर्भलिंग निदान चाचणी केल्या जात असल्याचे समोर आले आहे.**

गर्भलिंग निदानाचे कर्नाटक कनेक्शन आरोग्य विभागाने काही महिन्यांपूर्वीच एका स्टिंग ऑपरेशनद्वारे उघडकीस आणले होते.यापूर्वी देखील कोल्हापुरात बोगस डॉक्टर विजय कोळूस्कर आणि श्रीमंत पाटील यांना गर्भलिंग निदान करताना रंगेहाथ पकडले. पोलिसांनी आज मडीलगे आणि राधानगरी येथे छापे घातले. यात मोठे रॅकेट हाती लागले मडीलगे येथे गर्भलिंग निदानचे मशीन, गर्भपाताची औषधे सापडली. राधानगरीमध्येही सोनग्राफी मशीन पकडले. गर्भ लिंग निदान कायदा असताना हा कायदा पायदळी तुडवत सर्रास गर्भ लिंग निदान केले जात आहे. मुलगा वंशाचा दिवा आणि मुलगी परक्याचे धन, मुलीच्या जन्माकडे आपुलकीने न पाहण्याची मानसिकता यामुळेच स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण वाढले असून गर्भलिंग निदान करणाऱ्या या टोळीच्या रूपाने अशा लोकांना ती संधी मिळाली आहे. अशा टोळ्यांकडून मुलीचा गर्भ मारून टाकण्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून हे रोखणे मोठे आव्हान आहे. आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अशा टोळ्यांचे फावले असून या यंत्रणांनीच आता कारवाई करण्याची गरज आहे. प्रसूतीपूर्व लिंग निदानासाठी होणा-या दुरुपयोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रसुतीपूर्व निदानतंत्र (विनीयमन व दुरुपयोगावरील प्रतिबंध) कायदा १९९४ लागू करण्यात आला. प्रसुतीपूर्व निदान चाचण्या ज्यामध्ये अल्ट्रा सोनोग्राफी किंवा अशी चाचणी ज्यात गरोदर स्त्री च्या गर्भजल, कोरीऑनीकव्हिलाय रक्त किंवा पेशी द्रव किंवा गर्भाचा भाग याचा नमुना घेऊन जनुकिय किंवा चयापचय विकृती किंवा गुणसुत्र विकृती किंवा जन्मजात व्यंग, हिमोग्लोबीनोपॅथी, लिंग संबंधित विकार यांचे निदान करण्यासाठी केला जातो. अशा चाचण्या किंवा तपासण्या यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्यामुळे उपरोक्त उपकरणांचा व तंत्राचा वापर करुन प्रसूतीपूर्व लिंगनिदान करुन स्त्री भ्रुण हत्या करणे, असे गैरप्रकार करणा-यांना कडक शिक्षा देण्यासाठी हा कायदा लागू केलेला आहे. ‘गर्भजल व गर्भलिंगनिदान तंत्र (नियमन व गैरवापर प्रतिबंध) कायदा, १९९४’ या कायद्यात २००३मध्ये सुधारणा करून त्याचे नवे नाव ‘गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निदान प्रतिबंध) कायदा’, असे करण्यात आले आहे. गर्भलिंगनिदान व गर्भनिवड करण्यास या कायद्याद्वारे मनाई करण्यात आली आहे. गर्भाचे निदान करून तो गर्भ मुलीचा असल्यास गर्भपाताद्वारे तो काढून टाकण्याच्या अमानवी प्रकारावर वचक बसवण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. असे बेकायदा कृत्य करणाऱ्या डॉक्टरांवर खटला भरण्यात येतो व पुराव्यासह सिद्ध झाल्यास त्याला शिक्षा ठोठावण्याची तरतूद आहे. काही विशिष्ट प्रकरणांमध्ये गर्भनिदानाला सशर्त अनुमती देण्यात आली आहे. त्यात प्रामुख्याने आनुवंशिक विकलांगपणाची शक्यता, लिंगविषयक रोग यांचा समावेश आहे. तसेच ज्या महिलेचे वय ३५ वर्षांहून अधिक आहे. दोनपेक्षा अधिकवेळा गर्भपात झाला आहे. गर्भवती महिलेला रेडिएशन, संसर्ग अथवा रासायनिक बाधा झाली आहे. गर्भजलचाचणी, आठ आठवड्यांचा गर्भ (५६ दिवस) व अर्भकाचा जन्म या स्तरावर या कायद्याद्वारे लक्ष ठेवले जाते. सर्व सोनोग्राफी सेंटर, जेनेटिक कौन्सिलिंग सेंटर आणि लॅबोरेटरी या कायद्याच्या कक्षेत आणून त्यांना नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यांची देखरेख करणे व तपासणी करणे याचा त्यात समावेश आहे. या केंद्रांनी कायद्याचा भंग केला, तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. मुलगा वंशाचा दिवा आणि मुलगी परक्याचे धन, मुलीच्या जन्माकडे आपुलकीने न पाहण्याची मानसिकता यामुळेच स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण वाढले असून गर्भलिंग निदान करणाऱ्या या टोळीच्या रूपाने अशा लोकांना ती संधी मिळाली आहे. अशा टोळ्यांकडून मुलीचा गर्भ मारून टाकण्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून हे रोखणे मोठे आव्हान आहे. आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अशा टोळ्यांचे फावले असून या यंत्रणांनीच आता कारवाई करण्याची गरज आहे. अलीकडच्या आकेडवारीनुसार दर हजारी पुरुषांमागे मुलीच्या जन्माचे प्रमाण ९२५ आहे.




## नवे वर्षे आले...!

फुलांची उधळण ही
साऱ्या अंगणात झाली,
सोन्याचा दिन उगवला
चोहीकडे धरती नटली.

सुख-दुःखाच्या मार्गात
उठती नेहमी ज्वाला,
मोठा संघर्ष करून
गुंफूया विकासाची माला.

नसानसातून जोश
चित्ती उधळू दे गडे,
संकल्प पूर्ण करण्यास
माथा टेकुया देवापुढे.

चांगले जगण्यासाठी
जिद्दीने संघर्षाला मारू,
विज्ञानाच्या प्रकाशाने
भव्य-दिव्य क्रांती करू.

चैतन्य ऱ्हदयात घेऊनी
नैराश्याची होळी करूया,
उत्साह मनात आणून
विकासाचा मार्ग धरूया.

नवीन युगाचे गाणे
आनंदाने गाऊ मनी,
चांगले संकल्प करू
या नव्या वर्षाच्या दिनी...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

## वर्षपूर्ती ..

दिन रे सुखानंदाचा
नव वर्षाचा सोहळा
फुलतो झुलतो मळा
आप्तेष्ट मित्र मेळा
उत्साह जरूर हवा
उन्माद तेवढा टाळा
दुखवू नये कुणीही
पथ्य एवढेचं पाळा
प्रयास वृक्ष पहावा
काय आले ते फळा
अभिनंदन हो त्यांचे
सोसल्या जयाकळा
अभिवादन समस्ता
बसल्या जया झळा
आभार मानता पहा
दाटूनि येईलं गळा
चुका मान्य करताना
ऊर असावा मोकळा
बरेचं जायचे अजूनि
उत्साह हो खळाळा
संधी मिळाली सुंदर
आठवावे त्या दयाळा
पुनश्च आपणचं हवे
असेचं वाटावे सकळा
- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996.

## नववर्षाचे स्वागत

गत वर्षाला निरोप देऊन
नववर्षाचे स्वागत करूया
प्रत्येक क्षण या वर्षाचा
आनंद अन् प्रीतीने भरुया

दीर्घायू, आरोग्य, सुख शांती
लाभू दे देवा सर्वांना
आजच्या दिवशी आमुची आहे
तव चरणी हीच प्रार्थना

भीती, दहशत आणि वंचना
आम्हापासून दूर जाऊ दे
भारतभूचा ध्वज तिरंगा
जगात साऱ्या उंच राहू दे

उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर

## सातपुडा

सातपुड्याच्या सप्तरांगा
मोहून घेती माझे मन
उंच उंच टेकड्यांचे
निळ्या नभाशी मिलन

हरीत सृष्टीचा शोभे
शिरी मुकूट छान
सप्तरंगी फुलती फुले
इंद्रधनुचे रंग घेऊन

रानीवनी घुमे संगीत
झ-यांच्या झुळझुळाटानं
पक्षांच्या सुस्वरांनी
मंत्रमुग्ध होई वातावरण

सप्तमेरू करती साधना
जणू सप्तऋषी बनून
मन व्हावे ध्यानस्थ
क्षणभर सारे विसरून

गुरू,मित्र होऊनी निसर्ग
मानवा देई शिकवण
निसर्गाच्या सहवासात
सत्यसुखाचे मिळे ज्ञान....
सुनिल माथने
अकोला
मो.9403282970



## नितळ निश्चल....

वेदनेच्या काठावरती
भावनेचे गाव आहे
काट्या मध्ये फुलते ती
तरी ऋतूचे नाव आहे
डोळ्या मध्ये नितळ तीच्या
वाहतात सतत निश्चल भाव
आसवांचा उगम मात्र
काळजाच्या पेशीला ठाव
आतल्या आत झुरेल पण
घुसमट कधी सांगत नाही
झऱ्या सारखी खळखळेल
दुःख कधीच पांगत नाही
जळून देईल सुगंध
उगळून देईल शितलता
दुखले खुपले गिळुन सारे
बिलगते जशी वृक्षलता
बलराज संघई
9420015108

## नवीन वर्ष

दरसाली नवीन वर्ष येते
दरसाली निघूनही जाते
नवीन वर्षाचे स्वागत करावे
सरत्या वर्षाला वंदन करावे
नवीन वर्षाकडून शिकावे
सरत्या वर्षाला गुरू मानावे
विसरून जावे मतभेद सारे
कुणास का म्हणून व्यर्थ बोलावे...?
जगी जगावे माणसासारखे
कोणाला का म्हणून दुखवावे..?
नकोच हेवे,दावे आपल्यात
सत्याच्या वाटेवर चालत रहावे
संकल्प करावे नवीन वर्षात
झाडांचे संगोपन करण्याचे
प्राणवायू ते फुकटात देतात
का म्हणून त्यांना तोडायचे...?
नवीन वर्षाच्या शुभेच्छा द्यावे
अन् आपुलकीचे नाते जोडावे
सुख,दुःख जाणून घ्यावे सर्वांचे
स्नेहबंधनाचे धागे विणावे
सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५




## हरण्याआधी

पुन्हा एकदा युद्ध शेवटचे,
हरण्याआधी लढू म्हणतो
कृष्णाविना मी अर्जुन जरी,
जीवनसंग्राम जिंकू म्हणतो.

कौरवांची काय तमा अन्
पांडव कुठे सोबतीला
जीवनाच्या चक्रव्यूहात,
अभिमन्यू एकटा फसलेला.

कापून टाकता दोर सारे,
बंद रस्ते परतीचे
सिंह गेला गड जिंकुनी,
पाने वाचा इतिहासाचे.

म्हणुनी तर पाषाणावर,
पिंपळापरी रुजणे आहे
ओले मूळ होवून आता,
खडक भेदून जाणे आहे.

जिंकण्यासाठी लढण्याचा,
ध्यास मनी तेवतो आहे
म्हणून तर काळोखात ही,

दिवा होऊन जळतो आहे.

ज्ञानेश्वर गायके.. खामगाव
कन्नड..९४०३३८४८८९

## जगण्यासाठीचा हा संघर्ष


आयुष्याच्या ह्या वाटेवरून चालताना...,
संघर्ष प्रत्येकासाठी सारखाच असते .
जिवन जगण्याची कलाही,
संघर्ष केल्यावरच सर्वांना मिळत असते.
चालायला शिकतो आपणपण,
ध्येय गाठायचे कसे हे ,
संघर्ष आपल्याला शिकवून जात असते .
कोणी चार पुस्तके वाचून स्वतःला घडवत असते ,
तर काहींना परिस्थितीचे चटके,
अनुभवी बनवून जगण्यास शिकवून जात असते.
जिवनात जगण्यासाठीचा हा संघर्ष ,
शेवटच्या श्वासा पर्यन्त करत रहावे लागते.
जिवन जगण्यासाठीचा हाच संघर्ष ,
पिढ्यानपिढ्या सर्वांचे आयुष्य घडवुन देत असते.

-तुषार लाखे, वरोरा, जिल्हा चंद्रपूर



## संत जनाबाई

गंगाखेड गाव, गोदावरी काठी,
जनाईच्या भेटी, चला जाऊ ,
संत जनाबाई, कीर्ती तिची थोर,
राबे मनोहर, घरी तिच्या,
दळीतो कांडीतो, भरीतो हा पाणी,
जनीच्या हो मनी, ध्यान त्याचे,
कामात शोधला, जनाईने देव,
अंतरात भाव, दाटलेला,
नामयाची दासी, झाडलोट करी,
अन् केर भरी, चक्रपाणी,
सावळ्या हरीचे, नाम सदा ओठी,
तेव्हा येती भेटी, पांडुरंग,
माय जनाबाई, थोर तुझी भक्ती,
तशी लाभो मुक्ती, शारदेला,
सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे-चोपडे
परभणी. ९८२३०६६६०६



## अवधी

चालला अवधी ||
त्या वाळू प्रमाणे ||
क्षणा न् क्षणाने ||
पाठीमागे ||१||

कधी न थकता ||
चालली नकळे ||
घटिका न् पळे ||
अविरत ||२||

उपयोग त्याचा ||
तो सुकर्मा साठी||
सुभाग्य लल्लाटी||
भाग्यरेखा ||३||

कालचक्र पुढे||
फिरत फिरत ||
मागे न परत ||
वळतसे ||४||

चालत चालता||
जीवनाची वाट||
कितीही बिकट||
पार होई ||५||

निसर्ग किमया ||
सूर्य-चंद्रा परी||
त्या नियमां परी ||
नभांगनी ||६||

सदुपयोग तो ||
वेळेचा करूनी ||
आनंद जीवनी ||
भरुया तो ||७||
© सौ. वैशाली इंदुमती जाधव-
महाडिक.
मो. क्र.- ९७६७४३७९२३

## पाऊस गातो गाणे

टिप टिप पाऊस
झोंबो वारा
गीत गाऊ पाहतो
आसमंत सारा
कडाडणारी वीज
गडगडणारे ढग
धावण्याऱ्या छत्रीतली
आपली लगबग
डराव् डराव् बेडक
छम छम तळे लेझीम
हाती घेऊनी जणू थेंब
लाटेवर पळे
खळ खळ झरा
तड तड पत्रा
पावसाने भरवली
बघा ताला सुरांची जत्रा

गंगा कांबळे, पुणे



## साधी माणसं

समाजात वावरताना
निरखून पाहताना
अवतीभवती आढळतात
ठळकपणे दिसतात
मनात घर करणारे
कष्टात दंग राहणारे
आपली ती माणसं
ते साधी माणसं...

पैशाचा मोह नाही
लबाडीचा गंध नाही
मोठेपणाचा आव नाही
देखाव्याचा साज नाही
ओठांवर नेहमीचेच
त्यांचे ते स्मित हास्य
जिव्हाळ्याची माणसं
ते साधी माणसं

बोलायला गोड
चारित्र्याची जोड
स्वभावाने मोकळे
वर्तनाने ढाकळे
मनाने ते निर्मळ
माणुसकीने नितळ
आपुलकीची माणसं
ते साधी माणसं

देशाची शान
समाजाचा मान
गावाचा आधार
कुटुंबाचा आकार
नातलगांना जपती
जीवाला जीव लावती
जीवलग ती माणसं
ते साधी माणसं
- बबन दामोदर गुळवे
जि.लातूर
मो.९७३०९३९७३२.

## अश्रूंची पेरणी...!

वेदना थांबण्यास
कुणाकडे घेऊ धाव,
सांग आता देवा
तुझे कोणते रे गाव.

व्यथा भोगतांना
मन हे जळते रे,
नशिबातल्या यातना
जीवनात छळते रे.

जगतांना वेदनांचे
चटके खूप साहिले,
कठीण समय येता
दुःखात अश्रू वाहिले.

जगाकडे पाहतांना
सारे वाटते उदास,
साडेसाती जाऊ दे, ही
दुवा मागतो खुदास.

हुंदका दाटल्यावर
केविलवाणी पडावे,
आणि झाडाला धरूनी
एकांती खूप रडावे.

अश्रूंची पेरणी करून
दुःखाची पीक घ्यावे
हुंदका गिळून-गिळून
हे जीवन जगावे.

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

## जा घेऊन .......

जा घेऊन जा क्षण सारे ते भारावलेले
जा घेऊन तुझ्यासवे मोहोळ आठवणीतले
वाहून ने वाऱ्यासवे गंध तुझ्या स्पर्शातला
मोडून टाक बंध तो थंड शहाऱ्यातला
विरून जाऊदे श्वासांची लय सांधलेली श्वासांची माळ आता पुरी भंगलेली
रोख प्रेमाचा अश्व स्वैर सुटलेला थोपव भावनांचा सागर उधाणलेला
आता नाही सोबत त्या गोड क्षणांची छळती मनास माझ्या स्मरणे
आठवांचीपुसून टाक खुणा त्या पावन प्रीतीच्या
दुखरे कोपरे अन भिंती हळव्या मनाच्या.....
...... हळव्या मनाच्या
प्रियांका रोठे

# नववर्षाचे सेलिब्रेशन करुयात



प्रा.विजय पोहनेरकर
संपर्क 94 20 92 93 89

आधुनिक केसरी

**मित्र हो 31 St सेलिब्रेट करण्या मध्ये फक्त खाणेपिणे व्हावे, धिंगाणा घालावा असा कुणाचाच उद्देश नसतो. अर्थात तसा जरी कुणाचा उद्देश असेल तरीही तो चुकीचा आहे असे ही नाही. आपण का एकत्र येत असतो ? काय कारणं आहेत ? केवळ नाती जपावीत , वारंवार भेटत गेल्यामुळे relations घट्ट व्हावीत, प्रेम वाढीस लागावे हा मुख्य उद्देश असतो. विशेषतः जेंव्हा आपण वयाने 50/55 वर्षाच्या पुढे जातो तेंव्हा आपण पुन्हा पुन्हा कुठल्या तरी निमित्ताने भेटले पाहिजे असे तीव्रतेने वाटते . हळूहळू नातेवाईका शिवाय खरी माया , खरे प्रेम कोणीही करू शकत नाही हे या वयात लक्षात येत असावे .**

याचा अर्थ मित्र काही कामाचे नाहीत असे समजू नये किंवा तसे मला म्हणायचे नाही .जगणं सुसह्य होण्यासाठी नातेवाईक आणि मित्र दोघांचीही आवश्यकता असते एवढं मात्र खरं !

अहंकार बाळगून, अबोला धरून एकटे एकटे राहण्यापेक्षा भेटावे, व्यक्त व्हावे, मोकळे व्हावे व उर्वरित आयुष्य नातीगोती जपत जपत आनंदाने घालवावे आणि या जगाचा निरोप सुखा समाधानाने घ्यावा.

आयुष्याची संध्याकाळ सुरू झाली की आपली माणसं जवळ असावी वाटतात .आणि आपली माणसं आपली राहण्यासाठी निर्व्याज प्रेम करावं लागतं ! न्याय निवाडा करतांना तराजू कोणत्याच बाजूला न झुकू देता ज्याला तो वजन काटा स्थिर ठेवता येतो ती माणसं स्वतःही सुखी होतात आणि दुसऱ्यालाही आनंदी ठेऊ शकतात.तेच आपणां सर्वांना करता आलं पाहिजे , म्हणजे नाती टिकून राहतात आणि जगण्यातली मजा वाढते.

खरं तर सुखी होण्यासाठी फार काही करावं लागत नाही परंतु जे करावं लागतं ते आम्ही करत नाही म्हणून आपण दुःखी होतो .

आपल्या अवतीभवतीच्या कोणत्याच नात्या कडून कोणतीच अपेक्षा करू नका .ज्याला शून्य अपेक्षा ठेऊन जगता येतं ती माणसं काही प्रमाणात का होत नाही नक्की सुखी होतील असा मला विश्वास आहे .गोष्ट सोपी नाही पण प्रयत्न केल्यावर मुळीच अवघड नाही हे मात्र 100 % खरं !

**चला तर मग.......**

**एकत्र जमू या**
**मोकळं होऊ या**
**हसू या खेळू या**
**मस्त जगू या !**
**येतांना काही**
**आणलं नाही**
**जातांना काही**
**घेऊन जायचं नाही**
**एवढं सगळं कळतं**
**मग सुख का मिळत नाही ?**
**गरीब असो श्रींमत असो**
**स्वागत केलं पाहिजे**
**पिठलं भाकरी असली तरी**
**प्रेमाने वाढलं पाहिजे**
**सगळ्यांकडे सगळं आहे**
**पण हल्ली प्रेम मिळत नाही**
**म्हणून माणसं भांबावली**
**काय करावं कळत नाही**
**ONLINE खरेदी करून**
**मिळत नसतात नाती**
**आपणच आपल्या हाताने**
**का करून घ्यायची माती**
**HOT नको COLD नको**
**नको चिल्ड बियर**
**बाबाहोत एकमेकाची**
**फक्त करा केयर**
**दरदरून घाम येऊन**
**कळ येईल कधी**
**काय माहित कोण जाईल**
**कोणाच्या आधी ?**
**काहीच वाटत नसेल तर**
**भेटणं व्यर्थ आहे**
**गेल्यावर बोंबलण्यात**
**काय अर्थ आहे ?**




**मरतांना प्राण कसा**
**सहज गेला पाहिजे**
**म्हणून आपण सर्वांनी**
**नातं जपलं पाहिजे**
**ज्या घरात नात्याची**
**वीण घट्ट असते**
**त्यांच्याच जगण्यात**
**खरी मजा असते**
**गणगोत उसवून बाबा**
**काही उपयोग नसतो**
**अंधारात रडू रडू**
**चारचौघात हसतो**
**भेटत जा बोलत जा**
**तेच येईल कामी**
**विचारा नं पाया पडून**
**कधी आल्या मामी ?**
**लाख , कोटी मूळे जर**
**सुख मिळाले असते**
**सहा सहा महिन्यात पोरांचे**
**घटस्फोट झाले नसते**
**जेंव्हा संधी मिळेल तेंव्हा**
**जरूर एकत्र यावं**
**31 ST असो दिवाळी असो**
**भरभरून जगावं**

# ३१ डिसेंबर साजरा करताना कुटुंबाचे भान ठेवा



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

आधुनिक केसरी

**वर्षाच्या अखेरचा दिवस म्हणजेच ३१ डिसेंबर. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी प्रत्येक जण उत्सुक असतो. वर्षभरामध्ये अनेक बऱ्या वाईट घटना घडलेल्या असतात. त्या सर्वांचा निरोप जणू या दिवशी घेतला जातो. व्यक्तीच्या आयुष्यामध्ये प्रत्येक दिवस नवी आशा व नवी स्वप्ने घेऊन येत असतो. कालचक्राच्या नियमानुसार वर्ष बदलते.नवीन वर्ष सुरू होते. असे असतानाही ३१ डिसेंबर हा दिवस आम्हा भारतीयांसाठी काहीसा खासच ठरतो.**

३१ डिसेंबर साजरा करण्यासाठी प्रत्येक जण सज्ज असतो.अनेक हॉटेल्समध्ये त्यासाठी खास व्यवस्था केलेली असते. आनंदात आणखीनच भर पडण्यासाठी महाराष्ट्रात या दिवशी ग्रामीण भागात पहाटे एक वाजेपर्यंत व मुंबई शहरामध्ये पहाटे पाच वाजेपर्यंत परमिट रूम चालू ठेवण्याची घोषणा करण्यात आली. अनेक हॉटेलमध्ये खास ऑफर्स खवय्यांसाठी ठेवण्यात आलेल्या आहेत.कित्येक ठिकाणी गुप्त रेव्ह पार्ट्यांचे सुद्धा आयोजन करण्यात आलेली आहे. अशा ठिकाणी ड्रग्सचा वापर वारेमाप होणार यात शंकाच नाही. अशा गोपनीय पार्ट्या होण्याच्या ठिकाणी पोलिसांची छापेमारी होणार. सहभागी असणाऱ्या तरुणांवर गुन्हे दाखल होणार. त्यामध्ये त्या तरुणांची व त्यांच्या आई-वडिलांची बदनामी होते. गुन्हे दाखल झाल्यामुळे तरुणांचे करिअर बरबाद होण्याची शक्यता आहे.गेल्या वर्षी प्रमाणे नववर्षाच्या पूर्व संध्येला दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्या व अपघात झालेल्या तरुणांची नावे वृत्तपत्रांमध्ये झळकतील.

मित्रांनो,आपले जीवन अनमोल आहे. आपले जीवन फुलविण्यासाठी आपल्या आई वडिलांनी रक्ताचे पाणी केलेले असते. हेच आपण विसरत चाललो आहे. आपण आपल्या आयुष्यात अशा अनेक वर्षांना निरोप देऊन नवीन वर्षाचे स्वागत करणार आहोत. परंतु हे करत असताना आपल्या जीवाची काळजी घेणे गरजेचे आहे. रात्री मित्रांसमवेत बराच वेळ पार्टीत रमून नंतर झिंगकलेल्या अवस्थेत गाडी चालवत घरी जात असताना अपघात झाल्यामुळे कित्येकांना आपले प्राण गमवावे लागले तर काहींना कायमचे जायबंदी होऊन आयुष्यभर अंथरुणावर पडून रहावे लागले. ज्या म्हाताऱ्या आई-वडिलांची आपण जबाबदारी घ्यायची.त्याच वयात आपल्या जबाबदारीचा भार त्यांच्या अंगावरती पडतो आहे. हे टाळणे गरजेचे आहे. नववर्षाचे स्वागत जरूर केले पाहिजे. आपल्या कुटुंबाच्या समवेत मौज-मजा केली पाहिजे. पण हे करीत असताना आपला किंवा आपल्या कुटुंबीयांचा जीव धोक्यात येणार नाही याचीही दक्षता घेणे गरजेचे आहे. नवीन वर्षाच्या स्वागताचा आनंदोत्सव जरूर साजरा करा;पण त्याच वेळी आपली घरी कोणीतरी वाट पाहत आहे हे मात्र मनात कायमचे ठेवा. आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.



आधुनिक केसरी

## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424



## हॉट अँड सोअर सूप

हे एक ' इंडोचायना ' प्रकारचे सूप आहे .नावाप्रमाणेच थोडे स्पायसी थोडे आंबट असे थोडे तिखट अशा चवीचे असते . शक्यतो हे सूप जेवण्याच्या पूर्वी स्टार्टर सारखे घेतात. थोडेसे घट्ट सर असून ब्राऊन कलरचे असते. थंडीत आणि पावसाळ्यात हे सुप पिण्यासाठी उत्तम आहे. कारण स्पायसी असल्यामुळे शरीरात उष्णता वाढवणारे असे हे लज्जतदार सूप आहे.करायचे ना मग ?

**साहित्य :** या सुपासाठी सर्व भाज्या एकदम बारीक कट करून घेतल्यास छान मिळून येते.
2 चमचे तेल, पाव वाटी कोबी, 2 चमचे गाजर, 2 चमचे सिमला मिरची, 2 चमचे बीन्स, 2 चमचे कांदा पात, 1 चमचा मिरचीचा ठेचा, 1 चमचा आले 1 चमचा बारीक चिरलेला लसूण, 1 चमचा डार्क सोया सॉस, 1 चमचा व्हिनेगार, अर्धा चमचा रेड चिली सॉस, 3 चमचे कॉर्नफ्लोअर, चवीनुसार मीठ, 1 चमचा सेलेरी घालायची असल्यास.

**कृती :** प्रथम सर्व भाज्या स्वच्छ धुवून एकदम बारीक कट करून घ्याव्यात . मग गॅस वर कढई ठेवून त्यात तेल घालून कांदा घालून पारदर्शक होईपर्यंत परतावा. मग त्यात आले ,लसूण घालून किंचित परतावे. नंतर सिमला मिरची ,कोबी ,गाजर, बीन्स घालून त्यांचा कच्चेपणा जाईपर्यंत परतावे . आता मिरचीचा ठेचा ,कांदा पात ,सेलरी घालावी व सॉसेस घालावेत 3 कप पाण्यात किंवा व्हेजिटेबल स्टॉक मध्ये कॉर्नफ्लोअर घालून ते सावकाश त्यात घालावे व एकसारखे सतत ढवळावे . शेवटी व्हिनेगार घालावा .चवीनुसार मीठ घालून गॅस बंद करून सर्व्हिंग बाऊलमध्ये सूप काढून गरम गरम सर्व्ह करावे .

**वैशिष्टय :** या सूपामध्ये भरपूर भाज्यांचा वापर केलेला असल्यामुळे हेल्दी सूप आहे .टोमॅटो सूपाबरोबर जसे क्रूटान म्हणजे क्रिस्पी ब्रेड देतात तसे या सुपासोबत तळलेले नूडल्स देतात . थंडीत गरम गरम सूप मन्चुरिअन ,व्हेज 65 ,किंवा व्हेज क्रीस्पी यांसारख्या स्टार्टर सोबत घेतले जाते .आंबट ,स्पायसी चवीचे हे सर्वांचे लाडके सूप आहे.

# साधक जाले कळी । गुरुगुडीची लांब नळी ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**समकालीन व्यवस्थेला आव्हान देऊन आपले सत्य विचार व्यक्त करणे अथवा लिहिणे हे किती क्रांतिकारी कार्य असते(?) ते केवळ येशू ख्रिस्त, सॉक्रेटीस, रोमेल, ज्ञानोबा, तुकोबा आणि पानसरे यांनाच विचारायला हवे! त्यात सतरावे शतक, कडेकोट वर्णव्यवस्था, राजेशाही सत्ता असा खडतर काळ असतांना आपल्या समकालीन भोंदू, फसवेगिरी, सामान्य माणसांची लुबाडणूक करणाऱ्यांची दूषणं काढणं, ती उजागर करणं हे मोठं दिव्य कार्य होतं आणि तूकोबांनी ते दिव्य करून दाखवलं! त्याच्या बदल्यात त्यांना अनंत यातना भोगाव्या लागल्या आणि आणखी काय काय(?) भोगावं लागलं, परंतु तुकोबा डगमगले नाही. त्यांनी आपलं प्रबोधन कार्य थांबवले नाही. नेहमीच बोलणाऱ्यांच्या तुलनेत लिहीणाऱ्यांची संख्या कमीच असते. बोलणे-लिहिणे हे दोन्ही करणारे आणखी कमी आणि वरील दोन्हीला कृतीची जोड देणारे अत्यल्प! यात तुकोबाराय बोलणे-लिहिणे-कृती करणे याच्या वरच्या रांगेत बसतात. माणूस केवळ श्वासावर जगत नसून तो आपल्या हृदयातील काव्यमय आणि विचार स्पंदनावर आपले जीवन व्यतीत करत असतो.**

ही स्पंदने सर्वाकडे असतात परंतु सर्वांनाच जाणवतात असे नाही, परंतु ज्यांना ती जाणवतात ती माणसे काहीतरी लिहून ठेवतातच ठेवतात! आपल्याला कष्ट, मार पडला तरी बेहत्तर परंतु आपला भोवताल सजग व्हावा, आपल्या नंतर येणाऱ्या पिढीला जीवन जगणे सुसह्य व्हावे यासाठी निरपेक्ष भावनेने आपली लेखणी आणि वाणी झिजवणारे तुकोबाराय आपल्यासाठी नित्य वंदनीय आहेत. समकालीन लोकांना तूकोबांनी नेहमीच आव्हान दिलेले आहे.

आपल्यासारखे तुकोबा पोटार्थी प्रबोधनकार-विचारवंत-कवी-लेखक नव्हते! देशाच्या सिमेवर लढणारा एखादा देशप्रेमी सैनिक ज्याप्रमाणे आपले शीर तळतावर घेऊन शत्रूंचा सामना करतो; अगदी त्या शूरवीर सैनिकासारखे तुकोबा व्यवस्थेसी सरळ दोन हात करतात. त्यांना कोणत्याही प्रकारची भीती वाटत नाही. मृत्युला त्यांनी आपला मित्र मानले आहे. हे करतांना त्यांच्या अभंगातून समग्र क्रांतीची स्पंदने आजही तेवढ्याच ताकदीने जाणवायला लागतात आणि त्यातून

साधक जाले कळी । गुरुगुडीची लांब नळी ॥१॥
पचीं पडे मद्यपान । भांगभुर्का हें साधन ॥ध्रु.॥
अभेदाचें पाठांतर । अति विषयीं पडिभर ॥२॥
चेल्यांचा सुकाळ । पिंड दंड भगपाळ ॥३॥
सेवा मानधन । बरे इच्छेनें संपन्न ॥४॥
सोंगाच्या नरकाडी । तुका बोडोनियां सोडी ॥५॥
(१२१४)

**तुकारामनीती**
**भाग -७५**

असे सडेतोड, खणखणीत अभंग जन्माला येतात. असे लिहायला धाडस लागते. वाघाचे काळीज घेऊन आलेले तुकोबाराय कुणाचीच भीडभाड ठेवत नाहीत. धर्म, समाज यात साधू-संत म्हणवून घेणाऱ्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला होता. धर्माच्या नावाखाली सर्वसामान्य माणसांची आर्थिक, भावनिक आणि धार्मिक लुट चालू होती. संपूर्ण समाज जाती व्यवस्था, वर्ण व्यवस्थेच्या कडेकोट बंधनात अडकला होता. याला कर्मकांडाचा विषारी विळखा बसलेला होता. व्यवस्थेला सडेतोड प्रश्न विचारण्याचे धाडस कुणाकडेच नव्हते. साधू महाराजांनी सांगावे आणि बिचाऱ्या यजमानाने नंदी बैलासारखी केवळ मान हलवावी! एवढेच काय ते शिल्लक होते. अशी एकीकडे व्यवस्था असतांना महाराष्ट्रात अठरापगड जातींना कोणत्याही कर्मकांडाशिवाय केवळ भजनाच्या-पंढरपूर वारीच्या रूपाने वारकरी संप्रदाय काम करत होता. या संप्रदायाचा फार मोठा अनुयायी महाराष्ट्रभर होता आणि तुकोबांच्या घरी ती परंपरा अगोदरच चालू होती. असे असतांना तुकोबांना आपल्या शेतात असणारे श्री विठ्ठलाचे मंदिर, त्याची पूजा-अर्चा हा वारसा चालत आला होता. त्यातूनच तुकोबांना कीर्तनाचे पारंपारिक बाळकडू घरूनच मिळाले. त्याला जोड म्हणजे तुकोबाराय अभंग लिहू लागले. हा दुग्धशर्करा योग त्यांच्या जीवनात जुळून आला, परंतु त्यांच्या शब्दांनी भल्याभल्यांच्या बुडाखाली जाळ सुरु झाला. तुकोबा त्या सर्वच तथाकथित भोंदुगिरी करणाऱ्यांना आपल्या कणखर शब्दांनी जागे करू लागले. षड्विकार रहित, निरपेक्षता असणारा साधू किंवा संत असायला हवा, परंतु तेंव्हाचे साधू कसे होते? धुम्रपान करणारे, गांजा-भांग पिणारे, जात-धर्म भेदाभेद करणारे, निरपराध स्त्रियांना फसवणारे, अशा विषयी साधूंचा सगळीकडे सुळसुळाट झाला होता. धर्माच्या, कर्मकांडाच्या नावाखाली तमाम समाजाची राजरोस लुट चालू होती. गोरगरिबांना दिवसाढवळ्या लुटले जायचे. धर्माच्या नावाखाली स्त्रियांची अब्रू सुरक्षित नव्हती. धर्म क्षेत्रात सगळीकडे हाहाःकार माजला होता. या भोंदू साधूं-संतांच्या भोवताल शिष्य लोकांनी आणखी एक मजबूत कंपू तयार केला होता. चेल्याचपेट्यांनी गराडा घातला होता. साधूच्या नावावर त्यांचे चेले (शिष्य) गावोगाव जाऊन लोकांची लुट करू लागले. लोकांकडून मानधन, सुग्रास भोजन, वरून दान इत्यादी बाबी राजरोस सुरु होत्या. समाजाची लुट सुरु होती. अशा लोकांना शेवटी तूकोबांनी, हे सगळे सोंगे असून हे धर्माच्या नावाखाली दिवसा नरकाडी करणारे म्हणजे माणसांची विष्टा खाणारे लोक असून यांना कुणीही काहीही मान-धन देऊ नये. अशा भोंदू साधू-संत लोकांना सामान्य लोकांनी भर चौकात आणून मुंडन करावे. त्यांची गावात धिंड काढून हाकलून देण्याचे आव्हान तुकोबा लोकांना करतात. असे व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे महत्कार्य तूकोबांनी केल्यामुळेच त्यांना प्रचंड त्रास झाला. घरा दाराला यातना भोगाव्या लागल्या. असे होत असले तरी तूकोबांनी आपले लोकोद्धारचे कार्य सुरूच ठेवले. तूकोबांनी कोणत्याही लाभ-हानीचा विचार न करता अखंड आपले अभंग विचार प्रसार चालूच ठेवले. याचा परिणाम असा झाला की; त्यांचे अभंग लोक वाचू लागले. लोकांमध्ये राहून लोकोद्धाराची कृती करणारे कवी म्हणून तुकोबांची ओळख व्हायला लागली. लोकांना तुकाराम म्हणजे आपल्यातीलच सामान्य पण आपलं कल्याण करणारा, भलं करणारा हा एक चांगला माणूस आहे! असा विश्वास यायला लागला. लोक त्यांना ओळखू लागले. त्यांचे अभंग-कीर्तन ऐकायला लोक गर्दी करू लागले. याचा फायदा दोघांनाही झाला. सुदैवाने त्याकाळात आणि त्या भागात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचा अंमल होता. शिवाजी महाराजांपर्यंत तुकोबांची कीर्ती पोहोचली होती. छत्रपती शिवाजी महाराज आणि तुकोबांची भेटही झाली होती. त्यात



तुकाराम महाराजांनी छत्रपतींना आपण रयतेसाठी खरे जनसेवक आहात. आपण हे काम मोठ्या निष्ठेने करण्याचे आवाहन केले होते. याचे फलित म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज भजन-कीर्तनाला जाऊ लागले. दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराज हे तुकोबांचे अनुयायी आहेत ही बातमी कळल्यामुळे त्यांच्याविषयी लोकांमध्ये आणखीनच आदर निर्माण झाला. तुकोंबांचे कार्य अखंडपणे सुरूच होते. असे असतांना तुकाराम महाराजांच्या घरी अडचण सुरु आहे याचा निरोप छत्रपतींना गेला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी जड-जवाहीर-मोहरा इत्यादी नजराणा तुकाराम महाराजांच्या घरी पाठवून दिला, परंतु मोठ्या सन्मानाने तुकाराम महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अनमोल नजराना परत करतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करणारे अभंग लिहिले आहेत.

हे साप्ताहिक सदर तुकाराम नीती मागील ७३ भागापासून अखंड सुरु आहे. तुकाराम महाराजांची ही तुकाराम नीती खरी समाजोद्धारक आहे. नीती म्हणजे सामान्य लोकांना जीवन जगण्यासाठीचा केलेला उपदेश! आत्तापर्यंत अनेकानेक नीती तज्ञ आणि त्यांच्या नीती प्रसिद्ध आहेत. कृष्ण नीती, नारद नीती, भीष्म नीती, विदुर नीती, दंड नीती, चाणक्य नीती, कुरल इत्यादी भारतीय नीतीकारांच्या सोबतीने प्लेटो, नित्से, मेकावली यांनी सुद्धा समकालीन समाजाच्या उत्थानासाठी काही महत्वपूर्ण नीती तत्वे अधोरेखित केली आहेत. हे सगळेच नितीकार तत्कालीन समाजात समाज मान्यता पावलेले नितीकार म्हणून ओळखले जातात. त्यांचे नीती तत्वज्ञानही तेवढेच मार्गदर्शक आणि अनमोल, अविनाशी आहे. या सर्वांच्या तुलनेत सामान्यांच्या व्यथा-वेदना-संवेदना स्वतः अनुभूती घेऊन ज्यांनी सर्वसामान्य समाजाच्या सार्वकालिक उद्धाराचे सहज सोपे अभंगतत्व लोकांच्या भाषेत मांडले असे जगद्गुरू तुकोबाराय हे महान नीतीकार आहेत. त्यांचा एकएक शब्द काळाच्या कसोटीवर घासून पहिला असता आजही तो चमकतो आहे आणि तेवढाच तंतोतंत लागू होतोय. त्यासाठी तुकोबांचे अभंग-कीर्तन-जीवन म्हणजेच तुकाराम नीती होय! ही नीती केवळ आम्हा महाराष्ट्रातीलच माणसांसाठी उपयोगी नसून संपूर्ण जगाला दिशा देणारी ही वैश्विक तुकाराम नीती आहे. तुकोबांचा एकएक अभंग म्हणजे नीतीने ओतप्रोत भरलेला अनमोल खजाना आहे! आत्तापर्यंत लाखो लोकांनी दोन्ही दोन्ही हातांनी हा खजाना लुटला, परंतु या खजाण्याचे मूल्य अबाधित राहिले आहे, नव्हे नव्हे ते दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे! निश्चितच ही आपल्या सर्वांसाठी गौरवपूर्ण, अभिमानाची बाब आहे! चिंतनासाठीचा निवडलेला अभंग आपण सर्वांनी लक्षपूर्वक वाचला आणि आचरणात आणला पाहिजे. आजही या अभंगातील दर्शविलेल्या प्रवृत्ती समाजात फिरत आहेत. आज हभप-साधू-संत-महाराज-बाबा-वेगवेगळे "चार्य" इत्यादीच्या उपाधीने भोंदू समाजाची राजरोस लुट करत आहेत. वारकरी सांप्रदायात आज ज्ञानोबा-तुकोबांच्या विचारांची पायमल्ली करणारे अनेक महाराज समाजाची लुबाडणूक करत आहेत. गावोगावी दोनदोन-चारचार अखंड हरीनाम साप्ताह सुरु आहेत. शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही, असे असतांना सप्ताहाच्या नावाखाली गाव-समाज लुटला जातोय! त्यासाठी महाराज मंडळींनी फुकट सेवा देऊ नये, परंतु कीर्तनाच्या नावाखाली समाजाची लाखोंची लुट करू नये. केवळ पैसा कमावणे हा खरा वारकरी संप्रदाय नाही. आपण समाजाचे काही तरी देणे लागतो आणि ज्ञानोबा-तुकोबांच्या विचारांचे पाईक असल्यामुळे संपत्ती गोळा करण्याला आळा घालून ज्ञानोबा-तुकोबांच्या अभेद तत्वज्ञानाचा अखंड प्रसार प्रचार करावा ही नम्र, कळकळीची विनंती! जय तुकोबाराय!

# सिंहगडावरील डॉ. बाबासाहेबांचे वास्तव्य

आधुनिक केसरी

**विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे डिसेंबर 1934 साली पुण्याच्या प्रसिद्ध सिंहगडावर एक महिना वास्तव्य होते. या काळात समाजबांधवांच्या अपूर्व प्रेमाने, आदरातिथ्याने अन् पाहुणचाराने महामानव छान रमले होते. त्यांचा निरोप घेताना महामानवाला गहिवरून आले होते. डोळ्यात अश्रूंनी गर्दी केली होती. विरोधक त्यांचे परममित्र बनले होते..... डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनमधील अखेरची गोलमेज परिषद संपल्यावर मुंबईला आले. काही दिवसांनी त्यांची प्रकृती बिघडली. त्यावेळी हवापालट करण्याकरिता बाबासाहेब डिसेंबर 1934 साली पुण्याच्या प्रसिद्ध सिंहगडावर आले. त्यांच्यासोबत मित्र रेवजी डोळस, सुभेदार घाडगे, मडकेबुवा अन् तांबे होते. त्यावेळी बाबासाहेबांचा मुक्काम पद्मनजी यांच्या बंगल्यावर होता.**

सिंहगडावर तेव्हा गणू दाजी मोरे नावाचा गृहस्थ राखणदार म्हणून राहत होता. कल्याण गावातील भिल्लार गावचा तो रहिवासी होता. चार पिढ्यांपासून त्याचे पूर्वज या किल्ल्यावर रखवालदाराचे काम करीत आल्यामुळे सदर गृहस्थही किल्ल्याचा रखवालदार होता. तो काळ जातीभेद, उच्च-नीचता, स्पृश्य-अस्पृश्य भेदभावांनी काळवंडलेला होता. अस्पृश्यता पराकोटीला पोहोचली होती. किल्ल्यावर पाण्याची कुंडे होती. या कुंडातील पाणी लोक पिण्यासाठी आणि इतर कामासाठी करीत असत. ही कुंडे देवटाकी नावाने ओळखली जायची. कुंडातील पाणी पिल्यास आजार बरा होतो अशी लोकांची श्रद्धा जडल्यामुळे या कुंडाना 'देवटाकी' नाव पडले होते. अस्पृश्यांकरिता या ठिकाणी वेगळे देवटाके होते. एकदा बाबासाहेबांच्या सेवेत असलेला चिंतू घाईरीकर देवटाक्याचे पाणी भरण्यास गेला असता गणू मोरे यांनी त्याला पाणी भरण्यास मनाई केली. तो म्हणाला, 'तुमच्याकरितां एक वेगळं म्हार टाकं दिलं असता तुम्हाला इथं कुणी यायला सांगितलं? तुम्हाला येथे यायचा अधिकार काय?' असे बोलून त्याला तेथून घालवून देण्यात आले.

घडलेला प्रसंग घाईरीकराने बाबासाहेबांना सांगितला. प्रसंग ऐकल्यावर बाबांनी ही गोष्ट पत्राद्वारे पुणे येथील कलेक्टर साहेबास कळविली आणि दुसऱ्या दिवशी स्वतः घाईरीकरसोबत देवटाक्यावर पाणी भरण्यास गेले. बाबांनी पाणी भरण्यास सुरुवात केली. देवटाक्याच्या वरच्या बाजूला अंबरीबुवाचे लहानसे देऊळ आहे. किल्ल्याचा राखणदार गणू लपून बसून टेहळणी करीत बसला होता. बाबांना पाणी भरताना पाहताच तो पुढे आला आणि तो म्हणाला, 'तुम्हाला या देवटाक्यावर पाणी भरण्याचा काय अधिकार आहे. तुमच्याकरिता वेगळे टाके आहे' असे बोलून तो लगेच कल्याण दरवाज्याने कल्याण गावात निघून गेला. गणूने येथील तीन वाड्या व गाव कल्याणमधील मराठी माळी जमा करून किल्ल्यावर घडलेला प्रकार त्यांना सांगितला. तत्पूर्वी बाबासाहेबांनी पाठविलेला अर्ज कलेक्टर साहेबास मिळाला म्हणून मागाहून गावकऱ्यांचा अर्ज घेऊन येणाऱ्या मोरेला बेड्या घालण्यात आल्या आणि त्याला फरासखान्यात ठेवण्यात आले. त्यामुळे गावकरी अधिकच भडकले आणि त्यांनी अस्पृश्य लोकांवर बहिष्कार पुकारला. त्यांनी अस्पृश्यांना दुकाने बंद केली. त्यांचे गावात येणेजाणेही बंद केले. त्यामुळे येथील गरीब अस्पृश्य मंडळीची फारच दयनीय अवस्था झाली होती. मुंबईला ही बातमी पोहोचल्यावर हिरजीभाई पटेल, डॉ. सोलंकी हे तातडीने कल्याणला आले. त्यांनी गावकऱ्यांची मते वळविण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

बाबांना ही हकीकत किल्ल्यावर कळविण्यात आली. त्यांनी लगेच कलेक्टर साहेबांना दुसरे पत्र लिहिले. त्याचवेळी गावातील चाळीस एक तरुण लाठ्या-काठ्या घेऊन बाबासाहेबांना मारण्यासाठी किल्ल्यावर आले. ते बाबांना म्हणाले, 'आमचे टाके का बाटविले?' त्यावर बाबा म्हणाले, 'तुमचे टाके मी काही बाटविले नाही. ते टाके तसेच स्वच्छ व निर्मळ आहे.' बाबा पुढे म्हणाले, 'तुमच्यातील एकाची काठी माझ्याजवळ देऊन तुम्ही सर्वच माझ्यावर हल्ला करा. जर तुमच्यापैकी एकाचीही काठी मला लागली आणि मी जखमी झालो तर माझा गुन्हा' असे म्हणून बाबांनी एका तरुणाकडून काठी घेतली आणि काठी घेऊन आपला बचाव कसा करावा याबद्दल एक प्रात्यक्षिक म्हणून त्यांनी त्या तरुण जमावास एक हात करून दाखविला. यामुळे ती तरुण मुले भीतीने गर्भगळीत होऊन गावात आली आणि किल्ल्यावरील घटना त्यांनी गावकऱ्यांना सांगितली. बाबांचे पत्र कलेक्टर साहेबांना मिळताच त्यांनी मामलेदाराला हुकूम केला आणि त्या गावाची काय तक्रार आहे ते



पाहण्यास सांगितले. मामलेदार लगेच एक फौजदार व दोन शिपाई यांच्यासमवेत कल्याण गावी आला. मामलेदार फौजदार येताच गावात थोडीशी शांतता निर्माण झाली. गावात आल्याबरोबर मामलेदारांनी पोलिस पाटलास सांगून एकनाथ मिनीनाथ लांडगे, नारायण दत्तू फिरंगुटे व भिकू बापू साबणे या तीन दुकानदारांना बोलावणे पाठविले. ते आल्यानंतर त्यांना मामलेदार म्हणाले. तुम्ही महारापोरांचे देणं-घेणं कां बंद केलं? तुम्हाला दुकानाचे लायसन्स दिले त्यात बाटणे बाटविण्याचा काय प्रश्न आहे? गिऱ्हाईकांच्या सुखसोयींच्या दृष्टीने तुम्हाला दुकानाचे लायसन्स दिले आहे. त्यावर दुकानदार म्हणाले, बाबासाहेबांनी आमचे देवटाके बाटविले म्हणून आम्ही त्यांचे देणे-घेणे बंद केले. अशा प्रकारचे उद्घट उत्तर मिळताच मामलेदारांनी त्यांना अनुक्रमे ३००रु.१५० रु. व १०० रु. दंड केला. दंड न भरल्यास सहा महिने, तीन महिने व एक महिना अशी शिक्षा ठोठावली. त्यानंतर गावकऱ्यांनी एक विचार करून महादेव सेकूजी साळवे व विष्णु सोपान साळवे यांना बोलाविणे पाठविले. ते गावात आल्यावर त्यांना सांगण्यात आले. आम्ही सात-आठ लोक व तुम्ही असे मिळून बाबांची भेट घेण्यास उद्या सकाळी जाऊ. आमची त्यांना भेटण्याची फार इच्छा आहे. बाबासाहेब लवकरच सिंहगडावरून पुण्याला येणार होते. दुसऱ्याच दिवशी सर्व गावकऱ्यांनी बाबांची सहृदय भेट घेतली. त्यावेळी बाबांनी त्यांना पुष्कळ गोष्टी सांगितल्या.

शेतकरी मजूर वर्गाच्या खऱ्या स्थितीची कल्पना करून देताच गावकऱ्यांना बाबांविषयी जिव्हाळा उत्पन्न झाला. पाच दिवसावर थोरली दिवाळी होती. मोठ्या दिवाळीचा सण आमच्या गावात चांगला होतो. गावकऱ्यांनी बाबास विनंती केली, बाबा आतां आपण आला. आम्हास जाण्याची काही घाई करू नका. तुम्ही आमचे पाहुणे म्हणून राहा. दिवाळी आमच्या आडाण्या - कबाड्या समवेत आनंदाने घालवून मगच जा. गावकऱ्यांनी विचारले, 'बाबा आपल्याला कोणकोणते पदार्थ आवडतात' त्यावर बाबा म्हणाले, 'मला काळ्या चिंभुस्या, ओढ्यातील खेकडी तसेच नदीतील मासे फार आवडतात. मग काय विचारता?

दुसऱ्याच दिवशी गावकऱ्यांनी एक थैली भरून सामान पाठविले. तेथून तीन-चार मैल अंतरावरील निगडेवशाडे गावातील नारायण बापू भालेराव यांनी अकरा किलोचा भला मोठा मासा आणून दिला. मराठी माळ्यांनी तर दुधा - तुपाची रेलचेलच उडवून दिली. दिवाळीच्या दिवशी बाबासाहेबांनी नारळी शेंगा आणण्यास सांगितले. नारळी शेंगा, करंज्या, कापण्या, पूरणपोळ्या अशी अनेक तऱ्हेची पक्वान्ने ताटात भरून मराठी महार स्त्रियांनी बाबांची ओवाळणी केली. त्यावेळी बाबासाहेबांनी प्रत्येक बाईच्या ताटात एक चोळीचा खण आणि चार आणे टाकले. अशा प्रकारे गाव कल्याण व त्याच्या तीन वाड्यातील लोकांनी बाबांचा आदर-सत्कार करून थोरली दिवाळी मोठ्या उत्साहाने साजरी केली. बाबा सिंहगडावर असेपर्यंत 84 गुंडावण मावळ, 84 कानन खोरे आणि 40 खेडेगावातील सर्व लहान-मोठे, तरुण-तरुणी, भगिनी, आबालवृद्ध लांबून लांबून बाबांच्या दर्शनाला येत होते. जणू काय देवाची जत्रा ! सिंहगडावर असे विहंगम दृश्य भासत होते...

मिलिंद मानकर,
8080335096

# द्वंद्वाचे झुलते झुंबर ..हे रामा

आधुनिक केसरी

**जीवन कसं जगावं याबददल बरीच पुस्तके प्रसिध्द आहेत.पुस्तके हाती घेऊन ती वाचावित तर जीवनात असलेल्या प्रश्नांवर मात करणे शक्य होईल असे वाटत जाते..पण अनेकदा पुस्तकातील विचार माणसांचा गोंधळ निर्माण करतात. कोणत्या दिशेचा प्रवास केला म्हणजे जीवनाला सुखाचे दिवस दिसू शकतील याचा शोध घेत माणूस निघतो..आणि उत्तराच्या शोधासाठी पाठपुरावा करत जातो.पण अनेकदा काय करावे तेच कळत नाही..प्रत्येक जन वेगळे काही सांगत असतो.जगी सर्व सुखी असा कोन आहे विचारी मना तोची शोधुनी पाहे असे समर्थ म्हणाले.मग जगात खरचं सुखी असे कोणी नाही का ? मग आपल्याला दुरवर उभे राहून जे लोक सुखी दिसतात ते कोण आहेत ? जे सुखी भासतात ते मुळात सुखी नाही का ? या प्रश्नांचा शोध घेतला तर बरेच प्रश्न निकाली निघतील पण त्या प्रश्नांच्या उत्तराच्या शोधात उत्तरे मिळत नाही हेही वास्तव आहे.**

जीवनातील सुख,समाधानाच्या कल्पना प्रत्येकाच्याच भिन्न आहेत. जीवनाचा नेमका अर्थ कशात सामावलेला आहे ? या प्रश्नांचा शोध घेतला तर प्रश्न एक असूनही उत्तरे मात्र भिन्न आहेत असे सतत जाणवत राहाते.कोणाला तरी त्यागात जीवनाचा अर्थ सापडलेला असतो..कोणाला तरी भोगात अर्थ सापडलेला असतो..कोणाला तर प्रचंड संपत्तीचा सोस ,धन,दौलत मिळवणे म्हणजे जीवन वाटते.केवळ आनंदात जीवन जगणे म्हणजे खरे जीवन असे काहींना वाटत असते. जीवनाचा शोध घेण्याच्या प्रयत्नात अनेकदा अर्थ सापडत नाही.प्रत्येकाच्या जीवनाला वेगळा अर्थ आहे. आपापल्या परीने जीवनाचा अर्थ शोधण्यात माणसं गुंतलेली आहे.त्यासाठी माणसं विचार करण महत्वाचे असं मानतात.पुन्हा विचार करणे महत्वाचे असेल तर मग कृती कोणी करायची हा प्रश्न पडतोच..? विचाराने पाऊलवाट चालली तर जीवनाला अर्थ प्राप्त होतो.विचाराची वाट म्हणजे ज्ञानाच्या शोधाचा प्रवास आहे असं म्हटले जाते. ज्ञान म्हणजे प्रकाशाची वाट आहे.त्यामुळे विचाराने चालत राहावे असे वाटणारा एक समूह आहे. अज्ञानातच खरे सुख सामावले आहे असे सांगणारा देखील एक समूह आहे..आपल्या जीवन व्यवहारात प्रत्येकाची अशीच व्दिधा अवस्था आहे.नेमक्या कोणत्या वाटेचा प्रवास करावा म्हणजे जीवनाची वाट अधिक समृध्दतेने जगता येईल या प्रश्नांचा शोध घेत अनेकाना चालणे पसंत केले..पण कोणती एक वाट सापडली आहे असे मात्र झाले नाही.

एका देशात युध्द सुरू होते.बरेच दिवस युध्द सुरू राहिल्यानंतर सैनिक मारले गेले होते.सैनिकांची गरज निर्माण झाली होती.अखेर नागरिकांमधून सैनिक भरतीचा निर्णय घेण्यात आला.मग त्या देशातील नामाजलेल्या एका तत्ववेत्याला अत्यंत निकडीची गरज म्हणून युध्दावर पाठवावे लागले. युध्द तर सुरू झाले होते..सैनिक कमी पडत होते..म्हणून सैन्यात माणसं भरली जात होती.अधिकाधिक मनुष्यबळ हवे आहे म्हणून तत्ववेत्त्याला युध्दासाठी सैनिकात भरती केल्याशिवाय कोणताच पर्याय नव्हता. अखेर त्याला भरती केले गेले. आता या भरती केलेल्या नवोदितांना प्रशिक्षण देण्यासाठी सुरूवात करण्यात आली. त्यांच्यासारखे अनेक लोक सैन्यात भरती झाले होते.त्यामुळे सर्वांनाच सैन्याची शिस्त आणि नियम समजावून देण्यासाठीचे प्रयत्न सुरू करण्यात आले होते.सकाळी सकाळी सैन्याच्या कवायतीसाठी अनेक नवसैनिक उपस्थित होते.प्रशिक्षकही उभे होते.वरीष्ठ अधिकारी देखील तेथे आलेले होते.अखेर कवायत सुरू करण्यात आली.वरीष्ठांनी या तत्ववेत्त्याला पाहिले आणि त्यांना धक्का बसला .कारण त्या तत्त्ववेत्त्याची अनेक पुस्तके त्यांनी वाचली होती.त्यांच्या विचाराची प्रक्रिया त्यांना ज्ञात होती.प्रत्येक गोष्ट करताना किती सुक्ष्मतेने त्याकडे पाहायला हवे हे जाणून होते.आता तो तत्ववेत्ताच सैन्यात आल्याने काय होणार ? असा प्रश्न त्यांना पडला होता.त्यामुळे त्यांनी उत्सुकत्तेने त्याच्यावर लक्ष ठेवले.अखेर सर्वांना रांगेत उभे राहाण्यास सांगण्यात आले.तोही उभा राहीला खरा.. मग सूचना देण्यास सुरूवात झाली.रांगेत उभ्या असणा-या सूचना दिल्या जात होत्या...उजव्या बाजूने वळा , मग डाव्या बाजून वळा..कधी समोर चला ..कधी मागे चला..त्या सूचने प्रमाणे सर्वच घडत होते..मात्र हा तत्ववेत्ता अत्यंत शांतपणे उभा होता..तो स्थिरतेने पाहत असताना लोक असे का करता आहेत..? असा प्रश्न त्याला पडत होता. लोक सूचने प्रमाणे कृती करत होते आणि तत्ववेत्ता अखेरपर्यंत शांतच होता..अखेर वरीष्ठ अधिका-यांच्या लक्षात आले की नेमकी अडचण काय आहे. त्यामुळे त्यांनी त्याच्याजवळ जात त्याला विचारले तुम्ही का सूचनेप्रमाणे कृती करत नाही आहात..? तो म्हणाला मला मान्य आहे की,मी सूचने प्रमाणे नाही वागत आहे...पण माझा प्रश्न आहे की... कशासाठी डाव्या बाजूला वळाचये आणि कशासाठी उजव्या बाजूला वळायचे..? माझ्या प्रश्नाचे जोवर उत्तर मिळत नाही तोवर मी ते करणार नाही. आता मेख कुठे आहे हे अधिका-यांचे लक्षात आले होते..आणि त्याची तेथून बदली करण्याचा निर्णय घेण्यात आला होता..आता काय करायचे असा प्रश्न होता...? मग त्याला सांगण्यात आले आजपासून तुम्ही स्वयंपाक गृहात काम करायचे. मुख्य स्वयंपाकी जे सांगेल तेच करायचे.त्याप्रमाणे त्याला स्वयंपाक गृहात नियुक्ती देण्यात आली. मुख्य स्वयंपाक्याने त्याला भूईमुगाच्या शेंगा निवडण्यास दिल्या.त्याला सांगण्यात आले की याप्रमाणे लहान दाणे,मोठे दाने वेगवेगळे करायचे.आता हा तर तत्ववेत्ता होता..मग सांगितल्याप्रमाणे काम होईल अशी अपेक्षा होती..पण बराच वेळानंतर स्वयंपाकी पुन्हा आला तर शेंगा जिथे होत्या तिथेच होत्या.आता प्रश्न पडला होता..का बरं शेंगा निवडल्या गेल्या नसतील..? स्वयंपाकी आला आणि त्याने त्याला विचारले का शेंगा निवडल्या नाही..? तर त्यांने उत्तर दिले...की शेंगा निवडल्या तर त्यातील जे दाणे निघणार आहेत.त्यातील मोठे आणि लहान वेगळे करता येतील पण मध्यम आकाराच्या दाण्याचे काय करायचे असा प्रश्न पडला आहे. त्यासंदर्भात तुम्ही कोणताच विचार दिला नाही.. म्हणून थांबलो आहे..खरेतर माणसं विचार करतात पण कृती करायचे राहून जाते.केवळ विचार करून जीवनाचे प्रश्न सुटत नाही तर त्या प्रश्नांच्या अनुषंगाने मात करण्यासाठी विचारांबरोबर कृती केली तर बरेच प्रश्न सुटू शकतील.मात्र माणसं विचार फार करतात आणि कृती शुन्य करतात म्हणून प्रश्न सुटत नाही.




आपल्याही जीवनात असे कितीतरी व्दंद उभे असते..अनेक प्रश्न मनात घर करत असतात.. कोणत्या दिशेचा प्रवास आपल्याल आनंद देईल.. पण माणसं आनंदाच्या वाटेने जाण्याऐवजी केवळ विचार करत बसतात आणि जीवनाचा आनंद गमावून बसतात..आपल्या आनंद मिळवायचा आहे ना ..मग विचार तर करायला हवाच पण त्याचवेळी कृतीची देखील गरज आहे.आपण अनेकदा केवळ विचार करतो आणि त्याच पातळीवर राहतो.त्यामुळे जीवनातील आनंदाच्या क्षणाला मुकत असतो.. या आनंदाच्या वाटा मनात व्दंद आले की त्या दूर जातात.त्यामुळे त्या वाटांचा प्रवास ही अधिक आनंददायी करायचा असेल तर मनातील व्दंद नष्ट करण्यासाठी विचार आणि कृतीची गरज आहे. सॉक्रेटीस तेच म्हणाले होते की,प्रत्येक गोष्टीचा अनुभव घ्या..पण केवळ अनुभवावरती थांबू नका.. तर प्रत्येक अनुभवाच्या अनुषंगाने चिंतन आणि मननाची गरज आहे.आपल्या वाटा चितंन आणि मननानेच पुढे जाण्याची गरज आहे..आज आपले शहाणपण गमावणे घडत आहे.त्याचे कारण त्यामागे आपला विचार नाही...असे नाही..विचार असले तरी चिंतनाच्या वाटा मात्र अडखळता आहे इतकेच..

संदीप वाकचौरे

# काँग्रेसला मानणारा मोठा जनसमूह आजही!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या घटनेनुसार एक संसदीय लोकशाही असलेले समाजवादी राष्ट्र जिथे संधी तसेच राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्कांत समानता व जागतिक शांततेचे उद्दीष्ट आहे, अशा भारतीय नागरिकांचे आणि भारतीय प्रशासनाची शांततापूर्वक आणि घटनात्मक मार्गाने प्रगती व कल्याण करणे हा सदर पक्षाचा उद्देश आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस- इंडियन नॅशनल काँग्रेस- आईएनसी किंवा निव्वळ काँग्रेस हा भारतातील एक राष्ट्रीय राजकीय पक्ष आहे. काँग्रेसची स्थापना २८ डिसेंबर १८८५ रोजी एलेन ओक्टेवियन ह्यूम, दादाभाई नौरोजी आणि दिनशा वाचा यांनी केली.**

मुंबईच्या तेजपाल संस्कृत पाठशाळेत संपूर्ण देशभरातील ७२ प्रतिनिधी एकत्र येऊन २८ डिसेंबर १८८५ रोजी इंडियन नॅशनल काँग्रेस म्हणजेच राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. पूर्वनियोजित राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन दि.२२ डिसेंबर १८८५ रोजी पुणे या ठिकाणी घेतले जाणार होते. मात्र पुण्यात कॉलराची साथ सुरू असल्यामुळे हे अधिवेशन मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेत घेतले गेले. राष्ट्रीय काँग्रेसच्या या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष कलकत्त्याचे ख्यातनाम वकील उमेश्चन्द्र बॅनर्जी हे होते. राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून सरकार व जनता यांच्यामध्ये एक संवादात्मक स्वरूपाची वाटचाल सुरू झाली. काँग्रेस याचा अर्थ संघटना असा होतो. सुरुवातीच्या काळामध्ये काँग्रेसचे नेतृत्व हे मवाळ गटाकडे होतं. पुढे १९०६ ते १९१९ पर्यंत काँग्रेसचे नेतृत्व जहाल गटाकडे होते, ज्यात लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, गोपाळ गणेश आगरकर हे होते. त्यानंतर मात्र १९२० ते १९४७ या काळामध्ये संपूर्ण काँग्रेसचे नेतृत्व हे महात्मा गांधींनी केले. महात्मा गांधी म्हणजे एका माणसाचे सैन्य असे गौरवोद्गार त्यांच्यासंदर्भात माऊटबॅटन यांनी काढले होते. १९व्या शतकाच्याच्या शेवटी आणि २०व्या शतकाच्या मध्यपर्यंत, काँग्रेस भारताचा स्वातंत्र्यलढ्यात आपल्या १.५ कोटी पासून जास्त सदस्य आणि ७ कोटी पासून जास्त सहभागींसोबत ब्रिटिश वसाहती शासनाच्या विरोधात एक केंद्रीय भागीदार बनली. आजही काँग्रेसला मानणारा मोठा जनसमूह भारतामध्ये आहे. गांधी आणि नेहरू घराण्याची परंपरा लाभलेल्या काँग्रेस पक्षाने भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये आणि स्वातंत्र्यानंतर देखील देशाच्या राजकारणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. महत्त्वाच्या राष्ट्रीय पक्षांमध्ये काँग्रेस पक्षाचे स्थान कायम आहे. मधल्या काळामध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला अनेक स्थित्यंतरातून जावे लागले. देशातील अंतर्गत घडामोडी, स्थित्यंतरे, पक्ष राजकारण या समस्यांना तोंड देत भ्रष्टाचार बेरोजगारी अशा अनेक समस्या सरकार समोर होत्या. आर्थिक मंदी यासारख्या समस्यांना तोंड देत सत्तेवर असताना काँग्रेस पक्षाने देशाच्या हिताच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावान अनुयायी होते. महात्मा गांधींच्या समवेत त्यांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून देखील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. पंचशील करार, अलिप्ततावाद यासारख्या महत्त्वपूर्ण धोरणाचे ते समर्थक होते. अवजड उद्योग उभारणाऱ्या यंत्रणा देशामध्ये उभ्या राहिल्या पाहिजेत असं त्यांचं स्पष्ट मत होतं. त्या काळामध्ये रशियन राज्यक्रांतीने जी प्रगती घडून आली, आपल्याही देशांमध्ये अशाच प्रकारे प्रगती झाली पाहिजे यासाठी त्यांनी पंचवार्षिक योजनाचा स्वीकार केला. याचबरोबर कृषीक्षेत्र औद्योगिकक्षेत्र, संशोधन यासारख्या घटकांना त्यांनी प्राधान्यक्रम दिला. काँग्रेस संघटनाच्या माध्यमातून पक्षाचे सर्व ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोचविण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले. धर्मनिरपेक्ष विचारसरणीच्या आधारे संपूर्ण देशाच्या विकासाचा आराखडा काँग्रेस सरकारने तयार केला. काँग्रेसच्या पक्षीय राजकारणामध्ये नेहरू आणि गांधी घराण्याचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेला आहे.

उद्देश- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या घटनेनुसार एक संसदीय लोकशाही असलेले समाजवादी राष्ट्र जिथे संधी तसेच राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्कांत समानता व जागतिक शांततेचे उद्दीष्ट आहे, अशा भारतीय नागरिकांचे आणि भारतीय प्रशासनाची शांततापूर्वक आणि घटनात्मक मार्गाने प्रगती व कल्याण करणे हा सदर पक्षाचा उद्देश आहे. पक्ष स्थापना आणि पहिले अधिवेशन- श्री सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी अखिल भारतीय पातळीवर एका संघटनेची स्थापना करता यावी म्हणून अत्यंत जोमाने तयारी चालविली होती. त्या उद्देशानेच १८८३ च्या डिसेंबर महिन्यात त्यांनी इंडियन नॅशनल कॉन्फरन्सचे पहिले अधिवेशन बोलाविले होते. राष्ट्रभर दौरे करून सरकारच्या धोरणावर प्रखर टीका केली. सर्वत्र त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मात्र त्यांचा कसून विरोध केला व ती प्रतिगामी चळवळ असल्याची घोषणा केली. एओ.ह्यूम व लॉर्ड डफरिनने मिळून बॅनर्जीची चळवळ हाणून पाडण्यासाठी योजनाबद्ध कार्यवाहिला सुरुवात केली. भारतातील सौम्य विचारांच्या सर्व




राजकीय नेत्यांना आवाहन करून त्या सर्वांना एकत्रित आणून ब्रिटिश सत्तेला अनुकूल अशा राष्ट्रीय पातळीवरील एका संघटनेची स्थापना करण्यासाठी अतोनात धडपड केली. इ.स.१८८४मध्ये इंडियन नॅशनल युनियनची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे एक अखिल भारतीय संमेलन मार्च १८८५मध्ये पुणे येथे भरवण्याचे ठरले परंतु पुण्यात यावेळी कॉलरा प्रादुर्भाव झाल्याने, दि.२७ डिसेंबर १८८५ रोजी ते मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजच्या प्रशस्त सभाग्रहात भरविण्यात आले. या संमेलनाला भारताच्या निरनिराळ्या भागातून ७२ प्रतिनिधी आले होते. अशा प्रकारे प्रथमच देशाच्या निरनिराळ्या भागातून प्रतिनिधींनी एकत्रित येण्याची ही घटना अपूर्व मानली जाते. या संमेलनाचे अध्यक्षपद बंगालचे श्री उमेश्चंद्र बॅनर्जी यांनी भूषविले. फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, के.टी.तेलंग, दिनशॉ वाचा इत्यादी सुप्रसिद्ध व्यक्तीही उपस्थित होत्या. काँग्रेसचा जनक समजला जाणारा ह्यूम पण या अधिवेशनाला खास उपस्थित राहण्यासाठी इंग्लंडहून परत आला होता. याशिवाय स्थानिक पत्रकार व नेतेही उपस्थित होते.

पक्ष संरचणा- या पक्षात अध्यक्ष हा पक्षाचा प्रमुख असतो. आवश्यकता वाटल्यास उपाध्यक्ष पदाची नेमणूक अध्यक्ष करू शकतो. अध्यक्षपदाची निवडणूक दरवर्षी होणे गरजेचे आहे. मात्र एकाच व्यक्तीने सलग किती वेळा अध्यक्ष व्हावे यावर बंधन नाही. पंडित नेहरू असेपर्यंतच्या काळात ते फार क्वचित अध्यक्ष होते मात्र श्रीमती इंदिरा गांधींनी ही दोन्ही पदे एकाच व्यक्तीने भूषावयाची प्रथा सुरू केली जी पी.व्ही.नरसिंह राव यांच्यापर्यंत चालत आली. त्यानंतर श्रीमती सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपद दुसऱ्या व्यक्तीकडे सोपवून पुन्हा सत्ताकेंद्रांची विभागणी केली. अध्यक्षाची निवडणूक झाल्यावर तो उपाध्यक्ष, जनरल-सेक्रेटरीज्, कोशाध्यक्ष, प्रभारी आणि सेक्रेटरीजची निवड करतो. या पदांवर किती व्यक्तींची निवड करावी यावर कोणतेही बंधन नाही. सध्या १ उपाध्यक्ष, १ कोशाध्यक्ष, १ पॉलिटिकल सेक्रेटरी, ९ जनरल सेक्रेटरी, ८ स्वतंत्र प्रभारी आणि ३५ सेक्रेटरीज् आहेत. काँग्रेस वर्किंग कमिटी- काँग्रेस पक्षामध्ये काँग्रेस वर्किंग कमिटी- हाय कमांड अश्या नावाचा एक अधिकारी गट आहे. या एका गटाला कोणत्याही प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या गटाने घेतलेला निर्णय हा अंतिम आणि सर्वोच्च मानला जातो. पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष व उपाध्यक्ष या गटाचे पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष असतात. या गटातही किती व्यक्ती असाव्यात यावर संख्येचे बंधन नसले तरी अध्यक्ष व उपाध्यक्ष सोडून साधारणतः १५ ते २० व्यक्ती या गटात असतात. सध्या या गटाचे १९ सदस्य आहेत. या व्यतिरिक्त १८ व्यक्ती पर्मनंट इन्व्हायटीज आणि ६ स्पेशल इन्व्हायटीज आहेत. याचबरोबर ६ अधिकृत पक्षप्रवक्ते आहेत. शिवाय विविध विषयांवरच्या अनेक समित्या आहेत, ज्यात चार सदस्यांची डिसिप्लनरी समितीही आहे. राज्यस्तरावर प्रदेश काँग्रेस कमिटी- पीसीसी नावाची स्थानिक समिती असते जिचे स्वरूप केंद्रीय समितीप्रमाणेच फक्त राज्यस्तरावर असते. अध्यक्षपदाच्या निवडणूकीत राष्ट्रीय ऑफिस बेअरर्स तसेच प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सदस्यांना मताधिकार असतो. केंद्रीय निवडणूक विभाग- केवळ काँग्रेस असा एकच पक्ष आहे ज्यात केंद्रीय निवडणूक विभाग नावाचा स्वायत्त विभाग आहे. सदर विभाग पक्षांतर्गत निवडणुका झाल्यास त्या निष्पक्ष होतील याची खबरदारी घेतो. हल्लीच्या भारतामध्ये काँग्रेस हा शब्द नावात असलेले अनेक राजकीय पक्ष किंवा गोष्टी आहेत किंवा होते. त्यांची नावे अशी- इंदिरा काँग्रेस, केरळ काँग्रेस, चव्हाण रेड्डी काँग्रेस, तमिळ मनिला काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, नेपाळ काँग्रेस, बीएस्आर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, वायएस्आर काँग्रेस, हरियाणा जनहित काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आदी आहेत. पूर्वी सुरुवातीला या पक्षाचे अधिकृत निवडणूक चिन्ह गाय आणि वासरू होते. नंतर ते हाताचा पंजा असे झाले आहे, हे वेगळे सांगण्याची गरज भासू नयेच!

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



हनिमून भाग - 4 : हनिमूनला जाण्याआधी अनेकांना विविध लैंगिक समस्या असतात. त्यासाठी त्यांनी कशी आणि काय काळजी घ्यावी ?

फायमोसिस - यामध्ये पुरुषांची समोरची त्वचा ताठ स्वरूपाची असते. ती मागे जात नसल्यामुळे वेदना होतात व ते आनंद घेऊ शकत नाहीत. अशांनी हनिमूनला जाण्यापूर्वीच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार करून घ्यावेत. अनेकांना कमजोरी, शीघ्रपतनसारख्या समस्या असतात. यावरही चांगले उपाय असून योग्य औषधे गोळ्यांनी ही समस्या दूर करता येते. पहिली रात्र - समज - गैरसमज पहिल्या रात्रीबद्दल भारतीय समाजामध्ये अनेक भ्रामक समजुती आजही आहेत. पहिल्या रात्री स्त्रीला ब्लीडिंग झाले तरच ती व्हर्जिन आहे असा एक मोठा गैरसमज आहे. आपण त्याबद्दल विस्तृत माहिती घेऊ. › हायमेन म्हणजे काय ? स्त्रीचे बाह्यअंग जिथे बाहेर उघडते तिथे एक मांसल पडदा असतो. याला मध्यभागी एक गोल किंवा अंडाकृती आकाराचे छिद्र असते ज्यामधून मासिक पाळीचा रक्तस्राव होतो. › इन्टॅक्ट हायमेन हे व्हर्जिनिटी सांगते असा गैरसमज समाजामध्ये आहे मात्र सध्याच्या काळात तो पूर्णपणे चुकीचा आहे. संबंध करताना लिंगाच्या कठोरतेमुळे हा पडदा ब्रेक होतो. यामुळे मुलीला तात्पुरता त्रास किंवा रक्तस्राव होतो. › जर हा स्राव थांबला नाही तर तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. › काही मुलींमध्ये हा त्रास किंवा रक्तस्राव दिसत नाही जे की पूर्णपणे नैसर्गिक आहे. › इतर गोष्टींमुळेदेखील हे हायमेन ब्रेक होऊ शकते. ज्याला डिफ्लोरिंग ऑफ व्हॅजिना असे म्हणतात. BY INSERTING FINGER DEEPLY INTO VAGINA (बोटाने) MASTURBATE WITH PHALLIC VIBRATOR OR TOOLS (व्हायब्रेटरच्या सहाय्याने) हायमेनचे महत्त्व काय ? विविध देशांत किंवा भारतातदेखील आजही हायमेन शाबूत असणे हे पवित्रतेचं लक्षण आणि पुरावा मानला जातो. हनिमूनच्या पहिल्या रात्री रक्ताने माखलेले बेडशीट किंवा रुमाल अभिमानाने दाखवण्याची प्रथादेखील आपल्याकडे आहे. युरोपियन देशांत किंवा अमेरिकन भागांमध्ये अशा गोष्टींना महत्त्व नाही. कारण तिथे लग्नाअगोदरच सेक्स केला जातो. आपल्याकडील या प्रवृत्तीमुळे मात्र अनेक मुलींसाठी हा एक तापदायक आणि चिंतेचा विषय बनला आहे. वस्तुस्थिती अनेक व्हर्जिन मुलींना हायमेन नसतेच आणि ही वस्तुस्थिती देखील आहे. त्यामुळे हायमेन नसणे किंवा असणे ही चाचणी होऊ शकत नाही. बऱ्याच वेळा अन्य कारणांमुळेही हे हायमेन ब्रेक होते. › अपघात होणे, इजा होणे. घोड्यावर बसणे, सायकल चालवणे, उंच उडी मारणे, जिम करणे इ. डॉक्टर जेव्हा पेल्व्हिक एक्झामिनेशन करतात तेव्हा हे हायमेन ब्रेक होते. रफ वॉशिंग ज्या स्त्रियांना पहिल्या रात्री हायमेन ब्रेक होऊन वेदना किंवा स्राव होईल अशी भीती असते. त्यांनी ते तज्ज्ञ डॉक्टरकडून ब्रेक करून घ्यावे.

हायमिनोप्लास्टी काही गैरसमजुती व अंधश्रद्धा यामुळे अनेक जातींमध्ये रक्तस्राव झाला नाही तर अडचणी निर्माण होतात. अशा स्त्रियांना कठोर शिक्षा किंवा अगदी मृत्यूची शिक्षाही दिली जात असे. हे टाळण्यासाठी हायमेनोरोफी किंवा प्लास्टी केली जाते. यामध्ये फाटलेले हायमेन टाके देऊन बरे केले जाते.






डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# मुलाखतीचे सोपे तंत्र सांगणारे मार्गदर्शक


आधुनिक केसरी

मुलाखत म्हणजे दोन किंवा अधिक लोकांमधील संरचित संभाषण, सामान्यतः माहिती गोळा करण्यासाठी, पात्रतेचे मूल्यांकन करण्यासाठी किंवा एखाद्या विशिष्ट विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित केली जाते. मुलाखती सामान्यतः विविध संदर्भांमध्ये वापरल्या जातात. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक जण चांगल्या नोकरीच्या शोधात असतो. चांगली नोकरी मिळाल्यावर आर्थिक स्थिरता प्राप्त होईल , स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, स्वावलंबी होता येईल. या हेतुने आपण नोकरीच्या शोधात असतो. हल्ली महागाई इतकी वाढली आहे, की घरातील प्रत्येक व्यक्तीला नोकरी करणं क्रमप्राप्त झाले आहे. कोणत्याही प्रकारच्या नोकरीसाठी आधी सामोरे जावे लागते ते मुलाखतीला. नोकरीची मुलाखत ही नोकरी अर्जदार आणि नियोक्त्याचा प्रतिनिधी यांच्यातील संभाषण असलेली मुलाखत असते जी अर्जदाराला कामावर घ्यावे की नाही याचे मूल्यांकन करण्यासाठी आयोजित केले जाते. मुलाखती ही कर्मचारी निवडीच्या सर्वात सामान्य पद्धतींपैकी एक आहे. मुलाखत म्हंटले की दड़पण येतेच , बहुधा मुलाखतीला आपण खूप सहजपणे घेतो. पण मुलाखतीच्या वेळेला नेमकी फजिती होऊ शकते. मुलाखतीची नेमकी तयारी करण्याबाबत आपण गोंधळलेले असाल, आपल्याला पूर्ण आत्मविश्वासाने चांगली मुलाखत दयायची असेल तर 'HOW TO WIN INTERVIEWS' (हाऊ टू विन इंटरव्ह्यूज ?') हे पुस्तक तुमच्यासाठी उपयुक्त आहे. लेखिका, कवयित्री प्रा. प्रज्ञा पंडित यांनी बदलत्या काळानुसार आणि वेळेच्या मागणीनुसार खूप महत्त्वाचा विषय या पुस्तकाच्या माध्यमातून हाताळला आहे. महाविद्यालयीन तरुण - तरुणी, गृहिणी, नोकरी करू इच्छिणाऱ्या व्यक्तिंसाठी मुलाखतीची पूर्वतयारी कशी करावी, यासंबंधी अगदी नेमकेपणाने आणि सोप्या भाषाशैलीत विवेचन केले आहे. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेले हे पुस्तक इंग्रजी भाषेत आहे याचे कारण, मोठमोठ्या कंपनीमध्ये मुलाखती या इंग्रजी भाषेतून घेतल्या जातात. आपलं प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले असले तरी पुढे या जगात वावरताना , विविध कार्यक्षेत्रात इंग्रजी भाषेत संभाषण केले जाते. त्यामुळे इंग्रजी भाषेचे दड़पण न घेता अगदी सहजपणे उमेदवाराला इंग्रजी भाषेतून मुलाखतीचा सराव व्हावा, या उद्देशाने लेखिकेने संपूर्ण पुस्तक इंग्रजी भाषेच्या माध्यमातून लिहिले आहे. बहुतेक वेळा असे होते की, मुलाखतकर्त्याने इंग्रजीतून विचारलेल्या प्रश्नांचे अर्थ कळतात पण उत्तराची जुळवाजुळव करणं कठीण जाते. भाषेविषयीचा न्यूनगंड घालवण्यासाठी हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक आहे. मुलाखतीचा इतिहास, त्याचे महत्त्व, त्याची प्रक्रिया सोबतच मुलाखती देण्याआधी कोणत्या प्राथमिक गोष्टीची तयारी करणं आवश्यक आहे, कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत, अशा प्रत्येक लहान - लहान आणि तितक्याच महत्त्वाच्या घटकांविषयी माहिती या पुस्तकात दिली आहे.जे पहिल्यांदा मुलाखतीला सामोरे जाणार असतील, त्यांच्यासाठी अगदी प्राथमिक (बेसिक) तयारी करण्यासाठी मदत करणारे हे पुस्तक आहे. आपली शैक्षणिक पात्रतेच्या आधारावर त्या नोकरीसाठी निवेदन देणं, ज्या कंपनीत आपण मुलाखतीसाठी जाणार आहोत, त्या कंपनीविषयी अगदी बेसिक माहिती जाणून घेणं, तसेच आपली पदवी प्रमाणपत्र, बायोडाटा ही सगळी कागदपत्रे एकत्रित जोड़णं, त्या वातावरणाशी निगड़ित आपला पेहराव, वागण्या- बोलण्यातील विन्रमता, शिष्टाचार, समोरच्याचे बोलणं मध्येच न तोडता पूर्ण ऐकून घेणं मग उत्तर देणं, बोलण्याची ढब, वेळेची शिस्त, आत्मविश्वासाने वावरणं आणि सकारात्मक दृष्टिकोन बाळगणं , अशा अनेक मुद्द्यांचा समावेश या पुस्तकात केला आहे. बऱ्याचदा कपडे आणि एकूण मेकअप या बाह्य बाबीवर जास्त भर दिला जातो पण यासोबतच कोणत्या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत, ते लेखिकेने सोप्या शब्दात सांगितले आहे. हे पुस्तक वाचताना तुमचा आत्मविश्वास दृढ होणार आहे, मनातील ताण दूर होऊन तुम्ही तुमच्या व्यक्तिमत्त्वावर अधिक काम करण्यास सुरुवात कराल, हे निश्चित. या पुस्तकात मुलाखतीत विचारल्या जाणाऱ्या अगदी बेसिक ५० प्रश्नोत्तरेसुद्धा दिलेली आहेत. जेणेकरून मुलाखतीत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची कल्पना उमेदवाराला येईल आणि त्यानुसार तो तयारी करू शकेल आणि ऐन मुलाखतीवेळी तो भांबावून जाणार नाही. या पुस्तकाचे वैशिष्टय म्हणजे मुलाखतीच्या वेळी कोणत्या गोष्टी आपण टाळणं आवश्यक आहे, यांवर घटकानुरूप चर्चा केली आहे. या किरकोळ चुका जर टाळल्या तर मुलाखतीचा टप्पा सहज पार करता येईल. वेतनाविषयीचे मत मांडताना कोणत्या बाबीचा विचार करायला हवा, यावर स्वतंत्र प्रकरण दिले आहे. मुलाखतीला गेल्यानंतर अतिउत्साही, अस्वस्थपणा कमी करायला हवा. तेव्हा मानसिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी काय करायला हवे,हा मुद्दाही अधोरेखित केला आहे. बरे , या पुस्तकाचे एक विशेष म्हणजे , जर मुलाखती यशस्वी झाली नाही, नकार मिळाला, निवड झाली नाही तर उदास न होता नव्या जोमाने कसे उभे राहायचे , हेसुद्धा सकारात्मकतेने लेखिकेने विशद केले आहे.

कामाचे क्षेत्र कोणतेही असू दे, कोणत्याही पदावर योग्य उमेदवार निवडण्यासाठी त्याचे मूल्यांकन करण्यासाठी मुलाखत घेणे हे क्रमप्राप्त असते. त्यानुसार कोणत्याही प्रकारच्या कामासाठी मुलाखतीची पूर्वतयारी करण्याचे सोपे तंत्र आत्मसात करण्यासाठी ' HOW TO WIN INTERVIEWS ?' हे माहितीपर पुस्तक संग्रही असायला हवे.



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195




**(हाऊ टू विन इंटरव्ह्यूज ? / लेखिका : प्रा. प्रज्ञा पंडित / प्रकाशक : शारदा प्रकाशन /मूल्य : १५० रुपये )**

# मिर्ज़ा ग़ालिब : एक शेर, रसग्रहण

आधुनिक केसरी

**मिर्ज़ा असदुल्लाह बेग खान, ऊर्दू व फारसी भाषेचे सर्वकालिक महान शायर, ज्यांना गालिब या नावाने जगभर ओळखले जाते. भारतामध्ये उर्दू भाषेला उर्दू कवितेला लोकप्रियता मिळवून देण्याचे श्रेय देखील गालिब यांना मोठ्या प्रमाणात जाते. गालिब यांचा जन्म 27 डिसेंबर 1796 ( आग्रा ) व मृत्यू 15 फेब्रुवारी 1869 ( दिल्ली ) येथे झाला.तर 73 वर्षाच्या आयुष्यात त्यांनी महान असे लिखाण केले. मुघल साम्राज्याचे अखेरचे शासक बहादुर शाह ज़फ़र यांच्या दरबारी गालिब यांना काहीं काळ ' राज कवि ' म्हणुन सन्मानाचे स्थान होते. मिर्ज़ा ग़ालिब यांनी उर्दू व फारसी भाषे मध्ये प्रामुख्याने ग़ज़ल, कसीदा, रूबाई, कितआ, मर्सिया या काव्य रचना प्रकारामध्ये लिखाण केले. त्यात त्यांनी प्रेम, विरह, दर्शन ( तत्वज्ञान ) , रहस्यवाद हे विषय सखोल असे हाताळले.**

आज मिर्ज़ा ग़ालिब यांचा हा सादर शेर आठवला आणि त्या विषयी लिहावे आणि रसग्रहण करावे असा मोह आवरला नाही.

अपनी गली में मुझ को न दफ्न कर बाद-ए-कत्ल
मेरे पते से खल्क को क्यों तेरा घर मिलें ?

एका सुप्रसिद्ध गझलेच्या या सुंदर शेराच्या माध्यमातून मिर्जा गालिब प्रेयसी ला उद्देशुन म्हणतात... प्रिये! तुला इतकीच विनंती आहे की तु माझा ( कत्ल ) खून केल्यानंतर , मला मारल्या नंतर माझी कबर तुझ्या गल्लीमध्ये बनवू नकोस, मला तुझ्या घराच्या आसपास दफन करू नको. कारण मी खूप प्रसिद्ध व्यक्ती आहे. आणि माझ्या कबर चे दर्शन घ्यायला हजारो लोक येतील , आणि त्या निमित्ताने त्यांना तुझे घर माहित होईल. असे होऊ नये असे मला वाटत असल्यामुळे तु मला तुझ्या घराच्या आसपास दफन करू नको.


या सादर शेराच्या अनेक उत्कृष्टता आहेत, सर्व साधारणपणे प्रत्येक प्रियकराची अशी अंतिम इच्छा असते की त्याचा अंतिम विधी प्रेयसीच्या घराच्या आसपास व्हावा, तिच्या घराच्या जवळपास त्याला दफन करावे.

परंतु महान कवी गालिब असे म्हणत नाहीत. तर या उलट ते म्हणतात की प्रेमामध्ये तू आमचा खून केल्यानंतर , अथवा तुझ्या प्रेमात आम्ही शहीद झाल्यानंतर तू मात्र एवढाच उपकार कर की तुझ्या गल्लीमध्ये आणि घराच्या आसपास आमचा अंत्यविधी करू नये. आम्हीही प्रसिद्ध आहोत आणि तु ही खूप सुंदर आहेस, जगभरात यामुळे आमची आणि तुझी प्रसिद्धी आहे. परंतु माझ्या या कबरीच्या माध्यमातून जगभरातील लोकांना तुझे घर माहित होऊ नये. मला पाहायला तर लोक येतीलच. पण त्यामुळे त्यांना तुझा पत्ता माहीत होऊ नये , त्याचे कारण मी होऊ नये.

प्रस्तुत शेराच्या माध्यमातून सुप्रसिद्ध कवी मिर्जा गालिब यांचा असा ही विचार संभवतो, रचनेतील प्रियकराला असे म्हणायचे आहे की माझ्या मृत्यू नंतर तुझ्या गल्ली मध्ये आणि घराच्या आसपास मला दफन केल्यानंतर दोन शक्यता उद्‌भवतील. एक म्हणजे माझ्या नावाने तुझे घर प्रसिद्ध होईल. म्हणजेच लोक म्हणतील या कबरवाल्या गल्लीमध्ये ती राहते. गालिब च्या कबरी जवळ अमुक नावाच्या त्याच्या सुंदर अश्या प्रेयसी चे घर आहे. एकंदरीत प्रेयसी राहते ती गल्ली प्रसिद्ध होऊन जाईल.

आणि दुसरी शक्यता अशी ही वाटते की जेव्हा माझ्या कबरीच्या पत्त्या वरून तुझे ( प्रेयसी चे ) घर प्रसिद्ध होईल, जेव्हा लोक तुला माझा खून करणारी ( कातील ) प्रेमिका या नावाने प्रसिद्ध करतील. यामध्ये तुझा अपमान होईल आणि बदनामी ही होईल. माझा मृत्यू कसा ही झाला किंवा तुझ्या कारणाने झाला किंवा तू जरी मला मारले, मृत्यूनंतर ही माझी अशी इच्छा आहे की तुझी बदनामी होऊ नये आणि माझ्यामुळे लोकांना तुझे घर माहिती होऊ नये.

या सारख्या अनेक रचनांद्वारे प्रेमकवी, विरह कवि आणि अत्यंत संवेदनशील विचारवंत मिर्झा गालिब यांनी उत्कृष्टपणे प्रेम विरह मनोभाव मनोदशा व्यक्त केल्या आहेत. त्यामध्ये अत्यंत सूक्ष्म प्रेम भावनेचे दर्शन होते.



© बलराज संघई
9420015108



# अयोध्या श्री राम मंदिर स्थापना अक्षता व कलश पूजन भव्य शोभायात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** आयोध्या धाम मधील प्रभू श्रीरामाची जन्मभूमी येथे श्री राम मंदिराचा लोकार्पण सोहळा नवीन वर्षात 22 जानेवारीला होणार आहे त्या अनुषंगाने भारत देशातील सर्व नागरिकांसाठी हा दिवस ऐतिहासिक असणार आहे. त्यानिमित्य लोहा शहरातून आयोध्या वरून आलेल्या श्रीराम मंदिर स्थापनेनिमित्त मंगल अक्षता कलशाचे स्वागत शुक्रवार दि.29.12.23 रोजी जुना लोहा ते मुख्य बाजारपेठेतून भव्य शोभायात्रा निघाली. त्यामध्ये फुगडी खेळून महिलानी जय श्रीरामचे नारे देत भक्ती भावाने मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. टाळ मृदंगाच्या गजरात तरुण युवक शहरातील व्यापारी आबाल वृद्धांनी या शोभायात्रेमध्ये जय श्रीराम चा नाऱ्यांनी परिसर राममय व भगवामय केला ही शोभायात्रा जुना लोहा ते सराफा बाजार हनुमान मंदिर भाजी मंडई, मुख्य रस्त्याने मार्केट कमिटीच्या दुसऱ्या कमानीतून मोंढा बाजार येथून निघून श्री चिंतामणी मंदिर येथे या भव्य शोभा यात्रेचा प्रभू श्रीरामाच्या आरतीने समारोप झाला यावेळी लोहा शहर व तालुक्यातील सकल हिंदू समाज बांधवांनी यामध्ये सहभाग नोंदवला.

# खुलताबाद -फुलंब्री महामार्गाला भेगा

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** फुलंब्री महा मार्गावरील भेगा पडणे थांबता थांबत नसुन सध्या सुलतानपूर रानमळा ते देवळांना फाटा दरम्यान चार इंची १५-२०फुटापर्यंत दरम्यान ठिकठिकाणी भेगा पडल्याने दुचाकी वाहने पडण्याच्या घटना घडत आहे. यासंदर्भात आमसभेत हा मुद्दा मांडून तातडी तो रस्ता दुरुस्ती करण्याचे आदेश सुचना आमदार यांनी दिल्या मात्र अद्याप ते काम करण्यांत आले नाही तर यावितरिक्त अनेक ठिकाणी रस्त्याला भेगा पडत आहे. यापुढे जावुन आ. बंब यांनी पुर्ण रस्ताच खराब असुण असे सांगितले यासंदर्भात वरिष्ठांपर्यंत लेखी तक्रार केली आहे. गरज पडल्यास मुख्यमंत्र्यापर्यंत ही तक्रार नेण्याचे त्यांनी सांगितले.

आमसभेत खुलताबाद फुलंब्री महामार्ग रस्ता निकृष्ट दर्जाहिन तथा हमीहीन असुण यावर तासभर तक्रारी चर्चा झाली यावेळी उपाभियंता शाखाभियंता यांची चांगलीच हजेरी घेण्यात आली आ.भाऊ बंब यांनी एकनाअनेक प्रश्न केले परंतु अधिकाऱ्यांना उत्तरे देता आले नाही.यावर सभेने चिंता व्यक्त केली.आज रोजी खुलताबाद फुलंब्री महामार्ग रस्ता भेगावर भेग पडत असुण गत दोन वर्षापासुन अखंडीतपणे ठिकठिकाणी रास्ता दुरुस्ती चे सुरूच आहे.यासंदर्भात आमसभेत तक्रार करून सभेला अवगत करण्यात आले चर्चा झाली मात्र अद्याप रस्ता दुरुस्ती होत नसल्याने दुचाकी वाहनांची पडझड सुरू आहे अपघात घडत आहे हे विशेष.याकडे वरिष्ठांनी लक्ष घालून खुलताबाद फुलंब्री महामार्गावरील भेगाचा तातडीने बंदोबस्त करावा असी मागणी वाहनधारक प्रवासी नागरिकांतुन होत आहे.

# भोकर रस्त्यावर अपघात : दोघे ठार

आधुनिक केसरी न्यूज





**भोकर :** हाडोळी (ता.भोकर) येथील दोघे गावातील अंत्यसंस्कार विधी आटोपून दुसऱ्या अंत्यविधीसाठी दूचाकीने शूक्रवारी (ता.२९) दुपारी तीन वाजताच्या सुमारास भरधाव वेगात जात असताना ऊमरीकडुन येणाऱ्या हायवा ट्रकची समोरासमोर धडक लागल्याने दूचाकीवरील दोघाचा जागीच मृत्यू झाला आहे. या बाबत सविस्तर माहिती अशी की, हाडोळी येथील संजय बाबाराव जाधव(वय ४४), श्यामराव पुंडलिक मिरासे(वय ५२) हे शूक्रवारी गावातील अंत्यविधी आटोपून दूपारी तीन वाजताच्या सुमारास दुचाकी क्रमांक (एम.एच.२६ बी/एल ७६४२)ने कूंटूर येथे नातेवाईकांच्या अंत्यविधी जात असताना ऊमरीहून भोकरकडे भरधाव वेगात येणारा हायवा ट्रक क्रमांक (एमएच २६/बीई२२६१) यांची ऊमरी रस्त्यावरील ईळेगाव पाटि लगत समोरासमोर जोराची धडक लागल्याने दूचाकीवरील दोघाचा जागीच मृत्यू झाला आहे.ऊशिरा पर्यंत गून्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.




# दत्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** दत धाम सुलीभंजन पर्वत येथे दत्त मंदीरात मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. महाआरती वेळी संस्थांचे सचिव संजय भंडारी, शंकर काका अधाने, विश्वस्त राऊत राय पाटील, नवनाथ महाराज अंधारे, उपाध्यक्ष अनिल अग्रवाल, यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी भाविक मोठ्या उत्साहाने उपस्थित होते यावेळी भाविकांनी दत्ताचा जय गजर करता श्रीपाद वल्लभ दिगंबरा दत्त महाराज की जय रामचंद्र की जय अशा जयघोषाने उत्सव साजरी केला यावेळी संस्थांची पुजारी मोहन गजभार , व्यवस्थापक गणेश फुलारे, विश्वास नागे, यावेळी श्री भद्रा मारूती संस्थानचे कर्मचारी सुरेकांत दौड, रमेश करपे, ज्ञानेश्वर बोडखे, भरत, दिनेश सावजी, नामदेव मरकड आदी मान्यवर उपस्थित होते तर जिल्ह्यातील मोठ्या संख्येने दत्त भाविकांनी गर्दी केली होती.

# अंगणवाडी आंदोलनास काँग्रेसचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे विविध मागण्या साठी येथील तहसील कार्यालयासमोर साखळी ऊपोषण सुरू आहे, शूक्रवारी (ता.२९) आंदोलनास तालुका युवक काँग्रेसच्या वतीने पाठिंबा जाहीर केला आहे.

राज्यभरातील अंगणवाडी कर्मचारी चार डिसेंबर पासून संपावर असल्याने बालकांचा आहार बंद आहे. तालुकास्तरावर कर्मचाऱ्यांनी आपले आंदोलन सुरू केले असून तीन जानेवारी रोजी मुंबई येथे त्यांचा मोर्चा धडकणार आहे. उपोषणांची दखल घेऊन तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अत्रिक पाटील मुंगल यांनी जाहीर पाठिंबा घोषित केला आहे शासनाने त्यांच्या मागण्याची दखल घ्यावी असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना या संदर्भात आपण चर्चा करणार असून विधानसभेत हा प्रश्न मांडण्यासाठी विनंती करणार असल्याचे सांगितले आहे. यावेळी पत्रकार बी.आर. पांचाळ, युवक काँग्रेसचे शहर अध्यक्ष श्रीकांत दरबस्तवार, सचिव यादव, संगपवाड गुरुजी, रमण पाटील, जनार्दन पोट पेलवार ,आनंद ढोले. अंगणवाडी संघटनेचे शिवाजी गायकवाड व अंगणवाडी कर्मचारी बहूसंख्येनी उपस्थित होते.

# भोकरला बिरसा मुंडा जंयती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

भोकर : शहरात गूरूवारी (ता.२८) क्रांतीवीर बिरसा मूंडा जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.तालूक्यात बहुतांशी भाग हा आदिवासी असून मध्यवर्ती ठिकाणी असल्याने आदिवासी प्रकल्प कार्यालयास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी हिंगोलीचे माजी आमदार डॉ.संतोष टारपे यांनी केली आहे.

#शहरातील बीरसा मूंडा चौक येथे ध्वजवंदन करून मूख्य रस्त्यावर मिरवणूक काढण्यात आली.यावेळी आदिवासी ढेमसा नृत्य, लेझीम पथक,ढोल ताशाच्या गजरात समाजबांधव आनंदोत्सव साजरा केला.त्या नंतर माऊली मंगल कार्यालयात प्राध्यापिका डॉ.कमल फोले यांच्या अध्यक्षतेखाली जाहिर सभा घेण्यात आली.यावेळी संचालक कृष्णा वाकदकर, शांताबाई कोळगावकर, पुंडलिक वाकदकर, गोविंद बाबा गौड पाटील, शिवाजी देवतूळे,चपंत मेंडके, धोंडीबा भिसे, वैद्यकीय अधिकारी डॉ.हनमंत रिठे, डॉ.बळीराम भूरके यांची उपस्थिती होती.यावेळी जयंती निमित्त मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.ऊतम वागदकर, डॉ.रवी वाळके, डॉ.माधव भूरके,संजय धनवे,राजु बुलबूले,पुजांराम डोकळे, गजानन वाकदकर, प्रकाश मेंडके, परमेश्वर वाकदकर,रंगराव वाकदकर, संतोष वाकोडे, मारोती खूपसे यांनी परिश्रम घेतले आहे. शेषराव हूरदूके यांनी सूत्रसंचालन केले तर पांडुरंग गामोड यांनी आभार मानले.कार्यक्रमास बहूसंख्य समाजबांधव,महिलाची उपस्थिती होती.

हिवराळे क्लिनिक अॅण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, अॅक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व अॅलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार व दत्तमूर्तीची प्राणप्रतिष्ठा

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदपूर :** अहमदपुरात पावणे दोनशे वर्षे पुरातन असणाऱ्या व स्वामी समर्थांच्या वास्तव्याने पावन झालेल्या ऐतिहासिक दत्त मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा 24 डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्यानंतर त्या मंदिरात दत्तात्रेयांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

यशवंत महाराजांनी आपल्या उत्तराधिकाऱ्याची सूत्रे पंतोजी परिवाराकडे दिलेली आहेत. पंतोजी परिवाऱ्याच्या वाड्यातून जयपरातून घडवून आणलेली दत्तात्रयाची सुंदर मूर्ती रथात विराजमान करण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण , मारवाडी , महादेव , गवळी , अशा अनेक गल्ल्यामधून दत्तात्रयाच्या सुंदर मूर्तीचा हा रथ टाळ मृदुंगाच्या जयघोषात पुढे पुढे सरकू लागला. भक्तगणांचा उत्साह शिगेला पोहोचलेला होता. प्रत्येक गल्ल्यामधून पताका..सडा.. रांगोळ्या.. सजविलेल्या होत्या. नव्या कोऱ्या साड्या



परिधान केलेल्या स्त्रियांचा उत्साह तर ओसांडून वाहत होता. महिलांची नाच.. गाणी.. झिम्मा.. त्यांनी धरलेल्या फुगड्यांच्या फेरामुळे वातावरणात चैतन्य निर्माण झालं. आपलं वय विसरून आई- मुलगी, सासरा- सून , तसेच छोटे छोटे वारकरी ही मंत्रमुग्ध होऊन नाचत होते. टाळ मृदुंगाच्या आणि दिगंबराच्या जयघोषात या शोभायात्रेमुळे अहमदपूरचं सारं वातावरण भक्तिमय होऊन गेलेलं होतं. टाळकरी.. वारकरी हे तर भान विसरून दिगंबराच्या नामाचा जयघोष करीत शोभायात्रेत तीन तास मंत्रमुग्ध होऊन नाचत होते.

आपल्या प्राणप्रिय दत्तात्रयाच्या सुंदर मूर्तीला या साऱ्या मंडळींना नाचत.. नाचत दत्त मंदिरात घेऊन आणलं. किशोर पंतोजी व राधिका पंतोजी यांच्या हस्ते व गजानन जोशी .. मकरंद जोशी या पुजाऱ्यांच्या मंत्रांच्या जयघोषात महापूजा करण्यात आली. आधी कलशारोहण त्यानंतर श्री दत्तात्रयाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा मोठ्या आनंदात भक्तीभावानी संपन्न झाली. या सोहळ्यात अहमदपूर चाकूरचे आमदार बाबासाहेब पाटील, माजी मंत्री विनायकराव पाटील , नगरसेवक अभय मिरकले, रवी महाजन ,संदीप चौधरी यांची मुख्य उपस्थिती होती. नंतर सर्व भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन देखील करण्यात आलेले होते. अहमद पुरातील दत्तात्रयाच्या प्राचीन दत्त मंदिराचा जिर्णोद्धार व दत्त मूर्तीची प्राणप्रतिष्ठेचा हा सोहळा यशस्वी करण्यासाठी बाळासाहेब पंतोजी , नितीन पंतोजी , गिरीश पंतोजी , किशोर पंतोजी , अरुण , सुरेश , अनिल , प्रकाश , अमेय व वासुदेवराव निलंगेकर तसेच सतीश चौधरी , अमर देशपांडे , आशिष चौधरी , प्रसाद टोणपे आणि पंतोजी परिवारातील सर्व महिलावर्ग व दयानंद घाटोळ, दिलीप पाटील, राजू पाटील , सूर्यकांत पाटील, राजकुमार डांगे, गणेश हालसे, सुरेश फुलारी , सुनील फुलारी, गोविंद सारोळे, तुकाराम लोकरे, पांडुरंग लोकरे ,बालाजी पाटील, अनिकेत काशीकर, संतोष सोलपुरे, मकरंद जोशी आणि समस्त गावकऱ्यांच्या आता परिश्रमातून अहमदपूरच्या प्राचीन दत्त मंदिराचा जिर्णोद्धार झाला. नवीन दत्त मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापनेचा हा सोहळा मोठ्या आनंदात संपन्न झाला . संभाजी नगरहून खास आलेले सुप्रसिद्ध कलावंत सुधीर कोर्टीकर यांनी दत्त मंदिरात सजवलेली फुलांची रांगोळी तसेच निवासस्थानी रेखाटलेली रंगांची रांगोळी साऱ्या स्मरणात राहून गेली हे बाकी खरं.



# व्हॉईस ऑफ मीडिया डिजिटल विभाग धाराशिव जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी माळी

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** 'व्हॉईस ऑफ मीडिया' ही संघटना देशातल्या २१राज्यांमध्ये कार्यरत आहे. पत्रकारांच्या, आणि पत्रकारितेच्या हितासाठी लढणाऱ्या या संघटनेत व्हॉईस ऑफ मीडियाच्या डिजिटल विभाग धाराशिव जिल्ह्याच्या जिल्हा प्रसिद्धी प्रमुख म्हणून किशोर माळी यांची निवड करण्यात आली. यावेळी व्हॉइस ऑफ मीडियाच्या राष्ट्रीय महिला अध्यक्ष सारिका महोत्रा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन किशोर माळी यांचा सत्कार करण्यात आला. व्हॉईस मीडिया डिजिटल विभाग जिल्हा प्रसिद्ध प्रमुख म्हणून किशोर माळी यांची निवड झाल्याबद्दल व्हाईस ऑफ मीडिया जिल्हा व तालुका संघटनेकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# आधुनिक केसरीचा दणका अन् वाशी पोलिस स्टेशन अंतर्गत पारा बीटला आली जाग

## दस्तुरखुद्द वाशीकर मात्र कारवाईच्या प्रतीक्षेत

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील पोलीस प्रशासनाच्या हप्तेखोरी मुळे बनावट दारूला चांगलाच जोर वाढल्यामुळे, याबाबत दैनिक आधुनिक केसरीने बातमी प्रसिद्ध करताच पोलिस प्रशासन खडबडून जागे झाले. दी 28 रोजी वाशी तालुक्यातील पारा येथे दोन ठिकाणीं अवैद्य दारू बनवणाऱ्या ठिकाणावर छापा टाकण्यात आला. मात्र वाशी शहरातील हातभट्टी दारू विक्री ती पणं वाशी येथील मोक्याच्या ठिकाणी सुद्धा दारू विक्री केली जाते अन् या बाबत पोलीस प्रशासनाच्या चिंगमगिरीमुळे सरार्स दारू विक्री केली जाते हि वाशीकरांसाठी खूप निंदनीय बाब आहे.


केसरी
28 Dec 2023

वाशी शहराला हातभट्टीचा वेढा

शहराच्या चौफेर खुलेआम हातभट्टीचे बॉयलर पेटले

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

# यशवंत इंग्लिश मीडियम स्कूल येथे वार्षिक क्रीडा मेळाव्याचे आयोजन




आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**नेर :** महात्मा फुले बहुउद्देशीय संस्था यशवंत इंग्लिश मेडीयम स्कुल याठिकाणी वार्षिक क्रीडा मेळावा निमित्त विविध खेळाडू स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.यात रनींग,खो-खो, कबड्डी,क्रिकेट,बास्केट बॉल, टेनिस बॉल,स्केटिंग अशा विविध स्पर्धांचे आयोजन झाले. कार्यक्रमाचे उदघाटक नेर येथील माजी ग्रामपंचायत सदस्य देविदास माळी, प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्य नेर श्री.राजधर अमृतसागार, सकाळ वृत्त वार्ताहर सुरज खलाणे संस्थेचे अध्यक्ष माजी. नायब तहसीलदार श्री.बन्सीलाल पगारे उपस्थित होते. ग्रामपंचायत सदस्य राजधर अमृतसागर यांनी विद्यार्थ्यांना उदबोधित केले. यावेळी ते म्हणाले की, विद्यार्थी हा अभ्यासातचं निपुण असतो असे नाही. शाळेतील विविध खेळांमध्ये तालुका पातळी ते,राज्यस्तरीय पातळीपर्यंत यशस्वी होत असेल तर त्या विद्यार्थ्यांची गावापासून जागतिक पातळीपर्यंत खेळातून ओळख निर्माण होते.संस्थेचे अध्यक्ष श्री. बन्सीलाल पगारे यांनी विद्यार्थ्यांना संभोधित करतांना सांगितले की,विद्यार्थ्यांच्या बाल्यअवस्था ते किशोराव्यस्था या काळात विविध खेळांमध्ये सहभाग घेतल्यास शारीरिक,बौद्धिक पातळी उंचावते. भविष्यात होणारा त्रास निर्माण होत नाही.विद्यार्थी दशेत नियमित उत्तेजितता निर्माण असते. ग्रामीण भागातील विद्यार्थी हा जागतिक पातळीपर्यंत यशस्वी खेळू शकेल.गावाचे, ग्रामीण भागाचे, शाळेचे नाव लौकिक करेल. यासाठी मी संस्थेचा अध्यक्ष म्हणून नियमित तत्पर असतो.कार्यक्रम प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री.राजेंद्र घोंगडे, उपमुख्याध्यापक श्री.योगेश गातवे, शालेय प्रमुख श्रीमती.सुलभा मोरे, खेळाडू शिक्षक श्री बारस्कर सर उपस्थित होते. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका यांचे सहकार्य लाभले.

# पिंपळगाव वळण मतेवाडी फाटा येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आदर्श प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक तसेच ग्रामगिता माध्यमिक विद्यालया पिंपळगाव वळण मतेवाडी फाटा तालुका फुलंब्री येथे वार्षिक स्नेह संम्मेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जिल्हा अध्यक्ष शेतकरी संघटना चे काशिनाथ जाधव व प्रमुख पाहुणे माननीय शिक्षक आमदार विक्रम काळे तसे किशोर नाना बलांडे माजी सभापती उपस्थित होते कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी केले. उद्घाटना प्रसंगी आमदार विक्रम काळे म्हणाले की, वर्ष भर विद्यार्थी अभ्यासात मग्न असतो,म्हणून शाळा वर्षातून एकदा वार्षिक स्नेह संमेलन आयोजित करत असते. जे ने करून विद्यार्थी हा अभ्यासाबरोबर आपल्या अंगी असलेले कला गुण दाखवीत असतो.आणि विद्यार्थ्यांचे पालक सुद्धा हा अनुभव प्रत्यक्ष दर्शनी पाहत असतो.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या वेळी होण्यासाठी हे एकमेव साधन आहे. यावेळी कार्यक्रमाच या प्रसंगी विद्यार्थ्यांनी नाटक,हिंदी, मराठी, देशभक्ती, महाराष्ट्राची संस्कृती आदी गाण्यांवर नृत्य सादर केले.याकार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती तथा कृ.उ.बा.स.संचालक किशोर नाना बलांडे, शरद जोशी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माननीय श्री काशिनाथ जाधव पाटील व उपशिक्षणअधिकारी अशोक पाटील, कामगार सेनेचे श्री प्रभाकरराव मते बांधकाम विभागाचे श्री इधाटे व अंकुश जाधव हायकोर्ट चे श्री तांदळे बाबासाहेब तांदळे श्री बाळासाहेब तांदळे मार्केट कमिटीचे श्री गोरे साहेब तसेच आमदार साहेबांसोबत आलेले पदाधिकारी व विविध गावातून आलेले सरपंच उपसरपंच सोसायटी चेअरमन व प्रतिष्ठित नागरिक व संस्थेचे संचालिका लताबाई जाधव,शाळेचे संचालक गोकुळ निळ,तसेच पालक, महिला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित



होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक तथा मुख्यध्यापक योगेश जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सुंत्र संचालन मुख्यधापिका अश्विनी जाधव, सहशिक्षिका सविता लोखंडे, सहशिक्षक परसराम घुगे, अन्सार शेख, यांनी केले. कार्यक्रमाचे आभार मुख्यध्यापिका अश्विनी जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षिका निता ठाकूर,वैशाली तायडे, पुष्पा काकडे, सहशिक्षक सचिन निर्मळ, अनिल ायकवाड, संदीप निधोंनकर,अनिल थोरात, जिवन पवार, भाऊसाहेब शिरसाट, आकाश म्हस्के आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक यांनी काम पाहिले.



# विहिरीत पडलेल्या नीलगायीला ग्रामस्थांकडून जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील खडसे**

**रिसोड :** तालुक्यातील जवळा येथील शेतशिवारात एक नीलगाय पडलेल्या अवस्थेत आढळली आहे. सदर शेतकऱ्याच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी वनविभागशी संपर्क साधला होता. परंतू संध्याकाळची वेळ असल्यामुळे सकाळी येऊ असे वनविभागाकडून कळविण्यात आले होते.आज दि.३० डिसेंबर रोजी ग्रामस्थांच्या मदतीने अपघातग्रस्त गाय जिवंत अवस्थेत विहिरीच्या वर काढण्यात आली आहे. यावेळी वनविभागाचे फक्त चौकीदार उपस्थित होते. अशी माहिती सबंधित शेतकऱ्याकडून मिळाली आहे.

तालुक्यातील बंदी भागात असलेल्या जवळा शेतशिवारात येथील शेतकरी आत्माराम शंकर जाधव हे सायंकाळच्या सुमारास आपल्या शेतात फेरफटका मारायला गेले होते. दरम्यान त्यांच्या शेतातील विहिरीवर ते गेले असता, सदर विहिरीत त्यांना एक नीलगाय पडलेल्या अवस्थेत आढळली. सदर गायीस दुखापत झाली असली तरी ती विहिरीत जिवंत अवस्थेत पडून होती. ही बाब शेतकरी जाधव यांनी त्वरीत वनविभागाचे चौकीदार माधव आघाव यांना कळविली होती. तसेच सबंधित वनपाल यांना सुद्धा भ्रमणध्वनी वरून माहिती देण्यात आली होती. असे शेतकरी आत्माराम जाधव यांनी सांगितले आहे. परंतू वेळ संध्याकाळची असल्याने अपघातग्रस्त गायीस विहीरीच्या वर काढणे कठीण असल्यामुळे सकाळी येऊ असे वनविभागाकडून कळविण्यात आले होते. मात्र गायीची अशक्त अवस्था पाहून सदर शेतकऱ्याने रात्रभर तिच्या चाऱ्याची व्यवस्था केली आणि आज सकाळी चौकीदार आघाव व जाधव यांनी गावकऱ्यांच्या मदतीने अपघातग्रस्त गाय विहीरीच्या वर काढली असल्याची माहिती शेतकरी जाधव यांनी दिली.

# गोर सेनेचा वाटूर फाट्यावर रास्ता रोको

## विमुक्त जातीतील घुसखोरी थांबवण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**परतूर :** विमुक्त जाती अ' प्रवर्गातील इतर जातीची घुसखोरी थांबविण्यात यावी, बनावट जात प्रमाणपत्राबाबत विशेष तपासणी पथकाची स्थापना करण्यात यावी, या इतर मागण्यांसाठी गोर सेनेच्या वतीने गुरूवारी (दि. २८) जिल्हा- नांदेड महामार्गावरील वाटूर फाट्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या रास्ता रोको आंदोलनामुळे वाहतूक दोन तास ठप्प झाली होती. गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण, अविनाश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी बंजारा समाजातील महिला पारंपारिक वेशभूषा धारण करून या रास्ता रोको आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. विमुक्त जाती 'अ 'प्रवर्गात अवैध मार्गाने खोटे जात वैधता प्रमाणपत्र घेणाऱ्या लाभार्थ्यांसह खोटे प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विशेष तपासणी पथक स्थापन करण्यात यावे, संपूर्ण महाराष्ट्रत जिल्हा ठिकाणी जिल्हा जात वैधता पडताळणी समितीमध्ये वि.जा. (अ) प्रर्वगातील एका तज्ञ व्यक्तीची शासकीय प्रतिनिधी म्हणून नेमणूक करावी, २४ नॉव्हेबर २०१७ च्या महाराष्ट्र शासनाकडुन निर्गमित झालेला रक्त नातेसंबंधाचा निकष लावून जात वैधता प्रमाणपत्र देण्याचा शासन निर्णय त्वरीत रद्द करण्यात यावा, संपूर्ण महाराष्ट्रात खरे राजपूत जातीचे लोक प्रत्यक्षात कुठे राहतात त्या तालुका निहाय जिल्हाची यादी शासनामार्फत त्वरीत जाहीर करण्यात यावी, राज्य मागास अहवाल क्र. ४९/२०१४ लागू करण्यात यावा, महाराष्ट्र शासनाने विमुक्त भटक्या जमातीना लागु केलेली उन्नत व प्रगत गटाची अट त्वरीत रद्द करण्यात यावी आदी मागण्यांचे निवेदन आंदोलकांनी जिल्हा प्रशासन तसेच राज्य शासनास सादर केले. या रास्ता रोको आंदोलनासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. या रास्ता रोको आंदोलनात बंजारा समाज पाच लाख बनावट प्रमाणपत्र वाटप बांधव महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. गर्दीतून रुग्णवाहिकेस करून दिली मोकळी वाट गोर सेनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन सुरू असताना आंदोलकांनी रुग्णवाहिकेस वाट मोकळी करून देत जमलेल्या बंजारा समाज बांधवांनी म  माणुसकीचे दर्शन घडवले. विमुक्त 'अ' प्रवर्गातून अधिकाऱ्यांना हाताशी धरून जवळपास पाच लाख प्रमाणपत्र वाटप केल्याचा आरोप गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांनी यावेळी बोलतांना केला तसेच सरकारने गोर सेनेच्या मागण्या पूर्ण न केल्यास आगामी विधानसभा निवडणुकीत हा समाज सरकारला हिसका दाखवेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# लोणंदच्या मैदानात 'त्या' डान्सिंग अंपायरची धमाल; सचिन तेंडुलकर, मायकेल वॉनकडून दखल

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आयपीएलमध्ये क्रिकेटच्या मैदानात फलंदाजाने चौकार, षटकार मारल्यानंतर किंवा एखादा फलंदाज बाद झाल्यानंतर चिअर्स गर्ल्स डान्स करताना आपल्याला पाहायला मिळतात. क्रिकेटची धमाल प्रेक्षकांना अनोख्या पध्दतीने अनुभवता यावी. म्हणून हा एक मनोरंजनात्मक प्रयोग दिसून येतो. परंतु याच चिअर्स गर्ल्सच्या डान्सला पाठीमागे टाकेल असा पंढरपूर येथील डान्सिंग अंपायर सुध्दा सध्या चर्चेत आलेले आहेत. होय चक्क अंपायरच क्रिकेटच्या मैदानात डान्स करताना पाहायला मिळत असून क्रिकेटपटू यांच्या सोबतच उपस्थित असलेल्या क्रिकेटप्रेमींचे मनोरंजन सुद्धा हे अनोख्या अंपायरिंगच्या माध्यमातून करत आहेत. दीपक नाईकनवरे असे या अंपायरचे नाव असून डी.एन रॉक म्हणून त्यांची ओळख क्रिकेट जगतात झालेली आहे.शिवाय त्यांना जागतिक कीर्तीचे सुप्रसिद्ध असलेले अंपायर बिली बाऊंडनच्या नावाने सुद्धा संबोधले जाते.

अगदी बिली बाऊंडन सारखी हुबेहूब अशीच अंपायरिंग करण्याचा ते प्रयत्न करत असतात. त्यास त्यांनी डान्सिंगची जोड दिल्याने डान्सिंग अंपायर म्हणून त्यांची ओळख उदयास आलेली आहे.विशेष म्हणजे त्यांच्या याच अंपायरिंगची भुरळ मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर आणि इंग्लंडचा फलंदाज मायकेल वॉन यांना सुद्धा पडलेली असून या दोघांनी ट्विटच्या माध्यमातून यापूर्वीच त्यांच्या अंपायरिंगची दखल घेतलेली आहे.ज्या ठिकाणी क्रिकेटचे भव्य सामने आयोजित केले जात असतात. अशा ठिकाणी आयोजकांकडून हे अंपायर बोलविले जात आहेत. मैदानात त्यांच्याकडून कमाल दाखवित धमाल उडविली जात आहे.अशीच धमाल त्यांनी



लोणंद ता.खंडाळा येथील मैदानात केलेली आहे. स्व.विनायकराव शेळके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने स्व.विनायकराव शेळके पाटील स्मृतीचषक २०२३ चे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे आयोजक असलेले माजी नगरसेवक हणमंतराव शेळके पाटील यांनी या स्पर्धेचे चांगले नियोजन केले होते. शिवाय शेवटच्या सेमी फायनल आणि फायनल सामन्याकरिता तर सर्वांचेच मनोरंजन करण्यासाठी डी एन रॉक यांना आमंत्रित केले होते.लोणंदच्या मैदानात डी.एन रॉक यांनी ज्या पद्धतीने अंपायरिंग केली.त्या अंपायरिंगचे कौतुक तर सर्वांनीच केले. शिवाय जी धमाल केली. त्यातून सर्वांनीच आनंद लुटला. अंपायरने कधी मैदानात डान्स केला तर कधी मैदानाच्या बाहेर जाऊन चिमुकल्या मुलांमध्ये मिसळुन डान्स केला. या कलाविष्कार बद्दल काहींनी त्यांना काही रक्कम रोख स्वरूपात देऊन त्यांचा सन्मान केला.लोणंद येथील मैदानातून डान्स करत करत मैदानाच्या बाहेर येऊन चक्क सरबतच्या गाड्यावर येऊन सरबतचा आस्वाद घेऊन पुन्हा मैदानात अंपायरिंग करायला गेले.मैदानात फलंदाज चौकार,षटकार ठोकत होते तर अंपायर त्यांच्या स्टाईलने अंपायरिंग करत होते. त्यामुळे क्रिकेटच्या मैदानात एक अनोखा थरार पाहायला मिळाला.क्रिकेट सामन्याचे आयोजक असलेले माजी नगरसेवक हणमंतराव शेळके पाटील यांच्या आयोजनातून लोणंदच्या मैदानात डी.एन रॉक यांना आमंत्रित केल्याने एक अनोख्या पध्दतीचा अंपायर लोकांना अनुभवता आला.मनोरंजमात्मक पद्धतीने व डी जेच्या तालावर डान्स अन खेळाच्या संदर्भातील इशारे हे सर्व अनोख्या पद्धतीने अंपायर यांच्या कडून घडत असल्याने खेळाडूंमध्ये सुद्धा एक नव चैतन्यच पाहायला मिळाले.खेळासोबत मनोरंजन ही घेता आल्याने लोकांनी सुद्धा हणमंतराव शेळके पाटील यांचे आभार मानले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर